# स्मृति - पुष्प

## २

मार्गशीर्ष शुक्ल ८, शके १९२४
१२ डिसेंबर २००२, गुरुवार



## श्री रामकृष्ण विवेकानंद सेवा मंडळ

गीतानगर, बायपास रोड, अकोला - ४४४ ००१
फोन - २४४००१४

# श्री रामकृष्ण विवेकानंद सेवा मंडळ

(र. नं. एफ. ६६५ मे १९८०, महाराष्ट्र ५७५)

गीता नगर, बायपास रोड, अकोला ४४४ ००१

फोन : ०७२४ - २४४००१४.

# स्मृति पुष्प-२

## स्मरणिका विमोचन समारोह

**पूज्यपाद स्वामी आत्मस्थानंदजी महाराज**

उपाध्यक्ष, रामकृष्ठ मठ व रामकृष्ण मिशन

बेलूर मठ, जि. हावरा (पू. बंगाल)

• यांचे शुभहस्ते •

तिथि : मार्गशिर्ष शुक्ल ८, शके १९२४,

गुरुवार, दि. १२ डिसेम्बर २००२

• प्रमुख उपस्थिति •

**स्वामी सत्यरुपानंदजी महाराज**

सचिव, रामकृष्ण मिशन, विवेकानंद आश्रम, रायपूर (छ. गड)

**स्वामी विमलात्मानंदजी महाराज**

बेलूर मठ, जि. हावरा (पू. बंगाल)

**स्वामी ब्रह्मस्थानंदजी महाराज**

अध्यक्ष, रामकृष्ण मठ, नागपूर

**डॉ. शरदराव निंबाळकर, कुलगुरु**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

• देणगी मूल्य : रुपये पंधरा फक्त

**प्रकाशक :**

**रामकृष्ण विवेकानंद सेवा मंडल**
गीता नगर, बायपास रोड, अकोला ४४४ ००१
फोन : ०७२४ - २४४००१४

**प्रकाशन तिथी :**

मार्गशिर्ष शुक्ल - ८, शके १९२४
गुरुवार, दि. १२ दिसेंबर २००२

**मुद्रक :**

**शिवाजी प्रिन्टींग प्रेस,** टिळक रोड,
अकोला ४४४ ००१, फोन : ०७२४ - २४३७८४६

**मुखपृष्ठ सजावट :**

**वर्डस् कॉम,** कोठारी कमर्शियल कॉम्प्लेक्स,
काला चबुतरा, अकोला - ४४४ ००१

**अक्षर रचना :**

**प्रविण क्रिएशन,** अकोट स्टॅन्ड,
अकोला ४४४ ००१, फोन : ०७२४ - २४२५३०७

**संपादक मंडळ :**

डॉ. या. मा. उर्फ नानासाहेब टाले
डॉ. सुभाष आ. मानकर
डॉ. शरद कोलते
डॉ. श्रीधर टिंगरे
डॉ. शरद या. कुळकर्णी
प्रा. हरिभाऊ हिवरे



**Ramkrishna Math**
P.O. Belur Math, Dist. Howrah
West Bengal - 711 202
INDIA

## MESSAGE

*Sri P. N. Kaware,*
*Sri Ramakrishna Vivekanand Seva Mandal*
*Gitanagar, Akola*

*Dear Sri Kaware,*

*We are in receipt of your letter of 22nd instant and are glad to know that to commemorate the visit of swami Atmasthanandji, Vice President, Ramkrishna Math and Ramkrishna Mission, you are going to publish a souvenir.*

*I hope the proposed souvenir will contain valuable articles on Sri Ramakrishna, Holy Mother Sri Sarada Devi and Swami Vivekananda, reading which the people will be benefited spiritually.*

*With best wishes,*

*Yours sincerely*

***(Swami Smarananda)***
*General Secretary*



**Ramkrishna Math**
P. O. Belur Math, Dist. Howrah
West Bengal - 711 202
INDIA

## MESSAGE

*Dear Sri P. N. Kaware,*

*Most Revered President Maharaj is glad to know that Ramakrishna Vivekanada Sewa Mandal, Akola is going to publish a Souvenir, and that it will be released by Srimat Swami Atmasthanandaji Maharaj. He is further glad to know that you have a temple dedicated to Ramkrishna Bhavadhara, inaugurate three years back. He conceys his love and blessing that the Souvenir may be a success.*

*With regards,*
*Yours in Sri Ramakrishna*

**(Swami Asimatmananda)**

# हमारे प्रेरणा स्त्रोत...

* ब्रह्मलीन स्वामी भूतेशानंदजी
  भुतपूर्व अध्यक्ष, रामकृष्ण मठ तथा रामकृष्ण मिशन, बेलूर
* स्वामी रंगनाथानंदजी
  अध्यक्ष, रामकृष्ण मठ तथा रामकृष्ण मिशन, बेलूर
* स्वामी गहनानंदजी
  उपाध्यक्ष, रामकृष्ण मठ तथा रामकृष्ण मिशन, बेलूर
* स्वामी आत्मस्थानंदजी
  उपाध्यक्ष, रामकृष्ण मठ तथा रामकृष्ण मिशन, बेलूर
* स्वामी वागीशानंदजी
  अध्यक्ष, रामकृष्ण मठ, खार, मुंबई
* स्वामी स्मरणानंदजी
  महासचिव, रामकृष्ण मठ तथा रामकृष्ण मिशन, बेलूर
* स्वामी भौमानंदजी
  अध्यक्ष, रामकृष्ण मठ, पुणे
* स्वामी सत्यरुपानंदजी
  सचिव, रामकृष्ण मठ, विवेकानंद आश्रम, रायपूर
* स्वामी ब्रह्मस्थानंदजी
  अध्यक्ष, रामकृष्ण मठ, नागपूर
* स्वामी निखिलात्मानंदजी
  अध्यक्ष, रामकृष्ण मठ, अलाहाबाद
* स्वामी योगात्मानंदजी
  प्रॉव्हीडंस, अमेरिका
* स्वामी तत्वज्ञानानंदजी
  प्राचार्य, शिल्प मंदिर, सारदापीठ, बेलूर मठ

# हमारे प्रेरणा स्त्रोत...

* ब्रह्मलीन स्वामी भूतेशानंदजी
  भुतपूर्व अध्यक्ष, रामकृष्ण मठ तथा रामकृष्ण मिशन, बेलूर
* स्वामी रंगनाथानंदजी
  अध्यक्ष, रामकृष्ण मठ तथा रामकृष्ण मिशन, बेलूर
* स्वामी गहनानंदजी
  उपाध्यक्ष, रामकृष्ण मठ तथा रामकृष्ण मिशन, बेलूर
* स्वामी आत्मस्थानंदजी
  उपाध्यक्ष, रामकृष्ण मठ तथा रामकृष्ण मिशन, बेलूर
* स्वामी वागीशानंदजी
  अध्यक्ष, रामकृष्ण मठ, खार, मुंबई
* स्वामी स्मरणानंदजी
  महासचिव, रामकृष्ण मठ तथा रामकृष्ण मिशन, बेलूर
* स्वामी भौमानंदजी
  अध्यक्ष, रामकृष्ण मठ, पुणे
* स्वामी सत्यरुपानंदजी
  सचिव, रामकृष्ण मठ, विवेकानंद आश्रम, रायपूर
* स्वामी ब्रह्मस्थानंदजी
  अध्यक्ष, रामकृष्ण मठ, नागपूर
* स्वामी निखिलात्मानंदजी
  अध्यक्ष, रामकृष्ण मठ, अलाहाबाद
* स्वामी योगात्मानंदजी
  प्रॉव्हीडंस, अमेरिका
* स्वामी तत्वज्ञानानंदजी
  प्राचार्य, शिल्प मंदिर, सारदापीठ, बेलूर मठ

# अनुक्रमणिका...


✧ संपादकीय

✧ श्री रामकृष्ण विवेकानंद सेवा मंडळाची वाटचाल

✧ OUR HOLY PRESIDENT

| लेखानुक्रम | पृष्ठ |
|---|---|
| ✧ स्वामी भाष्यानंदजी : एक व्यक्तिदर्शन<br>*स्वामी तत्वज्ञानानंद* | १ ते ९ |
| ✧ मनुष्यत्व आणि स्वामी विवेकानंदांचा संदेश<br>*स्वामी ब्रह्मस्थानंद* | १० ते १६ |
| ✧ आध्यात्मिकता आज के परिपेक्षमे<br>*स्वामी सत्यरुपानंद* | १७ ते १८ |
| ✧ श्री रामकृष्ण भावधारा की अपूर्वता<br>*स्वामी निखिलात्मानंद* | १९ ते २२ |
| ✧ VIVEKANANDA : A Hundred Years after<br>*Swami Jitatmananda* | २३ ते २७ |
| ✧ भारतीय स्त्रिया<br>*स्वामी विवेकानंद : अनु. स्वामी पितांबरानंद* | २८ ते ३८ |
| ✧ Principles of Right Living : Making Life out of Life<br>*Swami Ranganathanandaji* | ४३ ते ४५ |
| ✧ आध्यात्मिक साधनेत आड येणारे धोके<br>*स्वामी यतिश्वरानंद : अनु. स्वामी योगात्मानंद* | ५१ ते ५५ |
| ✧ माताजी : गुरुभक्ती<br>*स्वामी पूर्णात्मानंद : अनु. सविता ओगीराल* | ५९ ते ६३ |
| ✧ पूजा - एक आध्यात्मिक साधना<br>*स्वामी भजनानंद - अनु. ब्र. प्रशांत चैतन्य* | ६६ ते ७१ |
| ✧ शिक्षा के क्षेत्र में रामकृष्ण मिशन की भूमिका<br>*स्वामी विरेश्वरानंद* | ७७ ते ८० |

॥ श्री रामकृष्ण शरणम् ॥



# संपादकीय

सब भक्त तथा श्रध्दालु सज्जनोंको ज्ञात है कि दिनांक १५ दिसंबर १९९९ तिथि को रामकृष्ण विवेकानंद सेवा मंडल द्वारा गीता नगर, अकोला शहर में आश्रम भवन एवम् श्री रामकृष्ण मन्दिर का समर्पण समारोह उत्साह वर्धक वातावरण में संपन्न हुआ । प. पू. स्वामी गहनानंदजी महाराज, उपाध्यक्ष रामकृष्ण मठ और रामकृष्ण मिशन, बेलूर इनके शुभ करकमलोद्वारा यह वास्तु की प्रतिष्ठापना हुई । इस अवसर पर एक 'स्मृति पुष्प' (स्मरणिका) का भी विमोचन हुआ । यह सेवा मंडल की बडी उपलब्धि मानी जाती है ।

श्रध्दालु तथा भक्तों के लिए यह एक हर्ष की बात है कि प. पू. स्वामी आत्मस्थानंदजी महाराज उपाध्यक्ष, रामकृष्ण मठ - मिशन, बेलूर, इन्होने अपने व्यस्त कार्यक्रमसे समय निकालकर इस मंडल के सभासदोंको अनुग्रहित करने हेतु दिनांक १२ दिसंबर २००२ को भेट देने का आमंत्रण स्विकृत किया है । यह उनकी सदिच्छा भेट आशिर्वाद तथा दर्शन के लिये सबको सौभाग्य से प्राप्त हुई है । उनके शुभआगमन पर सेवा मंडल ने **'स्मृति पुष्प – २'** का प्रकाशन करनेका कार्यक्रम निश्चित किया है, उसका विमोचन उनके शुभ करकमलोंद्वारा करने का हमे यह एक अमुल्य अवसर प्राप्त हुआ है ।

**'स्मृति पुष्प – २'** का प्रकाशन श्रध्दालु भक्तगण तथा हितचिंतको की सेवा एवम् उदार दातृत्व के कारण सम्पन्न हो पा रहा है। संपादकीय मंडल उन सभी का सदैव ऋणी है।

हमे विश्वास है कि समस्त भक्तगण व सज्जन **'स्मृति पुष्प – २'** का सुगंध पाकर ईश्वरानुभूति के लिये व्याकूलता का अनुभव करेंगे और कल्याण मार्गपर अवश्य प्रगति कर पायेंगे, तथा आश्रम द्वारा संपर्क अभियान से भी श्रध्दालु लाभान्वित हो पायेंगे ।

हमारी की गयी प्रार्थनानुरुप अन्य आश्रमके स्वामिजीओंने अल्पकालावधि में समर्पक लेख प्रदान किये है, एवम् मुद्रक, मुखपृष्ठ सजावटकार, छाया चित्रकार, अक्षर रचनाकार इन सभींने अल्प समय में सेवा की भावना से 'स्मृति पुष्प – २' को पुर्णता प्रदान की । संपादक मंडल सभी व्यक्तीं जिन्होने सेवारुप में तथा दान द्वारा जो योगदान और सहकार्य कीया है जिसके बिना यह पवित्र कार्य संपन्न होना संभव न था , हम उन सभी के हृदय से आभारी है ।

प. पू. ब्र. स्वामी भाष्यानंदजी (अकोला निवासी), प. पू. ब्र. स्वामी आत्मानंदजी और प. पू. ब्र. स्वामी व्योमरुपानंदजी इनकी असिम कृपासे श्री रामकृष्ण विवेकानंद आश्रम, गीता नगर, अकोला मे स्थापित हुआ है । उनकी पावन स्मृति को सहृदय से सादर विनम्र अभिवादन ।

– संपादक

॥ श्री रामकृष्ण शरणम् ॥

# श्री रामकृष्ण विवेकानंद सेवा मंडळाची वाटचाल

गत १५ डिसेंबर १९९९ या दिवशी भगवान श्री रामकृष्ण देवांच्या आणि माँ सारदादेवी व श्रीमद् स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांची प्रतिष्ठापना आणि सोबतच मन्दिर समर्पण सोहळा यथाविधी पार पडला, स्मरणिका 'स्मृति पुष्प' चे विमोचन देखील त्याच वेळी झाल्याचा समग्र वृत्तांत वाचकांना स्मरतच असेल. या सेवा मंडळा संबंधी अगदी सुरवाती पासूनचा इतिहास देखील त्या स्मरणिकेत याच सदराखाली दिलेला आहे. त्याचा ध्वन्यर्थ अतीशय उद्‌बोधक आहे. ज्या ज्या व्यक्तिंनी, भक्तांनी मंडळाच्या स्थापनेपासून उपक्रमांची मुहूर्तमेढ करुन ते कार्यरत ठेवण्यांसाठी, यात नावांचा निर्देश वा उल्लेख न आलेल्या असंख्य व्यक्ति असतील, त्यांनी सातत्याने केलेल्या परिश्रमांमुळेच या मंडळाची वाटचाल आजतागाजत अव्याहपणे होत आहे. येथे श्रीमद्भगवद्गीतेच्या एका श्लोकाचे स्मरण होते. तो येथे उद्धृत करावसा वाटतो. ''कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन । मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि'' ॥४७॥ (अ.२) अगदी अस्सेच त्यांचे कार्य म्हणावे लागेल. कारण त्या व्यक्तिंनी आपापल्या कार्याचा वाटा उचलून आणि यथाशक्ति सक्रीय योगदान देवून सेवा रुजु केली व करीत आहेत. त्यांना ना नांवलौकिकाची ना कोणत्या लाभाची अपेक्षा होती. त्यांनी भगवान श्रीरामकृष्णांचे चरणी आपली निर्व्याज सेवा रुजू करण्यातच धन्यता मानली. यामध्ये आर्थिक योगदान देणाऱ्यांची तर मोजदातच करता येणार नाही. त्यात उदार अंत:करणाचे व सढळ हाताने दान देणारे मोठे दाते आहेतच परंतु यथाशक्ति 'फुल न फुलाची पाकळी' समजून आपली सेवा श्री ठाकूरांचे चरणी लागू करावी म्हणून देणारे देखील असंख्य आहेत. त्यामुळेच तर विविध नवीन उपक्रम हाती घेणे मंडळाला शक्य झाले. रोपट्याचे वृक्षात व पुढे महावृक्षात स्थित्यंतर होण्यासाठी लागण्याऱ्या सर्वच बाबिंची पूर्तता होऊन त्याला जोपासणे अपरिहार्य आहे. तूर्तास या सेवा मंडळाचे रोपटे जरा कुठे जोम धरत आहे. त्याला वृक्षात परिणत व्हायला थोडा काळ लागेल. परंतु, त्याला 'जास्तीतजास्त निस्वार्थ व्यक्तिंच सक्रीय योगदान रुपी 'मशागत' आणि लोकांचे दानरुपी 'खतपाणी' यांची योग्य पूर्तता झाल्यानेच सेवा मंडळाच्या रोपट्याची वृक्षात व कालांतराने महावृक्षात परिणती व्हायला मुळीच वेळ लागणार नाही.

सेवा मंडळाच्या कार्याला मुख्यत्वे करुन रामकृष्ण मठ, नागपूरचे अध्यक्ष प. पू. स्वामी ब्रह्मस्थानंदजी महाराज, व इतर साधु सन्याशांचे आशिर्वाद तर मिळतातच शिवाय दैनंदिन कार्यासाठी आपुलकीने काटेकोर मार्गदर्शन देखील प्राप्त होते. त्यामुळे वाटचाल सुबध्दतेने व योग्य दिशेने होण्यास मोलाचे सहाय्य होते. मंडळ त्यांचे सदैवच ऋणाईत राहील. येथे आवर्जुन उल्लेख करावा लागेल की परं सौभाग्याने या मंडळाला रामकृष्ण मठ व रामकृष्ण मिशनचे इतरही वरिष्ठ सन्यासी त्यांच्या व्यस्त कार्यक्रमांमधून वेळ काढून या मंडळाचे विनंतीवरुन आश्रमाला भेट देवून, प्रबोधन करतात. प. पू. स्वामी सत्यरुपानंदजी महाराज, सचिव रामकृष्ण मिशन, विवेकानंद आश्रम, रायपूर (छ. ग.), स्वामी अकामानंदजी महाराज, रामकृष्ण मठ, कनखल, प. पू. स्वा. भौमानंद महाराज, अध्यक्ष, रामकृष्ण मठ, पुणे, प. पू. स्वामी योगात्मानंद महाराज, प्राव्हीडंस (अमेरिका), प. पू. स्वामी निखिलात्मानंदजी महाराज, अध्यक्ष, रामकृष्ण मठ, अलाहाबाद (उ.प्र.) प. पू. स्वामी विष्णुपादानंदजी महाराज, सचिव रामकृष्ण मिशन, इंदूर (म.प्र.), प. पू. स्वामी तत्वज्ञानानंदजी महाराज, प्राचार्य शिल्पमंदीर, सारदा मठ बेलूर या सर्वांचे आशिर्वाद व मार्गदर्शन आम्हाला सतत लाभत असते.

***आता जरा मंडळाच्या कार्याचा संक्षिप्त आढावा घेवू या.***

- महाविद्यालयीन छात्रांकरिता बहूतांश व्यक्तिमत्व विकास शिबीरांचे आयोजन रामकृष्ण मठ व रामकृष्ण मिशनच्या वरिष्ठ संन्याशांचे आचार्यत्व व मार्गदर्शनाने करण्यात येते. तसेच श्री नविनीहरण मुखोपांध्याय सचिव, अ. भा. युवा महा मंडळ, कोलकात्ता यांचे मार्गदर्शना खाली शिबीरं घेण्यात येतात.

- अभ्यास मंडळाद्वारे युवकांसाठी तज्ञांचे मार्गदर्शनाखाली योगासन, आत्मरक्षणपर ज्यूडो कराटे, लाठी काठी चे प्रशिक्षण वर्ग घेण्यात येतात.सोबतच युवकांकरीता व्यवसाय मार्गदर्शन, कलचाचणी (ॲप्टीट्यूड टेस्ट)आणि मॅट्रीक करीता निशुल्क शिकवणी वर्ग यांचे पण आयोजन केले जाते.
- डॉ. रघुनाथ जे. भालेराव, विभाग प्रमुख, झूलॉजी, निपाणी (कोल्हापूर) यांची विद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी स्वामी विवेकानंदांचे जीवन आणि त्यांचा संदेश यावर भाषणे आयोजीत केली जातात.
- स्वामी विवेकानंद महासमाधी शताबिद्व वर्ष २००२ - २००३ अंतर्गत विविध विद्यालये व महाविद्यालयां मध्ये स्वामीजींचे जीवन व संदेश यावर सचित्र प्रदर्शनीचे आयोजन व सोबतच रामकृष्ण - विवेकानंद भावधारे संबंधी वेदांत साहित्य विक्री देखील करण्यात येते.
- आश्रमात वेदांत साहित्य विक्रीची स्वतंत्र व्यवस्था व वाचनालय पण आहे.
- अकोला येथे रामकथा, भागवत इ. चे आयोजनांच्या ठिकाणी वेदांत साहित्य विक्रीचे दालन उभारून विक्री करण्यात येते.
- दरवर्षी १२ जानेवारी (स्वामी विवेकानंद जयंतीला) - युवा दिना चे कार्यक्रमांमध्ये निबंध व वक्तृत्व स्पर्धा आणि त्या दिवशी स्वामीजींच्या पूर्णाकृती भव्य प्रतिमेची शहर राष्ट्रीय सेवा योजना, विविध विद्यालये, महाविद्यालये, सेवाभावी संस्था, सामाजिक संस्था यांच्या सहयोगाने अकोला शहरातून विशाल मिरवणुकीचे आयोजन करण्यात येते.
- विवेकानंद अभ्यास मंडळाच्या चर्चा वर्गांना प्रा. पंडा, श्री संत गजानन महाराज अभियांत्रिकी आणि तांत्रिक महाविद्यालय, शेगांव, डॉ. टिंगरे, प्रा. थोते, यांचे मार्गदर्शन लाभते
- जेव्हा जेव्हा रामकृष्ण मठ, नागपूर व इतर आश्रमांतून स्वामीजी उपलब्ध होतात तेव्हा आध्यात्मिक व्याख्यानमाला व आध्यात्मिक साधना शिबीरे आयोजित केल्या जातात.
- मंडळाने सुरु केलेल्या धर्मार्थ वैद्यकीय सेवांचा लाभ जवळपासच्या शहरी व ग्रामीण लोकांना होत असून त्या अत्यंत उपयोगी असल्याचे दिसून आले आहे. डॉ. मधुकर गावंडे, डॉ. चिंचोलकार, डॉ. पाटील आणि महिलांकरिता डॉ. सौ. विमलताई गावंडे विनामुल्य वैद्यकीय सेवा देतात.
- दर रविवारला दुपारी ५ ते ६ दरम्यान रामकृष्ण मिशन व मठांच्या जेष्ठ सन्याशांच्या ध्वनिमुद्रित फितींचे श्रवण केले जाते.
- मंदिरात प्रतिदिन सकाळ सायंकाळची आरती व भजन होते. तसेच भगवान श्रीरामकृष्णदेव, माँ सारदादेवी, स्वामी विवेकानंद, यांच्या तिथीनुसार जयंती उत्सव तसेच गुरु पौर्णिमा व दुर्गा महाष्टमी उत्सव साजरे केल्या जातात. अशा उत्सवांना ३०० ते ४०० लोक असतात. शिवाय भगवान श्रीरामकृष्णांचे पार्शदांच्या जयंत्या साजऱ्या केल्या जातात.

भगवान श्री रामकृष्णदेवांच्या असीम कृपेने मंडळाचे कार्य सुबध्दपणे व योग्य दिशेन मार्गक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहे. यासाठी विविध क्षेत्रातील गणमान्य व्यक्ति, भक्त, प्राध्यापक, शिक्षक, व्यापारी वृंद, सेवाभावी संस्था, सामाजिक संस्था, प्रतिष्ठाने, धार्मिक संस्था, महाविद्यालये, विद्यालये यांचा सक्रीय सहभाग, उदार देणग्या यामुळेच मंडळाने अंगिकारलेले हे सेवा व्रत प्रगतीपथावर आहे. त्या सर्वांचा रामकृष्ण विवेकानंद सेवा मंडळ सदैव ऋणी आहे. सर्वांकडून आशिर्वादाची व सहकार्याची आकांक्षा व्यक्त करुन त्या सर्वांना आदरपूर्वक धन्यवाद देण्यात येत आहेत.

अध्यक्ष सचिव

**श्री रामकृष्ण विवेकानंद सेवा मंडळ, गीता नगर, अकोला**



II Shree Ramakrishna Sharanam II

## *Our Holy President*

*Ramkrishna Math and Ramakrishna Mission has Galaxy of Rishi and Muni as Presidents. The first in the order of Monks was Swami Brahmanandaji and the present president Rev. Swami Ranganathanand Maharaj is the 13 th president in the order of Monks .Born on15 th december, 1908 in Trikkur village of Kerala State and the senior most monk, now will be entering the 95 th year of his age on 15 th dec. 2002. He joined Ramkrishna math & Mission at the age of 18 years in 1926 and assumed the responsibility as President from 1993.*

*The visit to this Ashram by Rev. Swami Atmasthananda Maharaj on 12 dec. 2002 is taking place just two days earlier Swami Ranganathanand Maharaj's date of birth of Rev. President's this 95th birth day & all the devotees of this centre pray Bhagwan Shri Ramkrishna for the blessings and good health with long centenerian life for the welfare of Ramakrishna Math & Mission and welbding of humanity at large. We seek this opportunity to express our feelings and affection with profound reverence, great respect towards him. We profoundly adore and revere him and find him enthroned in our hearts. We look in him a 'Maharshi', and a sacred Monk. Further he commanded this unique position as eminent thinker, a great philosopher, a great visionary and versatile personality in the world, due to his tremendous out standing literature in terms of many book and papers on upliftment of humanity, spirituality and human excellence.*

*He toured world extentively and visited more than 50 different countries on invitations from those countries and constantly endeavoured to disseminate the Message of Vedanta Philosophy pursued by the Ramkrishna Math and Ramkrishna Mision as one of the objects laid down and envisaged by Bhagwan Shri Ramkrishna and Srimat Swami Vivekananda."*

*The recent publication entitled 'Universal Message of the Bhagwatgeeta,An exposition of Geeta in the light of modern thought and modern needs is not only unique and outstanding but has been highly praised and valued by eminent personatilities viz., Dr. Rafiq Zakeria, Shri R. K. Trivedi and Dr. P. C. Alexander.*

*In view of Edwin Arnold well known philosopher and great thinker the 'Geeta's Universal and humanistic teachings are universal in nature and called it as 'Song Celestial'.*

*Most of the world philosophers expressed that the "Message of Geeta", must enter in to the life blood of modern society and aforestated exposition may help it to do so. This publication is very much in demand by readers and hence this cetre has arreanged for its availability at this Ashram.*

***President***
*Shri Ramkrishna Vivekananda Seva Mandal*
*Geeta Nagar, Bye Pass Road, Akola*

# स्वामी भाष्यानंदजी एक व्यक्तिदर्शन

**स्वामी तत्वज्ञानानंद**
प्राचार्य, शिल्पमंदिर, सारदापीठ, बेलुर मठ

''तू कधी विचारतोस त्याची वाटच पहात होतो. माताजींच्या येत्या वाढदिवसाला तुला दीक्षा देईन'' स्वामी भाष्यानंदजींनी मला आश्वासन दिले आणि माझा जीव भांड्यात पडला. 'अध्यात्म', मंत्र दिक्षा या गोष्टी एका अर्थाने मला नविनच होत्या आणि फारशा कळायच्या पण नाहीत. परंतु अंतरीची एक ओढ जी आईबद्दल मुलाला वाटावी तसं काहीतरी मला त्यांच्याबद्दल वाटायचे. त्यांना शिकागो आश्रमात भेटून मला फक्त एकच वर्ष झाले होते पण १९७६ च्या वरच्या प्रसंगी मला त्यांच्याशी वर्षानुवर्षे ओळख असल्यासारखे वाटत होते आणि त्यांच्या वागण्यात सुध्दा तोच भाव दिसला. याशिवाय योगायोगाने मला एक मोहन नावाचा दाक्षिणात्य मित्रपण असा भेटला की ज्याने मला त्यांच्याकडे दीक्षा घेण्यास प्रोत्साहन दिले. हा मित्र पुढे रामकृष्ण संघाचा संन्यासी झाला.

योगायोग म्हणावं, कर्मफळ म्हणावं की ईश्वरेच्छा म्हणावी, रामकृष्णांबद्दल मला पहिल्यांदा समजलं ते शिकागो शहरातल्या विवेकानंद वेदान्त (काही लोक चुकीने वेन्डाटा म्हणायचे) सोसायटीत. मुंबईत माझी शाळा रामकृष्ण मिशनच्या खार शाखेपासून दहा मिनिटाच्या अंतरावर दूर होती आणि माझे घर चालत वीस मिनिटाच्या अंतरावर परंतु वीस वर्षाच्या माझ्या मुंबईच्या वास्तव्यात एकदाही आश्रमात पाऊल ठेवण्याचा वा ठाकूरांची, माताजींची छबी पाहण्याचा एकदाही प्रसंग आला नाही. स्वामी विवेकानंदांच्या कन्याकुमारी मंदिरासाठी काही पैसे जमा करण्यापलिकडे त्यांचा पण परिचय नव्हता. पण मनामध्ये माझ्या बाराव्या वर्षी आई गेल्यानंतर एक पोकळी निर्माण झाली होती ती भरण्यासाठी केलेल्या विविध प्रयत्नांत उच्च शिक्षणासाठी (Architecture) शिकागोच्या Illinois Institute of Technology (IIT) ला अभ्यास करायला आणि नंतर नोकरी करुन डॉलर्स कमवायला गेलो असतांना १९७५ साली स्वामीजींचे प्रवचन ऐकण्याची संधी आली. रविवारचा दिवस होता व कुठल्याच मंदिरात कधीही न जाणारा मी माझ्या मित्राला माझ्या गाडीने सोडण्यासाठी म्हणून वेदांत सोसायटीसमोर गेलो, त्याच्या आग्रहामुळे आत गेलो आणि स्वामीजींच्या पहिल्या प्रवचनात त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या प्रेमात पडलो. मला विषय नक्की आठवत नाही पण त्यांनी पहिला विचार सांगितला तो मला पटला दुसरा सांगितला तो आवडला आणि अस करता करता प्रवचन कधी संपलं आणि मी पूर्णपणे कसा ओढला गेलो हे मला समजलेच नाही. ठाकूरांच्या गोष्टीतल्या मोरासारखी अफूच्या गोळीची चटक लागली आणि मी परत परत जायला लागलो. प्रथम रविवारी नंतर मंगळवार, शुक्रवार, संध्याकाळच्या क्लासला. शेवटी आश्चर्याची गोष्ट अशी की जो मित्र मला प्रथम तेथे घेऊन गेला होता, तो १९७६ मध्ये परत येऊन मुंबईला स्थायिक झाला, त्याने विवाह केला आणि आज अरविंद डुकले हा स्वतःची Structural Engineering Firm ग्रॅन्ट रोडला चालवतो आणि मी स्वप्नातही बाधितले नव्हतें सन्यासी कसा असतो ते आणि अध्यात्म कशाशी खातात, तो मी श्री रामकृष्णांच्या असीम कृपेला पात्र झालो हे शक्य झाले केवळ स्वामी भाष्यानंदजींच्या प्रभावी व्यक्तिमत्वामुळेच.

वेदांत सोसायटीची इमारत त्यावेळी ५४२३ दक्षिण हाईड पार्क बुलेवार्डवर होती (अजूनही आहे) आणि रस्त्यावरुन जाणाऱ्या कोणाच्याही नजरेत भरण्यासारखा तिचा समोरचा भाग (Facade) सागवानाच्या लाकडाने मढवलेला होता. नियमित जायला लागल्यावर असं समजलं की स्वामी विश्वानंदानी (स्थापक स्वामी ज्ञानरुपानंद (?) च्या नंतरचे प्रमुख) देह सोडल्यानंतर तेंव्हाचे महासचिव स्वामी माधवानंदानी स्वामी निखिलानंदांचे (न्यूयॉर्क मिशन) सहाय्यक स्वामी भाष्यानंदाची तेथे नियुक्ती केली. स्वामींनी शिकागोची



*'स्व. विश्वास विष्णु खडसे यांचे स्मरणार्थ' सौजन्य - सौ. माधुरी उमेश भालेकर, अकोला*

धुरा सांभाळली १९६७ मध्ये तेंव्हा बँकेत जमा होते ५०० डॉलर्स आणि विविध संकटांना तोंड देत ७ - ८ वर्षातच सोसायटीच्या तीन इमारती झाल्या. एकात देवघर, सभागृह, साधूनिवास, स्वयंपाक घर वगैरे, दुसरीत अतिथीघर, वाचनालय, पुस्तक विक्रय विभाग व शिवानंद हॉल (मेळाव्यासाठी सभागृह) व तिसरीत महिला भक्त निवास. शिवाय गँजेसला (असं ऐकलंकी बडोद्याचे गायकवाड अमेरिका सफरीवर गेले असताना त्यांच्या सन्मानार्थ पाच गावांना त्यावेळच्या मिशीगन स्टेटच्या गव्हर्नरने भारतीय नांवे दिली त्यात गँजेस एक होते आणि बाकी चार होती निर्वाण, बाँबे, दिल्ली व बडोदा) ही एकशे एकरची जागा शिकागोहून डेट्राईटला जायच्या मार्गावर Monastery & Retreat म्हणून घेण्यात आली. गँजेस मोनॅस्ट्रीला स्वामी भाष्यानंदजी स्वामी विवेकानंदांची ईच्छापूर्ती म्हणायचे.

सोसायटीत जायला लागल्यावर वासुदेव पंड्या या एका गाढया भक्ताबरोबर ओळख झाली आणि वर उल्लेखलेल्या अरविंद डुकले या मित्रासहित व त्याच्या आणि एका सतपाल पटेल म्हणून मित्रासहित सगळे एकाच कंपनीत Architect Engineer म्हणून काम करायचो. त्यामुळे ती ओळख दाट झाली. पंड्याजींनी मला गँजेसच्या कामात गुंतवले आणि नोकरी Post Graduation व गँजेसचे बांधकाम असे तीन प्रकारचे काम मी करु लागलो. स्वामीजी स्वत: दर बुधवारी सकाळी गँजेस ला जायचे व शनिवारी सकाळी परत फिरायचे. पंड्याजींच्या बरोबर जाऊन पहिल्यांदा भेटलो स्वामी तापसानंदाना (महावीर उर्फ पीटर) आत्मलोकानंदांना (बाबा उर्फ ग्लेन डॅवनपोर्ट) स्वामी आत्मप्रभानंदाना (अनंत उर्फ ब्रूस हिलिंगर) व स्वामी भावेशानंदांना (राम उर्फ ?) स्वामीजींच्या प्रेरणेने या सर्वांनी मिळून एक धान्यकोठार उभं केलं होतं व सपाट्याच्या वाऱ्याने हलू लागले म्हणून पंड्याजींच्या मार्गदर्शनाखाली (Structural Engineer) एक मजला घालून त्याला स्थिर केले होते. उद्देश होता एक ठाकूरघर व सभागृह इमारत बांधण्याचा ग्रामीण प्रकारच्या परिवेशामध्ये. विशेष म्हणजे यातले कोणीच इमारत बांधकामात माहितगार नव्हते पण स्वामीजींच्या प्रेमाने व प्रेरणेने बांधकामात भिडले होते. मी त्यांच्याशी समवयस्क असल्याने समरस झालो व त्यांच्या अदम्य उत्साहाने, तन्मयतेने व शक्तीने त्यांच्याकडून बरंच काही शिकलो. शिकागो आश्रमात स्वामी कालिकानंद (जॉन सिएग्रा) व्यवस्थापक, स्वामी वरदानंद (गणेश उर्फ चार्ल्स स्ट्रीटर) स्वामी अनामानंद आणि गँजेसला स्वामी योगेशानंदासहित वर उद्धृत केलेले स्वामी अशी व्यवस्था होती. यामध्ये स्वामीजींचे शिष्य फक्त तापसानंद व अनंत हे दोघेच परंतु त्यांचा दबदबा सर्वावरच होता. स्वामीजींची शिकागोतली वागणूक गँजेसची वागणूक वेगवेगळी असाचयी व मला तो फरक जेंव्हा मी स्वत: गाडी चालक होऊन त्यांना घेऊन जायचो शिकागोहून गँजेसला तेंव्हा विशेष बघायला मिळायचा. शिकागो भक्त मंडळीबरोबर मवाळरीतीने वागणारे स्वामीजी गँजेसला जाताना रस्त्यातच (१३५ कि.मी २.३० तास) गंभीर होऊन जायचे व त्यांच्याकडे बघायला पण भीती वाटायला लागायची जणू काही फुलून जायचे स्वामी विवेकानंदांच्या व्यक्तिमत्वाच्या आवेशाने. गँजेसला त्यांची वागणूक धीर गंभीर परंतु आक्रमक असायची. त्यांचे सकाळचे आम्हा ब्रह्मचाऱ्यांचे (काही वर दिलेले स्वामी तेंव्हा ब्रह्मचारी होते क्रमाने सन्यासी बनले) उपनिषदांचे वर्ग पण जोरदार असायचे व आम्ही सर्वजण स्तब्ध व हालचाल न करता बसून प्रत्येक शब्द झेलायचो. सकाळच्या वर्गानंतर आमची सर्वांची बॅटरी चार्ज व्हायची ती संध्याकाळी आरतीपर्यंत. त्यांच्या मुखातून निघणारी काही वाक्ये गोळ्यांच्या वर्षावा सारखी माणसाला विंध्द करुन टाकायची व आम्ही स्वेच्छासेवक वेठीच्या गुलामासारखे काम करायचो. कामात पैशाची वा स्वेच्छासेवकांची कधीच कमतरता भासली नाही. अगदी जेव्हा हवं तेव्हा पैसा व लोक खेचून घेतल्यासारखे यायचे. एकदा आठवते दुसऱ्या मजल्यावर जाण्यासाठी एक सागवान लाकडाचा जिना बनवायचा होता पण सुतार नव्हता. अचानक डेव्हिड म्हणून एक सुतार येऊन दहा

दिवसात काम करुन निघून गेला. त्याच जिन्यावरचे छत करायचे होते आणि बर्फाचे वादळ आले जिन्यावर व प्लायवुड जमिनीवर बर्फ.साठून त्याचे नुकसान होणार असे दिसत होते. तापसानंदांनी मला म्हंटलं चल मदत कर आम्ही दोघे त्या थंडीत वर उठलो व लाकडाचे ते छत पुरा दिवस काम करुन पूर्ण केले.

स्वामीजींची काम करवून घ्यायची पध्दत वेगळीच होती. गँजेसला बांधकाम सुरु व्हायच्या आधी मला त्यांनी म्हटलं की आम्ही वर्षातून दोन तीन कार्यक्रम करतो तेव्हा ३००-३५० मंडळी येते. त्यासाठी सभागृह, भोजनगृह व एक भारतीय संग्रहालय हवे. यानंतर आमच्या पुऱ्या चमूला इमारत कशी करायची याची मोकळीक देण्यात आली होती. मी आर्किटेक्ट व तापसानंदाचा सहायक, पंड्या इंजिनियर, तापसानंद बिल्डर्स अॅन्ड प्लंबर, अनंत इलेक्ट्रीशियन व बाबा All purpose हे सोडून हात लावायला बरीच इतर मंडळी यायची. आवश्यकतेनुसार बांधकामासाठी डेट्रॉईटवरुन शर्माजी यायचे व लॅन्ड मूव्हर रॉन म्हणून एक स्थानिक कंत्राटदार यायचे. बाकी शिकागोवरुन मंडळी यायची व सर्वच कसे भारल्यासारखे काम करायचे. स्वातंत्र्य मिळायचे पण मुले खेळत असली तरी आई लक्ष ठेवून असते तसे. स्वामीजींची बारीक नजर असायची आणि पुऱ्या जागेशी ते असे काही एकरुप होते की कुठल्या कोन्यात काय चाललं आहे त्याची इत्थंभूत माहिती प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष त्यांना असायची.

स्वामीजींच्या ओळखी व त्यांची जनमानसावरची पकड ही विशाल क्षेत्रात होती. बिरला कुटुंब त्यांचे चाहते होते आणि रायपूरच्या स्वामी आत्मानंदांच्या सहाय्याने त्यांनी गँजेसच्या भारतीय संग्रहालयासाठी बिरलांकडून मोठी आर्थिक देणगी व तत्कालीन मध्यप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांकडून (श्यामाचरण शुक्ल) मोठ्या प्रमाणात सागवान लाकूड गॅजेसला आणले होते. गँजेस इमारतीसाठी भोजनगृह व संग्रहालय यामधला मोठा दरवाजा हा श्री लायडेकर म्हणून,एका यहुदी भक्ताने न्यूयॉर्क ला झालेल्या भारतीय Expo प्रदर्शनी दालनातून मिळवून दिला होता. शिकागोच्या तारामंडळाचे (Planetorium) क्युरेटर हे स्वामीजींचे शिष्य होते. बरेचसे प्रोटेस्टंट पाद्री सुध्दा त्यांचे चाहते होते व एक तर सहकुटूंब त्यांचा शिष्य बनला होता. १९७८ वा ७९ ला एकदा आम्ही सर्व मिळून रामनाम व भोजनासाठी सॅम पिगोडाच्या घरी गेलो होतो. त्याची पत्नी स्वामीजींची शिष्या होती व नंतर सॅम भारताच्या टेलेकम्युनिकेशन क्रांतिचा (राजीव गांधीच्या वेळी) कर्णधार बनला होता. आता तो जागतिक दूरभाष्य मध्ये (World Tele-commuication), मुख्य कार्यकारी अधिकारी आहे असे ऐकले. राजकुमार म्हणून एक मोठे स्टील मील मालक,त्यांचे रसतदार होते. जवळजवळ १५ वर्षे त्यांची अमेरिकन पत्नि पॉला स्वामीजींची खास चाहती होती. Advaita Vidanta & Modern Science चे लेखक श्री जॉन डॉबसन हे पण वारंवार तेथे यायचे.

स्वामीजींना माणसे जोडायची कला अवगत होती. शरण आलेल्या माणसाला त्याच्या संकटकाळात अपेक्षेबाहेर मदत करायचे त्यामुळे त्यांच्या आजूबाजूला सर्व प्रकारची गरजू मंडळी जमा व्हायची आणि एकदा कक्षेत आली की कायमची दास होऊन जायची. अशी किती उदाहरणे सांगू.

लुईस जॉर्डन म्हणून एक पोर्टरिकन गृहस्थ मला आठवतो. हा स्वामी विश्वानंदाचा शिष्य. वयस्क आणि प्रेमळ परंतु बायको त्याची वयाने कमी आणि अमेरिकन समाजातल्या काही दोषानुसार ती मुक्तछंद वागायची. तीन मुले होती पण शेवटी बाईसाहेबांनी प्रतारणा केली व लुईसचे डोके फिरले डॉक्टरांनी सांगितले इस्पितळात नेऊन विद्युत झटके द्यायला लागतील. अशा परिस्थितीत त्याने स्वामीजींना फोन केला आणि स्वामिजींचे उत्तर तो मला नंतर जेंव्हा,बरा होऊन भेटला तेंव्हा सांगीतले. स्वामीजींनी त्याला म्हटले खबरदार एकदम जाऊ नकोस येथे आश्रमात निघून ये आणि रहा सगंळं ठीक होईल. लुईस आला बरा झाला आणि राहून गेला. रॉबर्ट टिंगलर

हा तरुण मुलगा आईवडिलांच्या घटस्फोटानंतर आपल्या घरुन पळून गेला आणि हिप्पी युवकांच्या कळपात सापडून मादक द्रव्यांचे चक्रात सापडला. अशा परिस्थितीत तो भेटला स्वामीजींना. त्यांनी त्याला आश्रमात ठेवले व काही दिवसातच बराचसा सरळ झाला. मुलगा फारच सरळ व प्रेमळ पण मधून मधून वेड्यागत स्वत:शीच हसायचा पण कधीच हिंसक झालेला बघितला नाही. एक जोड गोळी यायची जेरी व जिन. जिन एकदम चुपचाप असायची पण जेरी बडबड्या होता पण खुरडत चालायचा. त्याला मी विचारलं काय झाले पायाला आणि तो यहुदी असून आश्रमात कसा? तेव्हा त्याच्या डोळ्यात पाणी आले व म्हणाला मला लकवा झाला होता व हताश झालो होतो आणिशेवटचा उपया म्हणून स्वामीजींकडे आलो त्यांनी म्हटलं मी प्रार्थना करिन आणि तिथपासून विकृती कमी झाली आणि तो फिरु लागला. जिन जड व नॅन्सी बॉयड म्हणून दोन महिला भक्त जे आश्रमाचं काम सांगल ते त्या करायच्या. ऐकलं की जिनचा घटस्फोट झाला होता आणि फ्लॉरिडाचं आपलं स्थान सोडून तिच्या एकुलत्या एक मुलीस ती स्वामीजींच्या सान्निध्यासाठी येऊन नेमरविल म्हणून जवळच्या उपनगरीत रहायची. दररोज यायची. डेव्हिड पॉचन म्हणून एक बारीक केसाचा पण दाढी मिशी ठेवलेला थोडा गलिच्छ, पन्नाशीतला पुरुष स्वामीजींची व्यक्तिगत सेवा खूप मन लावून करायचा पण त्याचं स्वामी कालीकानदांशी (व्यवस्थापक) जमायचे नाही (अर्थात स्वामी कालिकानंद इटालीयन व मुळचे सैन्यातले असल्याने अनेकांचे त्यांच्याशी जमायचं नाही) इतर बाबतीत उदासीन डेव्हिड स्वामीजींना बारकाईने मदत करायला तत्पर असायचा. दोन ब्रह्मचारी व्हायला आलेले युवक आठवतात एक भास्कर व दुसरा जगन्नाथ. असे युवक आले की स्वामीजी त्यांना उचित भारतीय नांव द्यायचे त्यामुळे सर्वांची पूर्वीची नांव आठवत नाहीत. भास्कर हा गंमतशीर असून खेळकर बदमाशी करण्यात हुशार व कामामध्ये फार सुसंगत. जगन्नाथ हा बहुतेक घटस्फोटित त्यामुळे थोडा साधनेत मंद होता परंतु स्वामीजींकडे बघण्याची त्यांची दृष्टि आदरमिश्रीत भक्तीची होती. जिम व ऑक्टेव्हिया हरिस्टन हे निग्रो दांम्पत्य विशेष भक्तिमान होते व दरवर्षी आम्ही सर्व त्यांच्या घरी शिकागोच्या दक्षिणेला जायचो विशेषकरुन स्वामी रंगनाथानंदजी आले की. जिम हा रागीट पण ऑक्टेव्हिया धोरणी होती,(बहुतेक ती सोसायटीच्या समितीवर उपाध्यक्ष होती अध्यक्ष सलकीन म्हणून एक यहुदी वकील होते) गोऱ्या लोकांवरच्या रागामुळे ओबडधोबड जिम माझ्याबरोबर मैत्री करायचा. जोगी मखिजा, इंदिरा मखिजा ही पंजाबी मंडळी (इंदिराचे वडिल मदन हे नंतर मला भेटले Indian Society for Tech. Education चे अध्यक्ष म्हणून भारतात) दोन घर सोडून राहायचे. त्यांची मुले गीता व पंकज आश्रमातच मोठी झाली. एक गोरं दाम्पत्य कॅमेरान व बीजे पण यांची (Sam) शाम व (mary) मीरा ही मुले आश्रमात सारखी आईबरोबर असायची. सत्पाल पटेल हा एक अविवाहीत, नियमित वर्गाला यायचा आणि संधी मिळाली की स्वामीजींना प्रश्न करायचा. तो आता आश्रमात रहातो असं ऐकलं. स्वामी अनामानंद नावांचे एक म्हातारे गोरे साधू रहायचे. पण सारखे आजारी असायचे. त्यांना डोकेदुखीसाठी ॲनासीन घ्यायला लागायचं. अस ऐकले की दिवसा १०-१२ गोळ्या घ्यायचे व चिडचिडे असायचे. एकदा मी त्यांना सुप्रभात म्हटले असता त्यांनी चिडून त्यात काय असे चांगले आहे म्हणून धुडकावले होते. पण स्वामीजींच्या समोर ते गोगलगाय व्हायचे.

इतर काही कार्यक्रम झाला की शिकागो गँजेसला स्वेच्छासेवी महिलांची मोठी सेना काम करायला लागायची. गोऱ्या, काळ्या, अमेरिकन, भारतीय सगळ्या एकत्र काम करायच्या आणि घरगुती वातावरण असायच, पूर्णपणे जणू काही तो एक मोठा परिवारच होता.

गँजेसला भारतीय संग्रहालय सजवण्यासाठी भारतात मोठी खरेदी केली गेली. विविध वस्तूंची व

त्या पाठवल्या गेल्या जहाजावरुन. महाभारत, रामायण, ठाकूर माँ व स्वामीजी यांच्या जीवनावर diorama करण्यात आले त्यासाठी बाहुल्या हव्या होत्या त्या व खोक्यातील उचित दृश्य ही तयार करायला स्वामीजींनी मुंबई, दादरवरुन नलिनी म्हात्रे यांना जवळजवळ सहा महिने आणून काम करवून घेतले होते.

सन १९७६, डिसेंबर मध्ये माझी दीक्षा झाली, माझे स्नात्तकोत्तर शिक्षण पुरे झाले आणि १९७७ जानेवारीत मी स्वामीजींबरोबर आश्रमात रहाण्याची इच्छा प्रकट केली. ती त्यांनी ताबडतोब स्वीकारली. त्यांचा दिनक्रम विलक्षण पध्दतशीर होता व समयानुसार चालायचा. गणेश झोपेतून कसंबसं उठून डोळे चोळत ४-१५ ला देवघर उघडायचा पण स्वामीजी बरोबर ४.३० ला येऊन एक हरिणासन असायचे त्याच्यावर मांडी घालून बसायचे काही वेळ माळेने जप करुन स्तब्ध व्हायचे व काही वेळातच पूर्ण परिसर स्तब्ध होऊन जायचा. सापाच्या फण्यासारखे ताठ बसलेले वयस्क स्वामीजी समोर बघून आम्ही ब्रह्मचारी मागे बसून ध्यानासनात डुलकी काढण्याचे साहस लाजेने करु शकत नव्हतो. ५.२० ला गीतेचा अध्याय पाठ व्हायचा व ५.३० ला श्रीरामकृष्ण स्तव: (विशुध्द विज्ञान...) श्री सारदास्तव: (प्रकृतिं परमाम्...) विवेकानंद पंन्च्यक (विवेकानंद निमचित्तम...) व त्यानंतर the Sanyasin हे त्यांनी कधीच चुकवले नाही. प्रार्थनेनंतर अर्धा तास गीतेचे शांकरभाष्य घेऊन वर्ग व्हायचा तो ६.३० पर्यंत. नंतर आपल्या कक्षात जाऊन ७ वाजता सकाळची न्याहारी करायचे. नंतर आश्रमांत एक चक्कर मारुन कक्षात जात. ९ वाजता समोरच्या व्हरांड्यात त्यांचे ऑफिस होते. तेथे बसून चहा पिणे, पेपर वाचणे व सकाळचे दोन चार जणांबरोबर बोलणे ते ११ पर्यत चालायचे. नंतर आंघोळ करुन परत येऊन बसायचे ऑडियोवर शास्त्रीय संगीत वगैरे ऐकणे व कोणी पाहुणे आले असल्यास त्यांच्याशी बोलणे करुन १२ ला दुपारच्या जेवणाची घंटा पडली की माझ्यासारखं कोणी असलं की ''चलो'' म्हणत स्वयंपाकघराकडे Basement निघायचे. जिना उतरुन तळमजल्यावर ठाकूर घराच्या दरवाजातून ठाकूरांना नमस्कार करुन खाली जायचे. जेवतांना बोलणे जवळजवळ नसायचे. जेवणानंतर वामकुक्षीनंतर ३ वाजता येऊन बसणं कामकाजासाठी विशेषत: कालिकानंदा बरोबर, व ४ वाजता चहा घेऊन परत भेटीगांठी इत्यादि चालायच्या. संध्याकाळी ६ वाजता जेवण असायचं आणि ७ वाजता मंगळवारी व शुक्रवारी उपनिषद, नारद भक्तीसूत्र वा प्रकरण ग्रंथ यावर वर्ग व्हायचे साधकांसाठी आणि सर्व काही घड्याळांच्या काट्याप्रमाणे चालायचे बर्फ असो वा पाऊस असो. याबाबतीत जरी पाहुणे स्वामी आले. स्वामी अशेषानंदजींसारखे, तरीही त्यांना सूट मिळायची नाही.

शिकागो गँजेस सोडून स्वामीजींचे वर्षाला जवळजवळ २५००० मैलांचे परिभ्रमण अमेरिकेत कॅनडात व हवाई वगैरे जागी व्हायचे. (दर दोन वर्षांनी भारताची तीर्थयात्रा हमखास असायची) उत्तरेला Philadelphia पासून Vancover दक्षिणेला Tampa पासून Sandiago, मध्यवर्ति जागी डेन्वर, ओहिओ वगैरे ठिकाणी निरनिराळी भक्तमंडळे त्यांना आवर्जून बोलवायची. व्यवस्थापक स्वामी कालिकानंद त्यांना गंमतीने Visiting Swami म्हणायचे. परंतु शिकागोत ते असले की प्राण असायचा आश्रमात आणि ते नसले की मोजके लोकं यायची. या भ्रमंतीमुळे त्यांचे जवळजवळ ३००० हून जास्त दिक्षित भक्त झाले होते व सर्वांची नोंद ते आपल्या डायरीत करायचे. जास्त करुन माताजींच्या वाढदिवसाला दीक्षा व्हायची (शिकागोत) आणि पध्दत अगदी सोपी पण परिणामकारक व्हायची. आधी काही पुस्तके वाचून यायला सांगायचे व सकाळी उपाशी पोटी फळं फुल घेवून दीक्षार्थी यायचा, नंतर दरवाजा बंद करुन एकाचीच एकावेळी दीक्षा व्हायची व त्यावेळी वातावरण घमघम करायचं भावाने. मंत्र देऊन मग विवरण करायचे व पूर्ण सोहळा १-१.३० तास चालायचा पण माणसावर खोल



सौजन्य - श्री कायनेटिक वर्ल्ड, वैष्णवी कॉम्प्लेक्स, गौरक्षण रोड, अकोला

परिणाम करुन द्यायचा. एक जपमाळ व एक सूचनापत्रक पण देण्यात यायचं. दैनंदिन व्यवहार कसा असावा याची सूचना त्यात असायची.

१९७६ ची एक घटना आठवते अमेरिकेचे द्विशताब्दि वर्ष होते आणि स्वामीजी बोस्टन ला Smithsonian Institute च्या कार्यक्रमाला जाऊन आले होते. या कार्यक्रमात एक प्रदर्शन मांडले गेले होते व एक पुस्तक प्रकाशित केले गेले त्याचे नांव Abroad in America. यात स्वामी विवेकानंदाना श्रध्दांजली दिली गेली होती ती अशी **'एक विशेष व्यक्ती की ज्यांच्या आगमनाने अमेरिकेच्या विचारसरणीत फरक पडला'.** प्रदर्शनात स्वामीजींचा मोठा फोटो लावला होता. त्यासमोर स्वामीजी बराच वेळ उभे राहिले. तेव्हा तिकडच्या माणसांनी विचारले की त्यांचा विवेकानंदांशी काय संबंध? तेव्हा स्वामीजींनी म्हटले I belong to this man हे साधं वाक्य त्यांनी नंतर शिकागोत आपल्या आठवणी सांगतांना अशा काही गदगदलेल्या कंठाने सांगितले की अजूनही आठवल्यावर अंगावर रोमांच उभे राहातात.

शिकागो आश्रमातले देवघर (Shrine) जुने झाले होते म्हणून स्वामीजींनी मला त्याचे नुतनीकरण करण्यास सांगितले. त्याचवेळी आश्रमात हरिष शाह म्हणून एक गृहस्थ भक्त रहात होता काही दिवसासाठी. हा मूळचा मुंबईचा. तो आणि त्याची पत्नी ज्योति शाह माझ्या कॉलेजात मला तीन वर्षे सिनीयर होते. हरिष व मी मिळून नवीन आराखडे केले. आकृतीबंध केले व पूर्ण देव्हारा संगमरवराचा बनवला. फक्त त्यावेळी आमची एक चूक झाली. स्वामीजींनी आम्हाला जमिनीवर पूर्ण संगमवर बसावायला सांगितले होते पण थंडीचा विचार करुन फक्त पूजा करण्याच्या चौथऱ्यावर आम्ही संगमवर वापरले व इतर ठिकाणी गालिचे बसवले. परंतु स्वामीजी काही म्हणाले नाही. नंतर भारतात आल्यावर नागपूरला समजले की नातू महाराज (नागपूर आश्रमातील पूर्वाश्रमीचे नांव) देव्हाऱ्यात दररोज विहिरीचे पाणी ऊपसून, संगमरवरची फरशी पाण्याने धुवून काढायचे व त्यांना बहुतेक शिकागो आश्रमात सुध्दा ते अपेक्षित होते. याचवेळी शिकागो आश्रमाची सुवर्णजयंती असल्याने एक स्मरणिका काढण्याचे ठरले, त्यासाठी स्वामीजींनी निधि गोळा करणे व प्रकाशन करणे याची सर्व जबाबदारी माझ्याकडे दिली व मी ती पार पाडल्यावर त्यांनी ते सभेत बोलून दाखविले.

१९७७ मध्ये आश्रमात रहायला आल्यावरही माझ्या मनाची स्थिती द्विधा होती. एकीकडे स्वामीजी बद्दल ओढ व दुसरीकडे बाहेरच्या जगातल्या गमतीजमतींकडे लक्ष यामध्ये वयाच्या २६ व्या वर्षी मी पडलो होतो आणि त्यातच मला वाटलं की काही दिवस बाहेर जाऊन रहावे. स्वामीजी माझ्या निर्णयाबद्दल काही बोलले नाही पण बाहेर पडल्यावर काही महिन्यातच मला असे काही अनुभव आले की शेवटी तीन दिवस माताजींचे सतत नामस्मरण करत करत मी आश्रमात परत आलो. नंतर एका मित्र भक्तांकडून ऐकले की मी गेल्यावर एका सकाळी देव्हाऱ्यात शिरताना स्वामीजी मला उद्देशुन म्हणाले की ''बेटा जातो कुठे, तिन दिवसातच परत येईल आणि तसेच घडले.''

स्वामीजी फार मोठे वक्ते होते असं म्हणता यंणार नाही. बोलतांना मधून मधून अडखळायचे शब्दांसाठी परंतु आवाजात एक धार होती, एक ठसक होती एक निश्चियात्मकता होती एक आत्मविश्वास होता आणि कधीकधी असे काही भावाविष्ट व्हायचे की सर्व श्रोते मुग्ध व्हायचे कोणी डोळे मिटुन ध्यान करायचे. अशाएका क्षणानंतर, मला आठवते, कॅमेरॉन रामसे, उंची ६'२'' वजन १२० किलो गोरा भक्त मला म्हणाला की स्वामीजींची गणना तो पार्षदांमध्येच करतो. अशावेळी त्यांच्या कडे बघितले की त्यांच्या नेहमीच्या आकृतीपेक्षा ते मोठे वाटायचे आणि चेहेरा भावाने दुप्पट झाल्यासारखा वाटायचा.

शिकागो गॅंजेस गढण्यामध्ये स्वामीजींना महिला भक्तांची फार मदत झाली आश्रमातील सर्व कामं महिलाच करायच्या. फुलांनी देव्हारा सजवायची. पॉला आल्बर्ट एक साठीतील विधवा, स्वामीजींचे कपडे मशिनवर

धुण्याचे व खोली साफ करण्याचे काम करत होती. इव्हा श्रोडरवर त्यांची पत्रे लघूलिपित लिहिणे व त्याचे लेख टंकलिखीत करायची, व्यक्तिगत सचिव जुडी सवाज (Savadge) अर्थात साधूंच्या रहिवासात व स्वयंपाकगृहात महिला प्रवेश निषेध होता व दररोज बाजार कालिकानंद स्वामी करायचे. पुस्तक विक्रय विभाग गणेश (वरदानंद) बघायचे दर शनिवारी बाहेरचे काही भक्त येऊन त्यात महिला पुरुष दोघेही असायचे, पूर्ण आश्रम स्वच्छ करावयाचे, परंतु कुठेही छचोरपणा वा उच्छृंखलता नसायची कुठल्याच बाबतीत आणि पवित्रतेवर स्वामीजींचा खूपचं भर होता व भक्तांना ते समजायचं व आवडायचं. कधी कोणाला काही सूचना द्यायच्या असतील तेव्हा व्यक्ती पाहून करायचे. विशेषत: त्यांच्या वर्गात प्रत्येकाला त्याच्या वागणुकीतील वैगुण्याबद्दल सूचना मिळायची पण दुसऱ्या कोणाला ते समजत नसे. त्यामुळे प्रत्येकजण सन्मान पूर्वक स्वत:चे दोष समजून ते ठिक करण्याचा प्रयत्न करायचा. दिक्षा दिलेल्या सर्वांवर त्यांची नजर असायची. विशेषत: माझ्या सारख्या उमेदवारावर ज्यांच्या मध्ये त्यांनी काही गोष्टी आधीच बधितल्या होत्या आणि इतरांचा पण हाच अनुभव होता.

माझ्या व्यक्तीगत जीवनातला जवळ जवळ ६ वर्षांच्या काळाचा त्यांचा सहवास मला मिळाला वा त्यांनी पहिल्या दिवसापासून लक्ष दिल माझ्या सर्वांगिण विकासासाठी आणि मन:शुध्दीसाठी.आराखडे , नकाशे तर मी बनवायचांच कधी गँजेससाठी शिकागोसाठी देवघरातील संगमवरी चबुतरा वैगर साफसफाई व्यतिरिक्त मी आश्रमात स्वैपांकी, पुजारी , वक्ता , रामनाम गायक वाहन चालक वगैरे बरीच कामे केली. शिकवण्याची पध्दत विलक्षण. एकदिवस त्यांनी पूजेचं पुस्तक दिलं म्हणाले उद्यापासून नित्यपूजा करा. गणेश वरदानंदा कडून सामान वगैरे बघुन घ्या यंत्र मंत्र आणि तंत्र जाणून घ्या बाकीसर्व पूजेला बसलात की येईल. आणि आश्चर्य म्हणजे घरी कधीच पूजेला न बसलेला मी नंतर नैमितिक पूजा पण करु लागलो. ठाकुरांची विशेषपुजा मी पूजारी आणि स्वामीजी तंत्रधारक अशी चालायची. असीम धैर्य आणि समजूतीने मला त्यांनी या गोष्टी आत्मविश्वासपूर्वक करायला शिकवल्या त्यामुळे रामनाम गायनाच्यावेळी मी त्यांच्यामागे बसून सुरात सूर मिळवू शिकलो. बोलणं फार कमी सूचना जवळ जवळ नाहीच.पण स्वत:च्या वागण्यातून शिकवायचे दोन तीन शब्दात समजावायचे . शंकराचार्यांवर फार प्रेम त्यामुळे त्यांच्या विवेक चुडामणि मधून बरेच दाखले मिळायचे. पंचेद्रियांच्या उत्पातामध्ये माणुस कसा फसतो जेव्हा एकाएका इंद्रियाने मतंग, मातंग, भृंग, कुरंग व मीन फसले हे फारच आवडते उदाहरण. दुर्लभ जयमेवैतत् दैवानुग्रह हैतुकम् मनुष्यत्वं, मुमुक्षत्वम् महापुरुषसंश्रय: । सर्व तुम्हाला मिळाले आता प्रयत्न करा जीवापाड हे वारंवार म्हणणे. विशेष कार्यक्रम नेहमीच चालायचे. प. पू. रंगनाथानंदजी महाराज प्रत्येक वर्षीच यायचे आणि आले की स्वामींजीचे वागणे लहान मुलासारखे व्हायचे कारण मला नंतर समजलं की इन्स्टिटयुट ऑफ कल्चर, कलकत्ता ला दोघे बरोबर होते. स्वामीजी सहायक म्हणून , न्यूयॉर्कला जायच्या आधि स्वामी निश्रेयसानंदजी दोन वर्ष राहिले आमच्या बरोबर. त्यांच्यातर मुखात शास्त्रांचा औघ असायचा स्वामी स्वाहानंद श्रध्दानंद, अशेषानंद, आकिश्वरानंद, चेतनानंद, सर्वगतानंद हे कुठल्यान कुठल्या कार्यक्रमात किंवा ११ सप्टेंबर पार्लमेंट ऑफ रिलीजन्स वगैरेला यायचे, Howrton Smith, John Dobson वगैरे व्याख्याने द्यायचे. स्वामीजींनी Ellicottville टोरंटो जवळ एक वेदांत कन्व्हेंशन केलं १९७६ला. तेथे तर जवळपास पंधरा स्वामी व ३०० भक्त होते. त्यावेळी कन्व्हेशन सुरु झाल्यावर बातमी आली की तापसानंद हे एकटेच गँजेसला राहिले होते ते. इमारतीवरकाम करतांना पडून हॉस्पिटल मध्ये आहेत. पण स्वामीजींनी मन घट्ट करुन ही बातमी न फोडता कार्यक्रम संपल्यावर सांगितली आणि ढसढसा रडले . सर्व श्रोते स्तब्ध झाले. आम्ही लगेच तिथूनच

गाडीने हॉस्पिटल मध्ये गेलो दुसऱ्या दिवशी तर बघितले तापसानंदाचे दोन्ही पाय मोडलेले व प्लॅस्टरमध्ये टांगलेले पण ते वाचताहेत आत्मबोध. विचारल्यावर म्हणाले आता थोडा वेळ मिळाला वाचायला धन्य तो गुरु आणि धन्य तो शिष्य .

स्वामीजी शिकागो गँजेसला असले की अनेक भक्त घरी जेवायला बोलवायचे. नियम असायचा बरोबर १०-१२ जणांचे दळ जाण्याचा. हार्मोनियम्, तबला तब्बलजी, गायक जायचे बरोबर व्हॅनमध्ये व रामनाम व्हायचे, त्यानंतर प्रसाद म्हणून जेवायचे. कधीच असं झालं नाही की कुठे जेवणाचा प्रसंग आला भक्तांकडे पण कमीत कमी ५-६ मंत्राचा पाठ झाला नाही . एकदा मी विचारले तेव्हा म्हणाले भक्तांची तुमच्याकडून अपेक्षा असते आणि साधु मंत्रपाठाव्दारा भगवंताचे नांव त्या घरात प्रसार करतो त्यानंतर काही घेऊ शकतो. नाहीतर ती चोरी होईल जीवनाच्या प्रत्येक क्षणाला पूजेचा भाव आणला पीहिजें.

स्वामीजींकडे भास्करेश्वरानंदजींचे (नागपूर ) नाव फारच कमी वेळा ऐकले त्याचे कारण असे की त्या नांवाने त्यांना भरुन यायचे. नागपूर आश्रमाबद्दल त्यांना विशेष आदर होता आणि भारतात ते जेव्हा प्रत्येक दोन वर्षांनी यायचे तेव्हा नागपूरला हटकून जायचे. या आश्रमातील बऱ्याच पध्दती त्यांच्या दैनंदिन कार्यक्रमात दिसून यायच्या विशेषत: सकाळची प्रार्थना व रामनाम गायची पध्दत. या आश्रमातील एक आठवण ते सांगायचे आणि त्यांना गदगदुन यायचं ती अशी. एकदा स्वामी विरजानंदजी, अध्यक्ष, रामकृष्ण मठ आले होते व भाष्यानंदजी (त्यांना पुर्वाश्रमीच्या आडनावावरुन नातू महाराज म्हणायचे) सेवक होते. सेवा करतांना त्यांनी विरजानंदजींना विचारले की महाराज अशी एकच गोष्ट सांगा जी प्रत्येक दिवशी पारायण केल्याने पूरा वेदांत लक्ष्यात येईल. विरजानंदांनी ऐकले आणि काहीच बोलले नाहीत. नातू महाराज निघून गेले निराश होऊन की काही तर मिळाले नाही. संध्याकाळी विरजानंदांनी त्यांना बोलवून सांगितल Song of Sanyasin ''तेव्हापासून हे गाणं त्यांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक बनला व ते आम्हा सर्वांना ते गाणे म्हणण्यास प्रोत्साहित करायचे.

स्वामीजींची विव्दत्ता दांडगी होती परंतु दिखावा नव्हता आणि संस्कृत भाषेचे गाढ पंडित होते परंतु पांडित्य मिरवणं त्यांच्या रक्तात नव्हत. कोणी म्हणतात, भाष्यकार शंकाराचार्यांच्या नांवावरुनच त्यांचे नाव भाष्यानंद दिले गेले होते. अर्थात या विद्वतेला आणि व्यासंगाला अमेरिकेत तसा वाव नव्हता कारण सामान्य जनांना यांचा गंधही नव्हता. परंतु आम्हा ब्रह्मचाऱ्यानां त्यांचा उपयोग व्हायचा व त्यांनी आमच्यासाठी नागपुरचे प्राध्यापक सहस्त्रबुध्दे यांना सहकुटुंब काही वर्षे (१९७८-८०) आमच्याबरोबर ठेवले होते. बऱ्याचं वर्षांनी १९८६ मध्ये स्वामीजींना भारतात दिल्ली आश्रमात भेटलो त्यांच्या भारत दौऱ्यावर तेव्हा या आठवणी निघाल्या व समोरुन एक स्वामीजी हलत डुलत संथ गतीने येत होते. त्यांना उददेशून स्वामीजींनी मला एक विनोदी श्लोक सांगितला ''गुणानाम् तु दोरात्म्यात घुरीधुर्यो नियुक्त असता: किनस्कंध: सुखं असन्जात: स्वपती गौरगडी आणि याचा मला अर्थ विचारला. बराच वेळ उत्तर न मिळाल्यावर स्वत:च म्हणाले की तुमच्यात गुण असतील तर प्रकृती बैला प्रमाणे कामाला लाविल पण जर नसतील तर सांडा प्रमाणे खाद्यांवर जू न घेता आरामात झोपता येईल. या समोरुन येणाऱ्या स्वामीजींची ही दुसरी स्थिती आहे. या घटने नंतरच दिल्लीच्या महंत महाराजांची भेट झाली न्याहारीच्या टेबलवर. तेव्हा थट्टेत स्वामीजींनी त्यांना म्हटले ''दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा मनोरथा पूरयितान समर्थ: अन्यै: नृमालै : परिदियमान: शाकाय वा स्यात लवणाय वास्यात्. फक्त जगदीश्वर वा दिल्लीश्वरच माझे मनोरथ पूर्ण करु शकतील. इतर राजे जे देतील ते शाकभाजी मीठ विकत घेण्यापुरतचं पुरेलं'' महंतमहाराजांनी खुश होऊन मान हलवली .

स्वामींजी माझ्याशी मराठीतच बोलायचे आणि बरोबर असलेला कोणी अमेरिकन कान टवकारुन ऐकायला लागला की गंमत करुन म्हणायचे की आम्ही दोघे तुझ्याबद्दलच बोलतो आहे. जेव्हा मला १९८३ ला परत यावे लागले तेव्हा मला त्यांनी शेवटचे इंगित दिले मराठा बाणा सोडू नको. मी शक्यतो अजूनही ते पाळतो आहे.

१९७५ मध्ये जेव्हा स्वामीजींची भेट झाली त्यानंतर काही महिन्यांनीच मी त्यांनाआपलं सर्वसोडून मठात यायची इच्छा प्रकट केली होती.पण स्वामीजींनी ओळखलं की हे स्मशान वैराग्य आहे व त्यांनी सल्ला दिला की पदविउपरान्त शिक्षण पूरे कर नंतर बघू. १९७७ मधे आश्रमात आलो तेव्हा सुध्दा त्यांनी माझी द्विधा मन:स्थिती ओळखून आपली नोकरी चालू ठेवण्यास सांगितले होते. माझ्या प्राप्तीचा मोठा हिस्सा मी आश्रमात देणगी म्हणुन द्यायचो. १९७९ मध्ये मला जेव्हा २८ वर्षे पूर्ण होणार होती तेव्हा स्वामीजींनीं बेलुर मठात लिहिलं की हेमंतला शिकागोत दाखल होऊ दिलं तर ते आणखी सहाय्यक मागणार नाहीत. परंतु मठाने त्यांच्या नियमाप्रमाणे मला भारतात येऊन रुजू होण्याचा सल्ला दिला. तेव्हा १९८० मध्ये स्वामिजींनी मला म्हटले की तुझ्या भविष्याचा विचार करुन तू ठरव. तेव्हा १९८१ ला मी भारतात येऊन रामकृष्ण मिशनची कार्यपध्दती बघितली व विश्वस्तांना भेटलो. परंतु काही गोष्टी न आवडल्याने परत गेलो. तेव्हा स्वामीजींनी समजावले की ते तर आणखी १०-१५ वर्षे या जगात आहेत. पण तेव्हा भविष्याच्या दृष्टीने भारतात रुजू होणे बरोबर ठरेल. तेव्हा मी १९८३ मध्ये बेलुर मठात आलो व मठात दाखल झाले.तरीही स्वामीजींनी माझ्याशीं संपर्क ठेवला. १० वर्षाच्या माझ्या अमेरिकेतील वास्तवामुळे भारतात येऊन परिस्थितीशी जुळवून घेणे मला कठीण झाले होते परंतु स्वामीजींच्या मार्गदर्शनामुळे मी अजूनही या संघात सुंदर रितीने कार्यभाग संभाळून राहिलो आहे.

स्वामीजींची चालण्याबोलण्याची पध्दत काही आगळीच होती आणि भारतात तरी मी बरेच फिरुनही त्यांच्या सारखे असामान्य व्यक्तीमत्व मला दिसले नाही.सामान्य माणसाचे हेवे दावे, कामक्रोध, दिखावा त्यांना माहितच नव्हता. गंभीर व्यक्तीमत्व त्यामुळे लोक जवळ यायला घाबरायचे. पण तरुण मुलांसाठी ते चुंबकीय आकर्षण ठरायचे. भगवी वस्त्रे सोडून इतर कपड्यात एक दोनदांच मी त्यांना गँजेसला बघितले. त्यांनी पूर्ण पेहराव घातला होता पण तो कामापुरताच होता.

श्रीरामकृष्ण, माँ सारदादेवी व स्वामी विवेकानंदाबद्दल ज्या लोकांनी त्यांना पाहिले होते, त्यांनी लिहून ठेवले आहे. परंतु वैज्ञानिक युगातला शिकलेला माणूस या इतिहासावर नेहमीच संशय प्रकट करतो. प्रत्यक्षावर जास्त विश्वास ठेवतो आणि प्रत्येक गोष्टीला प्रमाण मागतो. विशेषत: विज्ञानाने धर्मावर अंधश्रध्देचा असा काही जोरदार आरोप केला आहे की पाश्चात्य शिक्षणाने भारललेला माणूस योग,समाधी या गोष्टींना थोतांड समजतो रामकृष्ण मठाच्या एका वरिष्ठ सन्याशाला हार्वर्ड विश्वविद्यालयात शंकराचार्यांवर प्रवचने देतांना एका श्रोत्याने म्हंटले की आपण जे म्हणताहात ते आम्ही पुस्तकात वाचले आहे, वर्गात ऐकले आहे (तो प्राच्य तत्वज्ञानाचा विभाग होता) आमची अपेक्षा आहे की समाधी म्हणजे काय याचा एक दाखला तुम्ही देऊ शकाल अशा काळामध्ये ज्यांनी स्वामी भाष्यांनंदजींना जवळून पाही तो त्यांना श्रीरामकृष्ण, माँ सारदा व स्वामीजीं होते याबद्दल शंका वाटायची नाही आणि कधीकधी दाखले पण मिळायचे. माझ्या मते त्यांच्या भक्तांना व शिष्यांना त्यांनी गुरु म्हणून व्यक्तिकेंद्रित न करता ईश्वराच्या आराधनेत खात्रीपूर्वक अग्रेसर केले आणि काहींना अध्यात्मिक अनुभव सुध्दा दिले हे त्यांच्या कार्यांचे मोठे यश आहे.

• • • • • • •

# मनुष्यत्व आणि स्वामी विवेकानंदांचा संदेश

स्वामी ब्रह्मस्थानंद,
अध्यक्ष, रामकृष्ठ मठ, नागपुर

महाभारतांतर्गत शांतिपर्वात, शरशय्येवर पडलेल्या व प्राण सोडण्यासाठी उत्तरायणाची प्रतीक्षा करणाऱ्या , इच्छामरणी पितामह भीष्माचार्यांनी धर्मराज युधिष्ठीराला उपदेश केला आहे, तो राजधर्मपर्व आणि मोक्षधर्मपर्व म्हणून प्रसिध्द आहे. मोक्षधर्मपर्वात भीष्मपितामहांनी युधिष्ठिराला हंसगीता सांगितली आहे. ह्या हंसगीतेत अत्यंत उद्बोधक, अतिशय सारगर्भित तुम्हा-आम्हा सर्वांकरिता महत्वाचा, रहस्यमय श्लोक आहे.तो असा-

गुह्यं ब्रह्म तदिदं वो ब्रवीमि
नमानुषाच्छ्रेष्ठतरं हि किंचित् ।। महाभारत,मोक्षधर्म अ. २९९/२०

आता तुम्हा लोकांना मी ब्रह्मसाक्षात्काराचे गुप्त रहस्य सांगतो ते ऐका ! ते म्हणजे मनुष्यापेक्षा या सृष्टीत श्रेष्ठतर काहीही नाही.!

विश्वाचे ज्ञान आणि स्वस्वरुपाचे ज्ञान अनुभवणारा मनुष्य म्हणजे सर्व सृष्ट चराचरांचा जणू केंद्रबिंदू आहे. आजपर्यंत मनुष्याने अंतरिक्षातील सुदूर ग्रह- नक्षत्रांचा शोध लावला आहे. नव्हे त्याच्या गति - कक्षांचे ज्ञान मिळविले आहे. पृथ्वीवरील लक्षावधी जीव-जंतु , प्रणिमात्रांविषयी माहिती-ज्ञान त्याला झाले आहे. पृथ्वीवर आजवर तो सर्वत्र संचार करीत असे, पण आधुनिक काळी, तो खोल समुद्रात व वरती आकाशातही संचार करु लागला आहे. ह्या मनुष्ययोनीत जन्माला येऊन मनुष्याला अगणित गोष्टी प्राप्त झाल्या आहेत आणि आपल्या पंच ज्ञानेन्द्रियांनी व पंच कर्मेन्द्रियांनी, आपल्या मन-बुध्दीच्या बळावर तो जणु ह्या बाह्य जगावर अधिपत्य गाजवू लागला आहे. म्हणूनच स्वामी विवेकानंदांनी मनुष्याविषयी फार उदात्त उद्‌गार काढले आहेत. वास्तविक त्यांच्या जीविताचे ध्येय आपल्या मनुष्य जातीचा महिमा प्रगट करणे हेच आहे. ते म्हणतात.

''सृष्टीतील समस्त शरीरांमध्ये मनुष्यशरीरच सर्वांत श्रेष्ठ शरीर होय.मनुष्यप्राणी हा विश्वातील सर्व प्राण्यांतील श्रेष्ठ प्राणी होय. मनुष्य सर्वश्रेष्ठ जीव होय. माणूस सर्वप्राण्यापेक्षा श्रेष्ठ आहे,सर्व देव-देवतांपेक्षा श्रेष्ठ आहे माणसापेक्षा श्रेष्ठ कोणीच नाही. मुक्ती मिळविण्यासाठी देव-देवतांनाही फिरून इहलोकी जन्मून मनुष्य-शरीरच धारण करावे लागते. मुक्तीचा अधिकारी फक्त माणूसच, देवतांनादेखील तो अधिकार नाही. यहुदी आणि मुसलमान धर्मांत अशी प्रथा आहे की ईश्वराने सृष्टी निर्माण करतांना, देव-देवता इत्यादी सारे काही निर्मिल्यानंतर मनुष्य निर्माण केला, आणि माणूस तयार झाल्यावर त्याने देव-देवतांना आज्ञा केली की, जा, माणसाला वंदन करा, त्याचे अभिनंदन करा.' ईश्वराच्या आज्ञेनुसार सर्व देव-देवतांनी तसे केले. केले नाही फक्त एका इब्लिसाने आणि म्हणून ईश्वराने इब्लिसाला शाप दिला. त्या शापाने इब्लिसचा सैतान झाला. या पौराणिक कथेमध्ये एक महान सत्य दडलेले आहे.ते सत्य हेच की हा मनुष्यजन्मच सगळ्या जन्मांमध्ये श्रेष्ठ जन्म होय.''

- (स्वा. विवेकानंद ग्रंथावली, खंड २,पृ. १५६-५७)

केवळ मनुष्यशरीर लाभल्यानेच मनुष्यजन्म श्रेष्ठ ठरत नाही. ह्या मनुष्यशरीरामधे विशेष असे काही आहे की ज्यामुळे हा मनुष्य जन्म सर्वात श्रेष्ठ जन्म गणला गेला आहे. ते म्हणजे **मनुष्यत्व.** जगात अगणित प्राणी आहेत. लक्षावधी वर्षांपासून पशु-पक्षी ह्या पृथ्वीतलावर आहेत, तसा मनुष्यही आहे. परंतु पशू हा पशूच राहिला आहे. पशुजातीमधे काहीही सुधारणा झाली नाही. पशू आपल्या स्वतःपुरता किंवा आपल्या कळपापुरताच जगत आला आहे. जन्मापासून मरेपर्यंत पशू आपल्या जातीगत सहज प्रेरणांच्या चाकोरीत जगत असतो. मनुष्याचे तसे

नाही. त्याच्यामधे मन-बुध्दीचा विकास करण्याची शक्ती आहे . आत्मविकास करण्याची शक्ती आहे. ह्या विराट सृष्टीचे रहस्य जाणण्याची ,आपल्या अवती-भोवतीच्या दृश्य जगाचे व विश्वाचे निरिक्षण करण्याची व त्याचे सूक्ष्मतर ज्ञान ग्रहण करण्याची क्षमता त्याच्यात आहे. परस्परांशी संपर्क साधण्यासाठी, जीवन सुखमय करण्यासाठी निरनिराळी उपकरणे निर्माण करण्याची क्षमता त्याच्या ठायी आहे. माणसाला ईश्वराने मन व बुध्दीची असामान्य देणगी दिली आहे. ह्या मन-बुध्दीमधून माणसाचे व्यक्तीमत्व प्रकट होते. परस्पर प्रेम. सहकार्य, साहस, सामर्थ्य, स्वातंत्र्य, नीतिमत्ता ,दया, करुणा, कल्पना, इच्छाशक्ती, विवेकज्ञान इत्यादी गुणांनी मनुष्य सुसंस्कारित झाला आहे. सुसंस्कृत झाला आहे. आपले सुख-दुखः आपले विचार, आपल्या भाव-भावना व्यक्त करण्यासाठी वाणी आणि भाषा आणि स्मृतीशक्ती यांनी मनुष्य अलंकृत झाला आहे. स्वार्थप्रेरित दंभ ,क्रोध, दुष्टपणा, फसवेगिरी व अज्ञानजनित अभिमान, कामना-वासना इत्यादी दुर्गुण जरी माणसात आढळत असले तरी निर्भयता, इंद्रिये व मन: संयम, मनन - चिंतन , त्याग - वैराग्य, शांती, दया, निरभिमान व परोपकार इत्यादी सद्गुणही माणसामधे आहेत. गुणसंवर्धन आणि गुणग्राहकता हे मनुष्यजातीचे विवक्षित वैशिष्ट्य आहे. ह्या दृष्टीने अवघी मानवजात एक आहे व हे 'एकत्व' अनुभवण्याची क्षमता केवळ माणसात आहे. म्हणूनच स्वामी विवेकानंदांनी 'मनुष्य निर्माण करणाऱ्या शिक्षणाची व धर्माची आवश्यकता' आवर्जुन सांगितली आहे.

मनुष्याची उन्नती किती व कशी झाली आहे हे कसे समजायचे ? स्वामी विवेकानंद म्हणतात. - ''माणसाने इंद्रियांचे शिवार मागे टाकून उच्च भूमीवर वास करण्याची शक्ती कितपत कमविली आहे, त्याची फुफ्फुसे चिन्तन -मननाचा विशुध्द वायु किती प्रमाणात आत ओढू शकतात, आणि त्या उच्च अवस्थेत तो किती काळ राहू शकतो ह्यानेच त्याच्या उन्नतीचे मोजमाप करता येणे शक्य आहे.'' ह्यासाठीच स्वामीजींनी जगन्मातेला **'मनुष्यत्व'** देण्यासाठी प्रार्थना केली आहे. (८/१७४-७५)

हे 'मनुष्यत्व', हे 'माणूसपण' कशाने प्राप्त होत असते? प्राचीन काळापासून ऋषिंनी, मनीषींनी, आपल्या दिव्य-स्वरुपाचा, चैतन्यस्वरुपाचा बोधच मनुष्याला मनुष्यत्वाची जाणीव करुन देतो. जगातील सर्व धर्मांच्या सर्व शास्त्रांनी माणसाला आपले खरे व्यक्तीमत्व तयार करण्याचा उपदेश केला आहे. जेव्हा खरे व्यक्तीमत्व विकसित होते तेव्हाच मनुष्य आपले. शरीरापुरते क्षुद्र व्यक्तित्व विसरुन दुसऱ्या सर्व माणसांविषयी प्रेम आणि आपलेपणा अभिव्यक्त करीत असतो. त्याची आत्मशक्ती जागृत झालेली असते. त्याचे व्यक्तिमत्व विस्तारलेले असते.

स्वामी विवेकानंद आपल्या प्रभावी शब्दांत ह्यावर प्रकाश टाकतात. ते म्हणतात, '' खरा माणूस तो की जो मूर्तिमंत शक्ती असतो, आणि त्याबरोबरच ज्याच्या ठायी स्त्रीहृदयाची कोमलताही असते. आपल्या भोवताली असणाऱ्या लक्षावधी जीवांबद्दल तुम्ही करुणा बाळगली पाहिजे, व तरीही तुम्ही बलवान व सुदृढ चित्ताचे असले पाहिजे, आणि तुम्ही आज्ञाधारकताही अंगी बाणविली पाहिजे. हे सर्व गुण परस्पर विरोधी वाटत असले तरीही ते तुम्ही अंगी बाणविले पाहिजेत''. (५/२६९) हेच भगवद्गीतेमधे **'अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च'** आणि **'सर्वभूतहिते रता:** 'कोणत्याही प्राण्याचा द्वेष न करणारा, सर्वांशी मित्रभावाने राहणारा, करुणामय, सर्व प्राण्यांच्या हितामध्ये रत' असे जे योग्याचे वर्णन केले आहे ते खऱ्या मनुष्यत्वाचे लक्षण आहे.

(२)

पण हे 'मनुष्यत्व' अंगी बाणण्यासाठी आपण कसोशीने प्रयत्न करायला हवा. जे संकुचित आहे, पाशवी आहे, ओंगळ आहे, खालच्या प्रतीचे आहे त्याचा त्याग करायला हवा. मानवी जीवनात काय मिळविल्याने मनुष्य चिरतृप्त होऊ शकेल याची, चर्चा विचारवंतांमध्ये,

बुध्दिजीवी लोकांमध्ये जगात सर्वत्रच होत असते. गुणसंवर्धन व गुणग्राहकता यांच्या दृष्टीने अवघी मानवजात एक असली, हे जग एक असले तरी सुध्दा मन:पिंड, मन:प्रवृत्ती,मानवी जीवनोद्देश , जीवनाचे तत्वज्ञान या बाबतीत जगाचे 'पाश्चात्य' व 'पौर्वात्य' (जललव्वशीरिश्र रवि जीळशीरिश्र) असे दोन भाग पाडतात. हे सर्वच विव्दानांना मान्य आहे. आणि त्यातही जीवन म्हणजे काय व समाजाचे हित-अहित कशात आहे याचा विचार करणाऱ्यांच्या दृष्टीने धर्म , ईश्वरावरील श्रध्दा, संस्कृती, जीवनसरणी व जीवनाचे उद्दिष्ट इत्यादींच्या बाबतीत 'जग' आणि 'भारत' असे दोन भाग पडतात. स्वामी विवेकानंदांच्या शिकवणुकीमध्ये , त्याच्या संदेशामध्येही जग व भारत असा भेद करण्यात आला आहे. याचे कारण स्वामीजींनी अनेक ठिकाणी स्पष्ट केले आहे, ते म्हणजे इतर देशांचे केंद्र अर्थनीती, राजकारण, जडवाद आहे, पण आपल्या भारताचा प्राण आहे- धर्म, आपल्या देशाचा भाव आहे- धर्म, आणि आपल्या देशाची संस्कृती धर्मावर आधारलेली आहे.

स्वामीजींनी आपल्याला ललकारुन सांगितले आहे, ''भारतात, गेली कित्येक वर्षे, धर्म ही बाब निश्चलशी होऊन गेली आहे. आपल्याला ती क्रियाशील करावयाची आहे. धर्म हा प्रत्येकाच्या जीवनात उतरावा असा प्रयत्न मला करावयाचा आहे. प्राचीन कालाप्रमाणे या देशात धर्म हा राजप्रासादापासून तो अत्यंत गरीब अशा श्रमीकांच्या झोपड्यांपर्यंत सर्वत्र प्रविष्ट झाला पाहिजे. धर्म हा आपल्या जातीचा समान असा वारसा असून आपल्या जातीचा तो जन्मसिध्द हक्क आहे. तो प्रत्येकाच्या दाराशी मुक्तपणे पोहोचविला पाहिजे. भारतात धर्म ही गोष्ट वायू प्रमाणे प्रत्येकास मुक्तपणे व सुलभतेने उपलब्ध असली पाहिजे. भारतात आपल्याला हेच कार्य करावयाचे आहे.'' (५/३५९)

स्वामीजींच्या ह्या आवाहनाला प्रतिसाद देण्यासाठी खरा धर्म काय आहे हे सूज्ञांनी समजून घेऊन आपल्याा समाजात आबाल-वृध्द-वनिता या सर्वांस धर्माचे शिक्षण दिले पाहिजे. आजकाल आधुनिक शिक्षणाचा प्रचार-प्रसार होत आहे. आज युवक शिक्षण पूर्ण करुन संसारात शिरत आहेत. आणि त्यातच परिस्थितीशी संघर्ष करीत तो त्यात गुंतुन गेला आहे. महाभारतातील अर्जुनपुत्र अभिमन्युसारखी त्याची अवस्था झाली आहे. वीर अभिमन्यूला कौरवांनी रचलेल्या चक्रव्युहात शिरण्याचे 'ज्ञान' मिळाले होते. पण त्याला त्यातून सही सलामत बाहेर कसे पडावे याचे युध्द कौशल्य अवगत नव्हते. म्हणून श्रीकृष्ण - अर्जुना च्या अनुपस्थितीत त्याला चक्रव्युहात शिरता आले., पण त्यातुन सुरक्षित बाहेर पडता आले नाही आणि त्याचा चक्रव्युहात घात झाला. आजकालच्या शिक्षित युवकांचीही ह्या कोलाहलमय संसारात तशीच स्थिती झाली आहे. कारण अर्थप्राप्ती व सुखोपभोगप्राप्ती हेच आजच्या शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. पण आपल्या संस्कृतीचे जतन करुन संसारातून बाहेर कसे पडावे हे काही आजच्या शिक्षणाचे ध्येय नाही.

श्र

भारतीय संस्कृतीचा आधार 'धर्म, अर्थ, काम, मोक्ष,' हे पुरुषार्थचतुष्टय आहेत. ह्या पुरुषार्थचतुष्टयात धर्माचे आचरण हा प्रथम पाया होय. त्यावरच अर्थ, काम व मोक्ष ही मानव-जीवनाची निरनिराळी दालने उभारलेली आहेत. आपली अर्थव्यवस्था, समृध्दी, भौतिक विकास हे धर्माच्या तत्वांनी परिचालित असावेत, तेव्हाच समाजात शांती, सुव्यवस्था ,नीतिमत्ता, माणुसकी हि जीवनमुल्ये प्रस्थापित होऊ शकतील. मानवी-जीवनातील इच्छा-कामनांची परिपूर्तीसुध्दा धर्माला धरुनच व्हायला पाहिजे, अन्यथा जीवनात कामनावासनांची बेबंदशाही माजून जीवन इंद्रियभोगनिष्ठ पशुस्तरावर उतरायला वेळ लागणार नाही. योग्य शिक्षणावाचून आपण श्रेष्ठ संस्कृतीचे वारसदार असूनही खाली जात आहोत. अध:पतित होत आहोत ह्याचा पुरावा राजरोस आपल्या प्रत्ययास येत आहे.

आजकालच्या जाहिराती व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या नावाखाली दाखविले जाणारे कार्यक्रम अनिर्बंध अनैतिकतेची गटारं उघडी करीत आहेत. अशा बिकट परिस्थीतीत वेदान्ताचा धर्मच आपल्या राष्ट्राला तारु शकेल. आपल्या मनुष्यजीवनाचे अंतिम ध्येय जेव्हा ते अनंत, शाश्वत जीवन-म्हणजे 'मोक्ष' असेल, तेव्हाच राष्ट्रात उच्च जीवनमूल्ये आत्मसात केली जातील.

धर्माचे मानवजीवनात काय महत्व आहे हे स्वामी विवेकानंद स्पष्ट करतात-''आता हा प्रश्न उपस्थित होतो की धर्म हा खरोखर काहीतरी करु शकतो काय? होय, तो करु शकतो. ...

''तो मानवाला अनंत जीवन प्रदान करतो. धर्मानेच मानवाला त्याचे आजचे स्वरुप प्राप्त करुन दिले आहे व तोच या मानवी पशुला ईश्वर बनविणार आहे, हे कार्य धर्म करु शकतो. मानव समाजातून धर्म काढून घ्या म्हणजे काय शिल्लक राहील ? पशुंच्या मोठ्या कळपाव्यतिरिक्त आणखी काहीच शिल्लक उरणार नाही. मी आताच दाखवून दिल्याप्रमाणे इंद्रियांचे सुख हे मानवाचे अंतिम ध्येय आहे असे समजणे अत्यंत हास्यास्पद आहे. म्हणुन निष्कर्ष हाच निघतो की ज्ञान हेच संपूर्ण जीवनाचे अंतिम लक्ष्य आहे. ...

''पशुंना इंद्रियांपासून जितका आनंद मिळतो त्यापेक्षा पुष्कळ जास्त आनंद मनुष्याला बुध्दीपासून प्राप्त होतो. तसेच बुध्दीच्या आनंदापेक्षा मनुष्याला आपल्या आत्म्यापासून प्राप्त होणारा आनंद कितीतरी जास्त असतो. म्हणून आध्यत्मिक ज्ञान हेच सर्वश्रेष्ठ ज्ञान असले पाहिजे. या ज्ञानानेच खरा आनंद प्राप्त होतो. जगातील सर्व गोष्टी म्हणजे ह्या खऱ्या ज्ञानाच्या व खऱ्या आनंदाच्या केवळ सावल्या होत, त्यांची तिसऱ्या किंवा चवथ्या दर्ज्याची अभिव्यक्त रुपे होत.'' (९/११७-१८-१९)

(३)

मनुष्य निर्माण करणाऱ्या धर्माचा उद्‌घोष स्वामीजींनी केला आहे. तसेच मनुष्य निर्माण करणाऱ्या शिक्षणाचाही पुरस्कार स्वामीजींनी केला आहे. ''मनुष्याच्या सर्व मानसिक शक्तींचा विकास ज्या प्रक्रियेने होतो ती प्रक्रिया म्हणजे शिक्षण. मुलांचे केवळ दोषच पाहून व दाखवून त्यांना अभ्यासाला प्रवृत्त करणे ही पध्दत चुकीची आहे. मुलांच्या सद्गुणांना उत्तेजना देऊन ते ज्ञान संपादन करण्यास सक्षम आहेत, चांगले आहेत, बुध्दिमान आहेत अशी त्यांची प्रशंसा करुन त्यांच्याकडून अभ्यास करुन घेणे आणि त्यांना योग्य व चांगले वळण लावणे हेच स्वामीजींना अभिप्रेत होते. ह्या पध्दतीचा अवलंब केल्याने मुलांमधे आत्मविश्वास निर्माण होतो. वेदान्तमतानुसार मनुष्याच्या आतच सर्व ज्ञान साठविलेले आहे. फक्त ते जागृत करणे एवढेच शिक्षकाचे कार्य आहे. मुलांना मन एकाग्र कसे करावे हे शिकविले पाहिजे. त्यांना मन शुध्द ठेवण्याचे , पवित्र विचारांचे शिक्षण दिले पाहिजे-म्हणजे मग माणूस आपोआपच घडला जाईल. मनुष्य घडविणाऱ्या शिक्षणाविषयी स्वामीजी म्हणतात-''आयुष्यभर आत्मसात न झालेला व मेंदूत अस्ताव्यस्तपणे कोंबलेला असा ज्ञानाचा भारा म्हणजे काही शिक्षण नव्हे आपल्याला जीवन घडविणारे, 'माणूस' निर्माण करणारे, चारित्र्य घडविणारे व चांगल विचार आत्मसात करविणारे शिक्षण हवे आहे. तुम्ही जर चारपाच विचार चांगले आत्मसात करुन आपल्या जीवनात व आचरणात उतरविलेत तर अवघे ग्रंथालय मुखोद्‌गत करणाऱ्या व्यक्तीपेक्षाही तुमचे शिक्षण सरसच ठरेल. ''(५/२६७) स्वामीजींची ही शिकवण, हा संदेश आपल्या जनजीवनात अमलात आणण्याची अत्यंत आवश्यकता आहे. शिक्षणतज्ज्ञांनी ह्याकडे लक्ष द्यायला हवे.

श्र

तैत्तिरीय उपनिषदात शिक्षावल्लीच्या अकराव्या अनुवाकात अचार्यांनी शिष्याला जो उपदेश केला आहे तो संपूर्ण आपल्या जीवनात आत्मसात करायला हवा. त्यातील मंत्र आपले चारित्र घडविण्यासाठी अतिशय महत्वाचे आणि मननीय असे आहेत.

वेदमनूच्याचार्य: अन्तेवासिनम् अनुशास्ति। सत्यं वद। धर्म चर। स्वाध्यायान्मा प्रमद: ।आचार्याय प्रियं धनम् आहृत्य प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सी: । सत्यान्न प्रमदितिव्यम् । धर्मान्न प्रमदितव्यंम् । कुशलान्न प्रमदितव्यम् । भूत्यै न प्रमदितव्यम् । स्वाध्याय प्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम् ॥१॥

देवपितृकार्याभ्यां न प्रमदितिव्यम्। मातृदेवो भव। पितृदेवो भव। आचार्यदेवो भव। अतिथीदेव भव । यानि अनवद्यानि कर्माणि। तानि सेवितव्यानि। नो इतराणि। यानि अस्माकं सुचरितानि। तानि त्वया उपास्यानि ॥ २॥

नो इतराणि। ये के च अस्मात् श्रेयांसो ब्राह्मणा: । तेषां त्वया आसनेन प्रश्वसितव्यम्। श्रध्दया देयम्। अश्रध्दया अदेयम्। श्रिया देयम् । ह्रिया देयम् । भिया देयम् । संविदा देयम् । अथ यदि ते कर्मविचिकित्सा वा वृत्तविचिकित्सा वा स्यात् ॥३॥

ये तत्र ब्राह्मणा: संमर्शिन: । युक्ता आयुक्ता: । अलुक्षा कर्मकामा: स्यु। यथा ते तत्र वर्तेरन् । तथा तत्र वर्तेथा: । अथ अभ्याख्यातेषु । ते तत्र वर्तेरन् । तथा तत्र वर्तेथा: । अथ अभ्याख्यातेषु । ते तत्र वर्तेरन्। तथा तेषु वर्तेथा: । एष आदेश: । एष उपदेश: । एषा वेदोपनिषत्। एतत् अनुशासनम्। एवम् उपसितव्यम्। एवम् च एतत् उपास्यम्। ॥४॥

अर्थात - 'शिष्याचे वेदाध्ययन पूर्ण झाल्यानंतर आचार्य शिष्याला उपदेश देतात - सत्य बोल. धर्माचे, सदाचरणाचे पालन कर. स्वाध्याय करण्याला चुकू नको. आपल्या आचार्यासाठी आवश्यक धन-दक्षिणा देऊन त्यांच्या आज्ञेने गृहस्थाश्रमाचा स्वीकार कर व संतान परंपरा भंगू देऊ नकोस. सत्याची प्रतारणा होऊ देऊ नकोस. धर्म - आचरणामधे प्रमाद होऊ देऊ नकोस. ऐश्वर्यदायी व शुभ कर्मांमधे प्रमाद होऊ देऊ नये. स्वाध्याय आणि प्रवचनांमधे प्रमाद होऊ देऊ नये आणि खंड पडू देऊ नये.

'देवकार्य व पितृकार्य यांमधे प्रमाद किंवा चूक होऊ देऊ नये. माता हीच ज्याचा देव आहे असा तू श्रध्दावान हो. पित्याच्या ठिकाणी तुझी देवबुध्दी होवो. आचार्य हे तुझे देव होवोत. अतिथींच्या ठिकाणी देव आहे अशी तुझी श्रध्दा असो. जे अनिन्द्य शुभ व सर्वहितकर कर्म आहे तेच तू करायला हवे. अन्य स्वार्थी व अशुभ कर्म करु नकोस. आमची (गुरुजनांची) जी शुभ आचरणं तु बघितली आहेस त्यांची तू उपासना करावीस. ती तु आत्मसात करायला हवी. दुसऱ्या प्रकारचे कर्म करु नकोस. जे कोणी आम्हा आयाचार्यांपेक्षा श्रेष्ठ आहेत त्यांना आसन देऊन व त्यांचे आदरातिथ्य करुन स्वागत केले पाहिजे. जे काही द्यायचे ते श्रध्दापूर्वक द्यायला हवे, अश्रध्देने नव्हे. आपल्या ऐपतीप्रमाणे द्यायला हवे धर्माला अनुसरुन लज्जाविनितभावाने द्यायला हवे. गर्वाने व अहंकाराने नव्हे तर धर्माच्या भयाने द्यावे. मित्रभावनेने आपल्याचसारखा ग्रहिता आहे अशा बोधाने सहकार्य म्हणून द्यावे.

'जेंव्हा जेथे विचारशील, योग्य कर्मांमध्ये युक्त, स्वेच्छापूर्वक कर्मपरायण अशा सरळ बुध्दीच्या धर्म परायण, विवेकी सच्छील व्यक्ती जशा वागतात तसे तेथे त्यांच्याशी वागावे. ज्यांच्यावर काही संदेह आहेत किंवा आरोप आहेत त्यांच्याशी व्यवहारात जसे वागतात, तसे वागावे. हाच आदेश आहे, हेच विधी - निषेध आहेत. हाच आचार्यांचा उपदेश आहे. हेच उपनिषदांचे विधान आहे. हेच मनुष्यजीवनाचे अनुशासन आहे. ह्याचे पालन करायला हवे. ह्याची उपासना करायला हवी.,

वैदिक ऋषिंनी विचार भावना व कर्म यांना सुसंस्कारित करुन मनुष्य कसा आध्यात्मिक व सच्चरित्रसंपन्न होईल याचे मार्गदर्शन केले आहे. ही आमची प्राचीन शिक्षण परंपरा आहे. ही पुन्हा नवीन युगात आदर्शरुपाने तत्वरुपाने प्रस्थापीत व्हायला पाहिजे. ह्याच्या अभावी तुम्ही - आम्ही प्राचीन ऋषींचे वंशज कसे अधम होत आहोत. म्हणून स्वामी विवेकानंदांनी

आपल्याला समाजात योग्य शिक्षण रुजविण्याचे आवाहन केले आहे. आपल्या ओजस्वी वाणीत तुम्हा - आम्हा - सर्वांना त्यांचा सांगावा आहे, ''शिक्षण म्हणजे भाराभर माहितीने मन भरणे नव्हे. साधन निर्दोष करणे आणि स्वतःच्या मनावर पूर्ण प्रभुत्व मिळविणे हे शिक्षणाचे ध्येय आहे. ''हे ध्येय आदर्श गुरु आणि शिष्य यांच्या निर्मळ प्रेमसंबंधातून प्राप्त होऊ शकते.

ज्या शिक्षकांकडून विद्यार्थी श्रध्दापूर्वक शिकतो त्यांच्याशी शिक्षणकाळात त्याचा घनिष्ठ संबंध येत असतो. अशा घनिष्ठ जवळच्या संबंधातूनच शिष्य उच्च जीवनमुल्ये आपलीशी करीत असतो. अशाच गुरुशिष्य परंपरेच्या शिक्षणाने मनुष्यत्व येत असते. स्वामीजींना गुरुगृह वासात प्राप्त होणारे शिक्षण अभिप्रेत होते केवळ काही परीक्षा पास करुन अर्थार्जन करण्यासाठी मिळणारे शिक्षण नव्हे. ते म्हणतात, ''कुणी काही परीक्षा दिल्या वा व्याख्यानांची आतषबाजी केली की झाला तो तुमच्या दृष्टीने शिक्षित ! जे शिक्षण लाभल्याने सामान्य जनता जीवन संग्रामाला लायक होऊ शकत नाही, जे शिक्षण चारित्र्यबल, परसेवातत्परता व सिंहासारखे साहस निर्माण करु शकत नाही त्याला काय शिक्षण म्हणायचे ? ज्या शिक्षणात माणुस जीवनात आपल्या पायांवर ऊभा राहू शकतो तेच खरे शिक्षण .'' (४/१०५) खऱ्या शिक्षणानेच आपल्या देशात क्रांती घडून येईल. चांगले व वाईट, श्रेयस्कर व हानिकर समजण्याची शक्ती नागरिकांत येईल व राष्ट्र सुदृढ बनेल.

४

आधुनिक काळात स्वामीजींनी आपणा सर्वांना शक्तिमंत्र दिला आहे की प्रत्येक व्यक्ती चैतन्यमय ब्रह्म आहे आणि आपल्या आंतर व बाह्य प्रकृतींना वशीभूत करुन हे ब्रह्मत्त्व प्रकट करणे हेच मनुष्यजीवनाचे ध्येय आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपण हा अध्यात्मबोध आणू शकतो. ह्यालाच स्वामीजींनी व्यावहारिक वेदांत म्हटले आहे. आपल्या उपनिषद् ग्रंथामध्ये वेदान्ताची तत्वे आहेत. पण ती केवळ बौध्दिक स्तरावर चर्चेचा विषय न होता आपल्या जीवनात आत्मविश्वासाचे, पावित्र्याचे, चिरंतन आनंदाचे व दुर्दम्य इच्छाशक्तीचे साधन व्हावे म्हणून स्वामीजींनी आम्हाला बोधयुक्त **'त्याग आणि सेवा'** या व्रताचा संदेश दिला आहे. हा आमचा राष्ट्रीय आदर्श आहे. वेदान्ताची तत्वे वन-अरण्यांत व आश्रमांत अभ्यासिली जात होती, ती आता घरा-घरातुन अभ्यासिली जावीत व प्रत्येक व्यक्तीने आचरणात आणावीत, हे स्वामीजींनी आवर्जुन आपल्याला सांगितले आहे.

५

'मी चैतन्यस्वरुप आत्मा आहे, मी शरीर नाही, मन-बुध्दीच्या अतीत असूनही मी मन-बुध्दीतून प्रकटणारा स्फुल्लिंग आहे. मी सत्यस्वरुप आहे, मला कोणत्याही विषयांचे प्रलोभन विचलित करु शकत नाही, मला पैसा, संपत्ती यांचे प्रलोभन प्रभावित करु शकत नाही, असा ठाम विश्वास जो बाळगतो तो आत्मसंयम साधू शकतो. त्याच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो. 'आत्मवत् सर्वभूतेषु', अशी ज्याची वृत्ती असते तो सर्वांची सेवा करण्यास तत्पर असतो. त्याचे जीवन आत्मशक्तीने परिपूर्ण असते. पुरुष, स्त्री, बालक, बालिका, वृध्द, तरुण सगळेच आपापल्या शुध्द चैतन्यबोधाने समस्त आसमंत चैतन्यमय करु शकतात. 'मीही तुमच्यासारखा चांगला आत्मवंत मनुष्य आहे . तुम्ही तत्वज्ञानाचे प्राध्यापक आहात तर मी एक सामान्य शेतकरी आहे. परंतु तो एकमेव परमात्मा एकसमान तुमच्यात, नि माझ्यात परिव्याप्त आहे. तोच एकमेवाद्वितीय ईश्वर मला, तुम्हाला व सर्वांना प्रेरणा व शक्ती देत आहे' अशी जाणीव व्यक्तीचे व्यक्तिमत्व प्रकट करते. हेच खरे मनुष्यत्व होय.

आपल्या अवतीभोवती ज्या काही समस्या आहेत त्या आपल्या आतील बोधाप्रमाणे आपले आचरण होत नाही म्हणून. स्वतंत्र भारतात **'त्याग आणि सेवा'** या आपल्या आदर्शांचे आपल्याला विस्मरण झाले आहे.

स्वत:च्या स्वार्थत्यागानेच समाजाची, राष्ट्राची खरीखरी सेवा होऊ शकते. स्वामी विवेकानंदांच्या संदेशापासून प्रेरणा घेऊन कोट्यावधी भारतवासी सर्वसाधारण जनतेची सेवा करण्यास कामास लागोत तेव्हाच आपला देश महान होईल.

स्वामीजींचे तुम्हा-आम्हाला आवाहन आहे. ते म्हणतात, **''सर्वसाधारण जनतेची उन्नती तुम्ही करु शकता काय ? त्यांच्या ठिकाणी जी स्वाभाविक धर्मपरायणता आहे ती नष्ट न करता तुम्ही त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास शिकवू शकता काय ? समता, स्वतंत्रता, कर्मशीलता व उत्साह यांच्या बाबतीत तुम्ही सच्चे पाश्चात्य आणि धर्मविश्वास व धर्मसाधना यांच्या बाबतीत तुम्ही सच्चे हिंदू होऊ शकता काय ? हा आदर्श समन्वय तुम्हाला साधेल काय ? हेच कार्य आपल्याला करावयाचे आहे आणि आपण ते करूच करु. तुम्हा साऱ्यांचा जन्म यासाठीच झाला आहे. स्वत:वर विश्वास असू द्या. दृढ विश्वासातून थोर कार्ये जन्मत असतात, श्रध्दाच महत्कार्याची जननी होय. पुढे चला, सतत पुढे चला ! अगदी अखेरपर्यंत गरीब व दलित यांच्याविषयी सहानुभूती बाळगा – हाच आपला मूलमंत्र असू द्या.''** (४/४८३-८४)

मनुष्यतत्वाच्या संवर्धनासाठी व आपल्या भारतदेशाच्या पुनरुत्थानासाठी आपल्याला स्वामी विवेकानंदांच्या संदेशाची नितान्त गरज आहे. आपण भारताचे सर्व नागरिक त्यांना 'राष्ट्रगुरु' मानून त्यांच्या आदेशाप्रमाणे आपले व आपल्या राष्ट्राचे भवितव्य घडवू या, तेव्हाच आपण चिरआनंदाचे नि सुखसमृध्दीचे अधिकारी होऊ शकू.

• • • • • •

*जर काही भले व्हावे अशी तुमची इच्छा असेल तर आपल्या या बाह्य अनुष्ठानांना तिलांजली द्या आणि जिवंत ईश्वराची, मानव – देवाची – ज्याने मानवरूप धारण केले आहे, अशा प्रत्येक जीवाची – भगवंताच्या समष्टी तसेच व्यष्टी रुपाची पूजा करा.*
*– स्वामी विवेकानंद*

# कल्याणप्रार्थना

**सर्वेऽत्र सुखिन: सन्तु सर्वे सन्तु निरामया: ।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दु:खमाप्नुयात् ॥**

**सर्वस्तरतु दुर्गाणि सर्वो भद्राणि पश्यतु ।**
**सर्व: सद्बुद्धिमाप्नोतु सर्व: सर्वत्र नन्दतु ॥**

**दुर्जन: सज्जनो भूयात् सज्जन: शान्तिमाप्नुयात् ।**
**शान्तो मुच्येत बन्धेभ्यो मुक्तश्चान्यान् विमोचयेत् ॥**

**स्वस्त्यस्तु विश्वस्य खल: प्रसीदतां**
**ध्यायन्तु भूतानि शिवं मिथो धिया ।**
**मनश्च भद्रं भजतादधोक्षजे**
**आवेश्यतां नो मतिरप्यहैतुकी ॥**

येथे सर्वजण सुखी असोत, सर्वजण निरोगी असोत ! सर्वांना कल्याणकारी गोष्टी बघावयास मिळोत, कोणाच्याही वाट्यास दु:ख न येवो.

(सर्वजण) सर्वलोकसमूह अडचणी तरून जावो, सर्वलोकसमूह कल्याणकारी गोष्टी पाहो. सर्वलोकसमूह सद्बुद्धी प्राप्त करो, सर्वलोकसमूह सगळीकडे सुखाने नांदो.

दुर्जन सज्जन होवो, सज्जनाला शांती मिळो, शांत (व्यक्ती) बंधनापासून मुक्त होवो, जो मुक्त आहे तो इतरांना मुक्त करो.

सर्वांचे (विश्वाचे) कल्याण असो, दुष्ट व्यक्ती (त्याचे दुष्टपण जाऊन) प्रसन्न होवो. सर्व प्राणीमात्र एकमेकांना शिवस्वरूप समजून परस्परांचे (मनापासून) कल्याणचिंतन करोत, (त्यांची मने) मंगलमय होऊन भगवान विष्णूचे चिंतन करोत, आमची अंत:करणे नि:स्वार्थ प्रेमात मग्न होवोत !



सौजन्य - श्री वासुदेव अंबादासजी महल्ले

# 'आधात्मिकता - आज के परीपेक्षमे'

स्वामी सत्यरुपानंदजी महाराज
सचिव – रामकृष्ण मिशन, विवेकानंद आश्रम , रायपूर

हमारा देश आज संकट और संक्रातीओसे गुजर रहा है। हमे गंभीरतापूर्वक विचार करना है की हम अपने देश की समस्याका समाधान कैसे कर सकते है। भारतीय संस्कृती विश्वमें सर्वश्रेष्ठ संस्कृतीयों मे एक है। भारतीय संस्कृतिने एकताका संदेश विश्व को दिया है । हमारे ऋषीओने वेदों में कहा 'एक्म सत् विप्राः बहुधः वदन्ति' वह सत्य या ईश्वर एक है। विद्वान लोग उसको विभीन्न नामोसे पुकारते है। विश्व को भारत का यह सबसे बडा संदेश है। संसारके जितने बडे धर्म है वे सभी ईश्वरके पास जानेके रास्ते है। ईश्वर प्राप्ती के मार्ग है। ईसलिये भारतीय संस्कृती सभी धर्मोका सम्मान करती है। और यही कारण है की आज भारत वर्ष मे संसारके सभी धर्मो के लोग निवास करते है। और भाईचारे से रहते है बिचमे कुछ ऐसी परिस्थितीयाँ आई के कुछ विकृत लोगोने धार्मीक द्वेष हमारे बीच फैलाने का प्रयत्न किया । आज हम भारतीयों का पहला कर्तव्य है की हम अपनी संस्कृती पर विचार करें। हमारी संस्कृती के प्राण है हमारी आध्यात्मिकता। और हमारी आध्यात्मिकता कहती है के मनुष्य के जीवनका लक्ष्य है ईश्वरको जानना या अपने आप को जानना । मनुष्य केवल हाड मांसका पुतला नही है। मनुष्य के भीतर एक चैतन्य शक्ती है जिसको कोई आत्मा कहते है, कोई रुह कहते है, कोई जीव कहते है किंतु यह है सब एकही तत्व या चैतन्य शक्तियाँ। यह आत्मा, यह रुह , यह जीव ये ही मनुष्य का सत्यस्वरुप है। और इसरुप मे एक मनुष्य दुसरे से भिन्न नही है । भारतीय संस्कृती कहती है इस विराट विश्वकी रचना ईश्वरने की है इसलीये विश्वका प्रत्येक प्राणी हमारा अपना सहोदर है न केवल मनुष्य विश्व के सभी प्राणीओं मे । भारतीय संस्कृती ऊस आत्मा को देखनेका प्रयत्न करती है और सबके साथ एकत्व का बोध करती है।

हमारे देश की हमारी संस्कृती की विशेषता है 'विविधता में एकता' हम संसारकी सारी विविधताओं को स्वीकार करते है और यह मानते है जिस प्रकार मनुष्य के स्वभाव मे भिन्नता होती है ऊसी प्रकार मनुष्य के विचार मे, मनुष्य के धर्म मे, मनुष्य के आचरण मे विभिन्नता होती है। किन्तु यही भिन्नता एक मनुष्य को दुसरे मनुष्य से अलग नही करती । यही भिन्नता हमे सूचीत करती है के तुम अपने मार्ग से चलकर अपने गंतव्यतक पहूच सकते हो। स्वामी विवेकानंदजीके गुरु श्री रामकृष्णपरमहंसने कहा था, 'जितने मत उतने पथ'। भारतवर्ष की आज यह आधुनिक आवश्यकता है। भारतमे हमारा प्रथम कर्तव्य है की हम लोग इस सत्य को स्वीकार करे, हम भारतीय लोग संसार के सभी धर्मोका सम्मान करते है। न केवल सम्मान करते है किंतु यह स्वीकार करते है की यह संसारके सभी धर्म ईश्वर प्राप्तीके मार्ग है – स्वामी विवेकानंदजीने यह कहा ईसलिये आज हम भारतीयोंका यह प्रथम कर्तव्य है की हम अपने देशमें रहनेवाले सभी धार्मिक बंधुओं से गले मिले हम एक दुसरे को यह बतायें की आपका और हमारा धर्म ईश्वर के पास पहूचने का एक मार्ग है किन्तु जो शाश्वत धर्म है, वह वस्तुतः धर्म है वो तो एकही है । आपकी उपासना पध्दती मेरी उपासना पध्दती कीसी मुसलमान की उपासना पध्दती, हिन्दु की उपासना पध्दती, ईसाई की उपासना पध्दती, जैन या शिख भाईओं की उपासना पध्दती ऊसी धर्म की शाखायें है। मुलतः धर्म एक है। ईसलिये भारतीय संस्कृती के प्राण ईस आध्यात्मिकता को हमे बचाना होगा। आध्यात्मिकता यह कहती है के प्रत्येक मनुष्य के भीतर वह दिव्य चेतना जिसे आत्मा, रुह , जीव, भगवान जो भी कहले वह विद्यमान है और मनुष्य के जीवन का लक्ष्य है। वो अपने भीतर विद्यमान इस आत्माको जानने के बाद संसार मे सब कोई

अपना लगता है। फिर वो किसीसे घृणा नही करता । सब उसके अपने हो जाते है। इसलिये हमारे ऋषीओने कहा देखो 'वसुधैव कुटूंबकम्' यह सारी वसुधा, यह सारी पृथ्वी तुम्हारा कुटुंब है, तुम्हारा यह परिवार है आज हम (Globolization) विश्व एकीकरण की बात करते है। हजारो साल पहले हमारे ऋषीओंने कहा यह सारा विश्व एक मकान के समान एक घर के समान, एक घोसले के समान हो जाता है। ईस आदर्श को पहले हम भारतीयोंको पालन करना है। हमने स्वाधीनता के इस ५५ वर्ष पश्चात देख लीया की केवल राजनीती के द्वारा, केवल अर्थनिती के द्वारा या समाज - निती के द्वारा भारत की समस्याओं का समाधान नही हो सकता है। भारत के समाधान मे राजनीती आवश्यक है, अर्थनिती भी आवश्यक है सामाजिक चेतना, समाज सुधार आवश्यक है। किन्तु इन सभी का आधार आध्यात्मिकता होगी। और आध्यात्मिकता यह कहती है की प्रत्येक व्यक्ती को उसके नैतिक और आध्यात्मिक विकासका पूर्ण अवसर दिया जाय। ऊसमे जाति, धर्म, वर्ण, लींग , कीसी प्रकार की बाधा नही है । भारत मे रहने वाले प्रत्येक व्यक्ती को यह अवसर मिले की वो अपनी योग्यता और शक्ती के अनुसार अपने व्यक्तीत्व का विकास करे । ऊसके विकास मे केवल एक शर्त है उसका विकास दुसरे कीसीके ऱ्हास का कारण ना हो । हमारा आत्मिक विकास हमारा व्यक्तीगत विकास समाज या किसी व्यक्ती की किसीप्रकार हानी ना करे । इस प्रकार हम देखते है की भारतीय संस्कृतीकी आध्यात्मिकता यह कहती है की संसारके प्रत्येक मनुष्य मे वही परमात्मा विराजमान है। इसलिए उसका सम्मान करें हम व्यक्तीकी केवल योग्यता का सम्मान नही करते । तो हम व्यक्तीमें छुपे हुये गुणोका भी सम्मान करते है। और हम विश्वास करतें है की प्रत्येक व्यक्ती एक संभावना है। यदी उसे उचित अवसर मिले तो अपने शक्ती का सर्वांगिण विकास कर सकता है। यह तभी संभव है जब हम भारत मे रहने वाले सब लोग पहलें विचार करें यह दृढ निश्चय करे की सर्व प्रथम हम भारतीय है। और भारतीय होने के बाद चाहे हम मराठी है , बंगाली है, हिंदी भाषी है, ऊर्दु भाषी है ,या फीर किसी जाती या प्रांत में रहने वाले है। ऊसीके बाद हम किसी भी धर्म को मानने वाले है। उसके बाद ही हम किसी भी प्रकारके खान-पान-आचार-व्यवहार करने वाले है । किंतु मुलरुप से हम सब उस भारत माँ की संतान है, उत्तरसे -दक्षिण तक - पुरबसे पश्चिम तक सारा भारत वर्ष एक है।

भारतीय के रुप मे न हम केवल हिन्दु है ना मुसलमान है, ईसाई है ना जैन है, ना शिख है, यह तो उपासना पध्दती है । हम मुलतः भारतीय है इसलिये आज इस संकटकी घडी मे हमारा यह परम कर्तव्य है की हम अपने विचार बदले । यह निश्चय करें के हम सब भारतीय है और यह ध्यान रखें या निश्चीत जाने के भारत के कल्याणमे ही हमारा कल्याण है। भारत की उन्नतीमेंही हमारी उन्नती है। भारत के मंगल मेही हमारा मंगल है। यदि हम भारत का कल्याण, भारत की ऊन्नती, और भारत के मंगल की और ध्यान न देगें तो व्यक्तिगत रुपमें हम कितने भी उन्नत हो जाये एक ना एक दिन हमारा विनाश होगा, सुखी नही रह सकेंगें, इसलिये आज सबसे अती आवश्यकता है आप कीसी भी राजनिती मे विश्वास करते हो, किसी भी अर्थनीतीमें विश्वास करते हो, किसी भी धर्म मे विश्वास करते हो उसके माध्यमसे हम भारतीय संस्कृतीकी एकता का आश्रय लेकर भारत माँ के उत्थान का व्रत ले । हम यह निर्णय और निश्चय करें के हम अपने जीवन के प्रत्येक कार्य के व्दारा भारतीय संस्कृतीको उन्नत करेंगे और इस प्रकार पुन्हाः भारतको विश्व के गुरु स्थानपर प्रतिष्ठित करेंगे.

• • • • • •

*ईश्वर मुक्तिस्वरुप है, प्रकृति का नियंता है । तुम उसे मानने से इन्कार नही कर सकते । नहीं, क्योंकि तुम स्वतंत्रता के भाव के बिना न कोई कार्य कर सकते हो, न जी सकते हो ।*

*– स्वामी विवेकानंद*
*(शक्तिदायी विचार)*

# श्री रामकृष्ण भावधारा की अपूर्वता

स्वामी निखिलात्मानंद,
अध्यक्ष, रामकृष्ण मठ सेवाश्रम, मुट्ठीगंज, इलाहाबाद (उ.प्र.)

श्रीरामकृष्ण परमहंस ने अपनी आध्यात्मिक साधनाओं के व्दारा यह अनुभुति प्राप्त कि थी कि ईश्वर ही विश्व ब्रह्माण्ड के समस्त प्राणियों तथा वस्तुओं के भीतर विद्यमान् है। और उस ईश्वर का दर्शन लाभ करना ही मानव जीवन का लक्ष्य है । उनका अविर्भाव १६ फरवरी १८३६ ई. में हुआ था। वह ऐसा समय था जब संसार संक्रान्ति काल से गुजर रहा था। १९ वीं शताब्दी में पाश्चात्य देशोमें धर्म की दिवारें ढह रही थी। भौतिक विज्ञान और जैविक विज्ञान के अविष्कारो ने ईश्वर के अस्तीत्व पर गहरी चोट की थी। पश्चिम का धर्म जो कतिपय क्रिया अनुष्ठानों और विश्वास पर आधारित था विज्ञान की चुनौतिओं का सामना करने में असमर्थ था । इधर भारत मे भी धर्म की स्थिती बडी शोचनीय थी। अन्धविश्वास युक्त कुछ क्रिया अनुष्ठान ही धर्म का रुप ले बैठे थे।

हिंन्दु धर्म के विभिन्न मतों , शैव शाक्त, वैष्णव आदि में बडा मतभेद था । साकार और निकार का झगडा 'दीर्घकाल से चला आ रहा था। अद्वैत, विशिष्ठा द्वैत और व्दैत वेदांन्त के आचार्य अपने मत की श्रेष्ठता के प्रतिपादन को ही धर्म मान बैठे थे। जातिं पाँति का भेद अपनी चरम सीमा पर था। ऐसे विषम काल में श्रीरामकृष्णका आगमन होता है। वे निरक्षर ब्राह्मण के रुप में आते है। शायद यही दर्शाने के लिए कि धर्म के यथार्थ अनूभूति के लिऐ लौकिक शिक्षा आवश्यक नहिं है।

कलकत्ता स्थित दक्षिणेश्वर के काली मन्दिर में वे साधना रत होते है। और एक दिन आता है कि वे व्याकुलता के बल पर माँ काली का दर्शन लाभ करते है। वह प्रस्तर की प्रतिमा उनके लिये चिन्मयी हो जाती है। वह उनके दिये गये भोगों को ग्रहण करती हैं तथा उन्हें नाना प्रकार के उपदेश देती हैं। इसीलीये जब भक्त उनसे पुछते महाराज क्या ईश्वर का दर्शन हो सकता है ? वे कहते 'खूब व्याकुल होकर रोनेसे ईश्वर के दर्शन होते है। लोग स्त्री या पुत्र के लिये आँसुओं की धारा बहातें है, रुपये के लिऐ रो रोकर आँखे लाल कर लेते है। ईश्वर के लिये कोई कब रोता है ? ईश्वर को व्याकुल होकर पुकारना चाहियें। 'विषय पर विषयी की, पुत्र पर माता कि और पति पर सती की - यह तीन प्रकार की चाह एकत्रित होकर जब ईश्वर की और मुडती है , तभी ईश्वर मिलतें है।'

केवल माँ काली का दर्शन लाभ करके ही वे चुप नहि बैठते वरन हिंन्दु धर्म के विभिन्न मतों - वैष्णव, शाक्त, वेदान्त, आदि की साधना में प्रवृत्त होते है। और एक एक करकें उन मतो के माध्यम सें परमात्मा की सम्यक उपलब्धी करतें है। यही नहीं वे इस्लाम और इसाई धर्म की भी साधना करतें है । उन धर्मोके चरम लक्ष्य की अनुभूति करतें है। इसके बाद वे प्रतिपादित करते है। 'जतो मत ततो पथ' अर्थात् जितने भी मत है वे ईश्वर के पास पुहूँचने के विभिन्न रास्ते है। इसलिये धर्म अथवा मत को लेकर झगडा नहि करना चाहिऐं। उनका कथन था- जैसे एक ही जल को कोई 'वारी' कहता है और कोई 'पानी', कोई 'वाटर' कहता है। तो कोई 'एक्वा', उसी प्रकार एक ही सच्चिदानंद को देश भेद के अनुसार कोई हरि कहता है तो कोई अल्लाह, तों कोई गॉड,तो कोई बुध्द। जिस प्रकार छत पर चढने के लिऐ तिसैनी , बाँस, रस्सा, सिढी, आदी अनेक उपाये है उसी प्रकार ईश्वरके निकट पहूँचने के लिऐ अनेक उपाय है - प्रत्येक धर्म ही एक एक उपाय बताता है।

इस तरह श्रीरामकृष्ण ने अपनी अनुभूति को सरल,सहज शब्दों में प्रतिपादित करते हुऐ कहाँ की प्रत्येक धर्म उसी ईश्वर की और ले जाता है। अतः व्यक्ति को चाहिए कि वह अपने धर्म के प्रति निष्ठावान बने तथा सभी धर्म के प्रति आदर का भाव रखे। पर वे धर्मान्तरण



...' निर्माता : निचळ हर्बल प्रॉडक्टस, अकोला, फोन : २४३२६११

के विरुध्द थे। माइकेल मधुसूदन ने जब उन्हें यह बताया की उन्हे पेट के लिए हिन्दु धर्म छोडकर ईसाई धर्म ग्रहण करना पडा तो उन्होंने उनकी कडे शब्दों में भर्त्सना की। इस तरह श्रीरामकृष्ण सर्व धर्म समन्वयाचार्य, रुप में हमारें संमुख आतें है।

उनकें अवतरण का और भी महत्वपूर्ण पक्ष था - त्याग के आदर्श की प्रतिष्ठा । उन्होंने कामिनी और कांचन का त्याग कीया था । विवाहिंत होतें हुऐ भी वे आजन्म ब्रम्हचारी रहें तथा अपनी पत्नी सारदा के प्रति मातृवत् दृष्टी रखते हुऐ उनकी जगत्माता के रुप में पूजा भी की थी। उन्होंने एक हाथ में रुपयाँ ओर दुसरे मे मिट्टी रखकर - रुपयाँ - मिट्टी और मिट्टी रुपयाँ कहँकर दोनों को गंगा में डाल दियाँ था। और इस प्रकार कांचन के प्रति उनकी मृत्रिकावत् दृष्टी थी। त्याग की भावना उनमें इस चरम सीमा तक पहूँच गयी थी की किसी धातु के पर्श से ही उनका हाथ तेढा हो जाता था तथा उसमें बिच्छू के डंक मारनें जैसी पीडा होती थी । वे कहाँ करतें थे कामिनी और कांचन अनित्य है, एकमात्र ईश्वर ही नित्य है। रुपयें से क्या मिलता है, दाल - रोटी , कपडें और रहनें के लिऐ जगह- बस इतनाहीं और कुछ नहीं । रुपयेंसे ईश्वर नहि मिलतें इस लिऐ रुपया जिवनका उद्देश कदापि नहीं हो सकता।

तो क्या ईश्वर को प्राप्त करनें के लिऐं संसार को त्यागना होगा? क्या संसार में रहते हुये ईश्वर की प्राप्ती नहीं हो सकतीं? वें कहतें है। - संसार में रहतें हुऐ भी भगवान को प्राप्त किया जा सकता है। पर उसके लिए मनको संसार का काम करतें हुये भी भगवान में लगना होगा। माता -पीता, स्त्री-पुत्र आदी सबके साथ रहते हुए सबकी सेवा करनी चाहिए किन्तु मन में इस ज्ञान को दृढ रखना चाहिए कि ये हमारे कोई नही हैं। जैसे किसी धनी के घर की दासी उसके घर का सारा कामकाज करती हैं पर उसका मन अपने गाँव के घर में लगा रहता हैं। मालीक के बचों को वह अपने बचों की तरह लालन पालन करती है पर मन ही मन खूब जानती है कि ये मेरे कोई नही हैं। हाथों में तेल लगाकर कटहल काटना चाहिए। नहीं तो हातो में उसका दुध चिपक जाता है। भगवद् भक्ती रुपी तेल हाथों में लगाकर संसार रुपी कटहल के लिए हाथ बढाना चाहिए ।

वेदान्त के अन्य आचार्यों की भाँति उन्होने संसार को मिथ्या कहकर नकारा नहीं वरन बताया जब तक व्यक्ती में देह बुध्दी है तब तक संसार को मिथ्या कहना उचित नहीं । संसार धोके की टट्टी नहिं बस आनन्ददायी की कुटिया है जहाँ मैं आनन्द के साथ निवास करता हुं। संसार के प्रती उनकी यही दृष्टि थी। धर्म की अतल गहराइयों को नापने के बावजुद भी श्रीरामकृष्ण अत्यन्त मानवीय थे । उन्होंने अपने शिष्य नरेन्द्र जो बाद में स्वामी विवेकानन्द को कहा था - 'बेटा, धर्म भुखे पेट में नहीं सहता' । निर्विकल्प समाधि लाभ कर जब नरेंद्र ने उनसे प्रार्थना की कि वे सतत शुकदेव के समान समाधी में डुबे रहना चाहते है तो श्रीरामकृष्ण ने उसका तिरस्कार करते हुये कहा, छि, छि, नरेन्द्र ! कहाँ मै सोचता था की तू एक विशाल वटवृक्ष के समान होगा जिसकी छाँव तले संसार की ज्वाला से दग्ध लाखों थके भागे लोग विश्राम ग्रहण करेंगे और कहाँ मै देखता हूँ कि तू अपनी मुक्ति के लीये कातर हो रहा है । अरे, बेटा, अपनी मुक्ति की चेष्टा से भी उच्चतर अवस्था है । और बाद मे एक दिन श्रीरामकृष्ण ने नरेंद्रनाथ को समझा दिया था की जीव में शिव को देखकर, नर मे नारायण को देखकर उस शिव या नारायण की सेवा ही अपनी मुक्ती के प्रसाद से बढकर हैं ।

वह सन १८८४ की घटना है। श्रीरामकृष्ण दक्षिणेश्वर के काली मंदीर के अपने कमरे में भक्तों से घिरे बैठे हुए थे । नरेंद्र भी वहाँ उपस्थीत थे । वार्तालाप के प्रसंग में वैष्णव - मत की बात उठी । उस मत के सार तत्व को संक्षेप में व्यक्त करते हुए श्रीरामकृष्ण बोले 'इसके अनुसार ये तीन बातें नित्य करणीय है - नाम में रुची,

जीव पर दया और वैष्णव की सेवा । जो नाम है वही ईश्वर है - नाम और नामी को अभिन्न जानकर सर्वदा अनुराग पूर्वक नाम जपना चहिए, भक्त और भगवान , कृष्ण और वैष्णव को अभिन्न जानकर सर्वदा साधु भक्तो के प्रति श्रध्दा और उनकी सेवा करनी चाहिए तथा यह सारा विश्व कृष्ण का ही है, ऐसा समझकर सब जीवों पर दया ''(करनी चाहीए)'' । ''सब जीवों पर दया'' इतना कहकरही श्रीरामकृष्ण समाधिस्थ हो गये । वे वाक्य को पूरा भी न कर पाये । कुछ समय बाद जब उनकी अर्धचेतना लौटी, तो वे कहने लगे, ''जीवों पर दया - जीवों पर दया ? दूर हो मूर्ख ! तू कीटानुकीट ! जीवों पर दया करेगा ? दया करनेवाला तू होता कौन है ? नहीं, नहीं - जीवों पर दया नहीं - शिव भाव से जीव की सेवा!''

भावाविष्ट श्रीरामकृष्ण की यह बात सुनी तो सभी ने, पर उसका गूढ मर्म नरेन्द्र को छोडकर उस समय कोई भी नहीं समझ सका । श्रीरामकृष्ण के प्रकृतिस्थ होने पर, नरेन्द्र कमरे से बाहर आकर बोले, '' गुरुदेव की बात से आज कैसा अद्भूत आलोक मिला ! शुष्क, कठोर और निर्मल समझे जानेवाले वेदान्त ज्ञान को भक्ति के साथ मिलाकर उन्होंने कैसा सहज, सरस और मधूर प्रकाश डाला है ! अब तक तो यही सुनते आ रहे थे कि अद्वैत ज्ञान की प्राप्ती के लिए संसार और लोगों का साथ एकदम छोडकर बन में जाना होगा और भक्ति आदि कोमल भावनाओं को हृदय से बलपूर्वक निकालकर सदा के लिए दूर फेंक देना होगा । इसका मतलब यही हुआ कि संसार और संसार के प्रत्येक व्यक्ति को धर्म के रास्ते में बाधक मानो और इसलिए उनसे घृणा करो । इस प्रकार की भावना का पोषण करने से तो साधक के विपथगामी होने की ही अधिक सम्भावना रहती है । परन्तु आज गुरुदेव ने भावावेश में जो कुछ कहा, उससे यही समझ में आया कि वन के वेदान्त को घर में लाया जा सकता है, संसार के सभी कार्यों में उसका सहारा लिया जा सकता है । मनुष्य जिन कर्मों को कर रहा है, उन्हें करता रहे, उससे कोई हानि नहीं, केवल हृदय से इस बातपर दृढ विश्वास और धारणा कर ले कि ईश्वर ही जीव और जगत होकर उसके सामने प्रकाशित है । जीवन में प्रति पल वह जिन लोगों के संपर्क में आ रहा है, जिन्हें प्यार कर रहा है, जिनके प्रति श्रध्दा और सम्मान व्यक्त कर रहा है अथवा दया दिखा रहा है, वे सबके सब ही ईश्वर के ही अंश है - वास्तव में ईश्वर स्वरुप ही हैं । संसार के सभी लोगों के प्रति यदि वह इसी प्रकार शिव ज्ञान का पोषण कर सके, तो अपने को बडा समझकर उनके प्रति राग, द्वेष, दंभ या दया करने की गुंजाइश ही कहाँ रहती है ? इस भाँति 'शिव-भाव से जीव - सेवा' करते करते साधक का चित्त शुध्द हो जायेगा और वह थोडे समय में आपने को भी चिदानन्दमय ईश्वर का अंश तथा शुध्द - बुध्द - मुक्त स्वभाव अनुभव कर सकेगा ।

''गुरुदेव की इस उक्ति से भक्तिमार्ग पर भी विशेष प्रकाश पडता है । ज़ब तक सर्वभूतों में ईश्वर के दर्शन नहीं होते, तब तक यथार्थ भक्ति या पराभक्ति का अधिकारी होना साधक के लिए दूर की बात है । कहना न होगा कि शिव या नारायण समझकर जीव की सेवा करने से साधक अल्पकाल में ही ईश्वर को सबके भीतर देख सकेगा और यथार्थ भक्ति की प्राप्ति कर कृतकृत्य हो सकेगा । जो लोग कर्मयोग या राजयोग के सहारे आगे बढ रहे हैं उन्हें भी इस उक्ति से विशेष आलोक मिलेगा । शरीरधारी जब एक क्षण भी बिना कर्म किये नहीं रह सकता, तब 'शिव भाव से जीव सेवा' रुप कर्मानुष्ठान के द्वारा वह शीघ्र अपने लक्ष्य को पा सकेगा, यह कहने की आवश्यकता नहीं । जो हो यदि भगवान ने मुझे कभी मौका दिया तो आज जो मैंने सुना है उस अद्भुत सत्य का संसार में सर्वत्र प्रचार करुंगा - पंडित - मूर्ख - धनी - निर्धन, ब्राह्मण चाण्डाल सबको सुनाकर मुग्ध करुँगा ।''

और भगवान ने नरेन्द्र को मौका दिया भी । अगस्त १८८६ ई. में श्रीरामकृष्ण की महासमाधी के बाद नरेन्द्र प्रमुख शिष्य गण संन्यास का बाना धारण कर

वराहनगर मठ में संघ बद्ध होकर रहने लगे और नरेन्द्र स्वामी विवेकानंद के नाम से परिचित हुए । जब १८९७ के प्रारंभ में स्वामी विवेकानंद अमेरिका और अन्य यूरोपीय देशों के प्रवास से विश्व प्रसिध्द बनकर भारत लौटे तो अपने गुरुदेव की उपर्युक्त वाणी को मूर्तरुप देने के लिए उन्होंने रामकृष्ण संघ की विधिवत् स्थापना की और उसके समक्ष द्विविध आदर्श रखे - एक वेदान्त के संन्यासी उपदेशक तैयार करना और दूसरा गृहस्थ भक्तों के सहयोग से विविध परोपकारिक और सेवाकार्यों का प्रवर्तन करना। पहला कार्य रामकृष्ण मठ के द्वारा उपासना, संन्यासी कार्यकर्ताओं के प्रशिक्षण तथा धर्म प्रचार के माध्यम से तथा दूसरा कार्य रामकृष्ण मिशन के द्वारा धर्म की पृष्ठभूमि के साथ सामान्य तथा अभियांत्रिकी शिक्षा, औषधालय, अस्पताल, अकाल, बाढ आदि अन्य सेवा, ग्राम - सेवा तथा विभिन्न सांस्कृतिक कार्यों के द्वारा संपादित किया जा रहा है । इसके मूल में आदर्श है - 'शिव भाव से जीव सेवा।' तथा यही श्रीरामकृष्ण भावधारा की अपूर्वता है ।

• • • • • •

*'' बडा कठीन मार्ग है । उन्हे जरासा समझ लेने से क्या होगा ? वशिष्ठ कितने बडे थे, उन्हे भी पुत्रों के लिये शोक हुआ था । लक्ष्मण ने उन्हें शोक करते हुये देख अश्चर्य में आकर राम से पुछा । राम ने कहा, 'भाई इसमें आश्चर्य क्या है ? जिसे ज्ञान है, उसे अज्ञान भी है । भाई, तुम ज्ञान और अज्ञान दोनो को पार कर जाओ । पैर में काँटा लगता है, तो एक और काँटा खोज लाना पडता है, उस काँटे से पहला काँटा निकाला जाता है, फिर दोनो ही काँटे फेंक दिये जाते है । इसीलिये अज्ञानरुपी काँटे को निकालने के लिये ज्ञानरुपी काँटा संग्रह करना पडता है, फिर ज्ञान और अज्ञान के पार जाया जाता है ।*

*- श्री रामकृष्ण*

*(श्रीरामकृष्ण वचनामृत पृ. ८४३ भाग २)*

*''शुध्द आत्मा निर्लिप्त है। उसमे विद्या अविद्या दोनो है परंतु वह निर्लिप्त है । वायु में कभी सुगंध मिलती है, कभी दुर्गन्ध परंतु वायु निलिप्त है ।*

*मै वही शुध्द आत्मा हुँ, शुध्द आत्मा निर्लिप्त है, प्रकृति के परे है । उसे न भूख है न प्यास, न जन्म है, न मृत्यु, वह अजर, अमर और सुमेरुवत् है ।*

*जिसे यह ब्रह्म ज्ञान हुआ हो, वह जीवन्मुक्त है। वह ठीक समझता है कि आत्मा अलग है और देह अलग । ईश्वर के दर्शन करने पर फिर देहात्मबुध्दि नहीं रह जाती । दोनो अलग अलग है । जैसे नारियल का पानी सूख जाने पर भीतर का गोला और उपरका खोपडा अलग अलग हो जाते है । आत्मा भी उसी गोले की तरह मानो देहके भीतर खडखडाती हो । उसी तरह विषयबुध्दिरुपी पानी के सूख जाने पर आत्मज्ञान होता है । तब आत्मा एक अलग चीज जान पडती है और देह एक अलग चीज ।*

*कच्ची सुपारी या कच्चे बादाम के भीतर का गूदा छिलके से अलग नही किया जा सकता । परंतु जब पक्की अवस्था होती है, तब सुपारी और बादाम छिलके से अलग हो जाते है । पक्की अवस्थामें रस सूख जाता है। ब्रह्म ज्ञान के होने पर विषय - रस सूख जाता है ।*

*- श्री रामकृष्ण*

*(श्रीरामकृष्ण वचनामृत पृ. ८५० भाग २)*

# Vivekananda : A Hundred Years After

- Swami Jitatmananda

Driving down the Hollywood highway to Trabuco, inside the mountainous California valley, one eventually enters an extremely beautiful Vedanta Ashrama studded with trees and lawns, in the midst of which stands a golden-bust of Swami Vivekananda over a small lotus tank, and shaded by bushy Californian trees. There He meditates with the profound peace of Buddha, and the transcendence of Shiva. There the Western Vedantists see in him the presence of a living Christ. A hundred years ago in 1900 the Californians heard in his voice the burning words of Christ. **"You have heard, that Christ said, 'my words are spirit and they are life'. So are my words spirit and life. They will burn their way into your brain and you will never get away form them.'** (1) The world found in Vivekananda an alter ego, "a voice without a form" of his ceraphic master Shri Ramakrishna. Long ago his master wrote in a piece of paper "Naren will teach the world, when he will thunder at home and abroad." Others may be speakers, orators or preachers but Vivekananda was an apostle of God. Once when he did "a little bomb throwing" by declaring the 'smashing truths' of Vedanta, (2) and defended the Indian concept of chastity above the so called freedom of a sensate culture, his disciple reminded him that he was speaking to an Western audience, Vivekananda did not answer, but simply said, **"Within ten years of my death, I will be worshipped as a God." (3)**

Californians who met Vivekananda in 1900 wrote: **" He was one of the greatest souls that had visited the earth for many centuries. An incarnation of his Master, of Krishna, Buddha, Christ and all other great souls (he was). No person stood out with such magnificent individuality... compared to whose gigantic intellect they (University professors) were mere children. This great Hindu cyclone has shaken the world,"** (4) He radiated with full force all the energies of a divine prophet - physical, intellectual, spiritual, and emotional. In spite of his Greco-Roman body, prodigious intellect and enormous spiritual power he was essentially a lover, a servant of humanity, a poet, and a mystic who could take superconscious flight to highest meditation or samadhi, at any time.

The first impact of Vivekananda on a pure soul was almost always phenomenal. Most of them got spiritually transfigured for the rest of their life. Most of them rediscovered themselves as lions and no more as lambs, just as when the elder lion took the deluded lion-cub bleating like a lamb, to the water pond and revealed for the first time, his own real identity-that it was not born for eating grass but to live like a roaring lion in perfect supremacy. Vivekananda himself was conscious of this power and confided to his disciples, **" When I stand on platform a power comes over me which makes me feel as though by one word I could carry the thousands across maya and make them break the prison walls of I and 'Mine'. (5)**

Mrs. John Henry Wright who met Vivekananda in America, even before the Parliament of Religion, wrote about him. "There was a commanding dignity and impressiveness in the carriage of his neck and bare head, that caused everyone in sight to stop and look at him; he moved slowly, with the swinging tread of one who had never hastened." Mrs. Mary Funke, a disciple of Vivekananda, wrote: "I can see him yet as he stepped upon the platform [in Detroit]

a regal, majestic figure, vital, forceful, dominant." But much more overwhelming was the aura of Infinite that always clung to him like a halo. "There was something in his beauty not of earth", Mrs. Funke wrote afterwards. It is his spiritual beauty that made Mrs. Wright write that he was " about thirty years old in times, ages in civilizations." He lived in myriad moods. In Massachusetts one who had seen him facing missionary antagonism, found him "Power personified." Josephine Mcleod, the dynamic Vivekanandist found in her master "Love personified." Sister Devamata who first heard him in New York, wrote: "He stood there - prophet of infinitude". American journalist - poetess Ela Wheeler Wilcox, who first heard him in Chicago, wrote of her first impression. "I believe him to be reincarnation of some great spirit. Perhaps Buddha, perhaps Christ." A young American who first saw and heard him was overwhelmed by his very presence and recorded: **"What a giant, what strength - what manliness, what a personality. I could not analyse it. I remembered what had been said of Lord Buddha - " A lion amongst man. I felt that swamiji had unlimited power, that he could move heaven and earth, if he will it.** (6) The uplifting power of his words was unmistakable to anyone. Sister Christine wrote: **"No written words can convey the vitality, the power, the majesty that came with his spoken words. It was great enough to move the world, let alone one little human personality, which was but a straw upon its mighty current** (7) Lilian Montgomery who heard him in New York wrote: "Every word he uttered came from a state of realization. But there was purity, and an intense power. It seemed to pour from an infinite source, and it was perfectly calm, perfectly reposed. He sat in meditation...Power seemed to emanate form him. I was fascinated; he looked like a living Buddha." (8) His own brother disciple Swami Abhedananda exclaimed: **"Oh, what a Power Shri Ramakrishna left for the world in Swamiji! Hasn't he changed the very thought-current of the world?'"** (9) And he did move heaven and earth. Within a span of nine years he altered the thought currents of half the globe.

Neither Buddha nor Christ came to the West. For the first time in history', Vivekananda, a gigantic spiritual personality like Christ and Buddha, came to the Western shore and gave the West the essence of Vedanta philosophy.

**"Be not an imitation of Jesus, but be Jesus! You are quite as great as Jesus, Buddha, or anybody else." "I fall down and worship (the Messengers of God); I take the dust of their feet. But they are dead, dead as door-nails! and we are alive. We must go ahead! (10) It is Vivekananda's "New Gospel" of Vedanta - an orientalisation of Western religious modes - an interiorisation of God. He again taught them :"The highest good is the realization of the Self. It is beyond sense, beyond thought."**

**"Christs and Buddhas are but waves on the Infinite Ocean that I AM.' (Inspired talks)**

**"oh if you could know yourselves! You are souls; you are Gods. If ever I feel blaspheming, it is when I call you man."**

**"What has it to do with you that Moses saw God in a burning bush? The fact that Moses saw God in buring bush does not constitute your seeing him, does it? If it does then the fact Moses ate is enough for you, you ought to stop eating. One is just as sensible as the other. (11)**

Yet Vivekananda glorified and worshipped all prophets. "But saviors, books, prophets, ceremonials, etc., have their places. They may help many, as kali worship helps me in my secular work. They are welcome," he said

(12) In spite being an Advaitin, a monist, he respected and participated in all forms of worship, rituals, or prayers. In Vivekananda rituals, mythology and philosophy - made three gradual steps for human evolution. Above all, he stood like his master "deep as the ocean, and broad as the sky ", a man without frontiers of caste, creed, nationality and religion. He was born to fulfil one single aim - spiritualisation of civilization - bringing a flood of man's essential divinity in every sphere of life - West or East.

One American disciple remembered: **"Once before beginning his lecture he looked at the audience for a moment and then said: "Arise, awake and stop not till the goal is reached. It was like an electric shock! Marvelous!** (13). Even after thirty years the charm of Vivekananda's words electrified one of the greatest minds of 20'th Century West, Romain Rolland, who wrote: "His words are great music phrases in the style of Beethoven, stirring rhythms like the march of Handel choruses and I cannot touch these sayings of his scattered as they are at a distance of thirty years without receiving a thrill through my body like an electric shock." "One never knew what music was until one heard that marvelous voice," wrote Sister Christine. (14)

In 1895 at Thousand Island Park the prophet had spent six spiritually most fruitful weeks, and initiated twelve American disciples with mantra for spiritual life. Next year in 1896 Vivekananda had dreamt of Vedanta Retreats or Ashramas and "yellow-garbed sannyasins to spread over the Western soil. "What an amount of good it would do to this country," (15) He wrote. Soon a Vedanta student of Swami Abhedananda, Miss Minnie Book offered her homestead for the general use and benefit of Vedanta Students of Philosophy, This was "Shanti Ashrama," "the first Vedanta Retreat in the Western world" (16) Where Vivekananda's brother disciple Swami Turiyananda lived a death-defying life in an arid desert area, living virtually alone with a few disciples, on God.

Today we have many beautiful Vedanta Retreats spread over U.S.A. all run and guided by the monks of Ramakrishna order. The Prophet's dream has come literally true today. From Hollywood a little distance away, on the shore of Pacific is the picturesque hilly valley of Santa Barbara, with its Vedanta convent where highly accomplished American nuns in Ochre teach physics and Vedanta in the University. Similarly a Vedanta convent and an Ashrama run in the heart of San Francisco. The building at Pasadena twenty miles down to Hollywood where Vivekananda stayed for six week to preach Vedanta in the Bay area with his three disciples Mrs. Hanssborough, Mrs. Aspinall, Mrs. Wycoff, has been preserved today as heritage building by the Govt. of America.

New Vedanta Rĕtreats have come up at Ganges town near Michigan, at St. Louis, Portland, Sacramento, Seattle, and the beautiful estate of Ridgley Manor in Catskill mountains where Swamiji lived for four times. Then there are Vedanta Centres in Buckinghamshire near London, and Gretz near Paris, at Amsterdam, Moscow, New York, Chicago. And now in the east, in Sydney, Malaysia, Singapore, Japan, Fiji and Mauritius Vedanta Centers are emerging to fulfil the dream of the prophet. Shri Ramakrishna Math at Belur and Mayavati Advaita Ashrama in the Himalayas, the two homes for the wanderer Vivekananda are already world-famous. The places in India where Vivekananda stayed, are slowly emerging as centers of Ramakrishna Vedānta culture. To-

day we have such centers like Vivekananda's birthplace in Calcutta, Castle Karnan in Chennai where he lived for ten days, Porbandar where he lived for some seven weeks, Limbdi Royal Palace and Belgaum where he stayed for ten days each, the Royal palace of Khetri where he came twice - all these have emerged as fulfledged centers of the Ramakrishna Vedanta Culture. In 1894 Vivekananda made a self-revelation to the American disciples: "I have a message for the West as Buddha had a message for the East." Did the world listen to Vivekananda's message of Vedanta ? Only history will tell in the days to come.

The seeds Vivekananda had sown are sprouting in many ways. Romain Rolland wrote: **"Vivekanandas speak to humanity. They cannot whisper if they would, and he did not attempt to do so. A great voice is made to fill the sky. The whole earth is its sounding box ... Vivekananda appeared inspite of himself as an emperor."** (17) British orientalist A.L.Basham, described Vivekananda as the *Moulder of the Modern World.* Bashama declared in 1963 that it is Vivekananda who initiated a "counter attak" form the East to the West, which is still going on and "having appreciable effect." Eminent 20th Century sociologist of America P.A. Sorokin admits that the two dominant characteristics of modern civilisation are the shifting of the centre of civilisation from the West to the East and the spread of the Ramakrishna-Vedanta Movement all over the West. (18)

One recent American author wrote that while Columbus discovered the soil of America Vivekananda discovered the soul of America.

One could see that Vivekananda was the annointed one of God. In Nainital, in the Himalayas, a Mohammedan gentleman told him, ***"Swami, if in after times, any claim you as an Avatar, remember, that I, a Mohammedan am the first!".*** (19) Oh that blessed night when two great disciples of Vivekananda, Sister Christine and Mary C. Funke went to Thousand Island Park to accept him as their master, the first words they said, are: "We have come to you just as we would go to Jesus if he were still on earth and ask him to teach us."

**Sri Aurobindo saw in Vivekananda the image of an Awakened India :** "We perceive his influence still working gigantically, we know not well how, we know not well where, in something that is not yet formed, something leonine, grand, intuitive, upheaving that has entered the soul of India and we say, "Behold, Vivekananda still lives in the soul of his Mother and in the souls of her children." (20)

His American disciple Josephine McLeod who perhaps knew him most intimately saw in him the emergence of a "World force". She wrote **" I have known and lived for seven years with a world force ... One man by sheer weight of character can change a community, country, world, eternity."** Two months before his death Vivekananda confided to this disciple: "The spiritual impact that has come to Belur will last fifteen hundred years. ... Don't think I imagine it. I see it." (21)

Will Durant wrote in his last book Lessons of *History* "Civilisation advances Westward". In 19th Century German philosopher Schopenhauer predicted on the epoch- making impact of Upanishadic thoughts in the coming age : "In the whole world there is no study so beneficial and so elevating as that of the Upanishads... The whole world is about to see a revolution in thought more extensive and more powerful than that which was witnessed by the Renaiscance of Greek literature." Schopenhauer's prophecy came true through the emergence of Vivekananda. (22)

• • • • • •

*Reference*


1. Marie Louise Burke: Swami Vivekananda : Second visit to the West, Advaita Ashrama, Calcutta: P.451.
2. Marie Louise Burke: Swami Vivekananda in the West, Advaita Ashrama, Calcutta : Vol. 6: P.470.
3. Ibid P.51
4. Marie Louise Burke: Swami Vivekananda ; Second visit to the West, Advaita Ashrama, Calcutta: P.602
5. Swami Jitatmananda: Swami Vivekananda! Prophet and pathfinder P.6-7
6. M.L.Burke: Swami Vivekananda in the West Vol.1 P.86.
7. Ibid 294
8. Marie Louise Burke: Swami Vivekananda in the West, Advaita Ashrama, Calcutta : Vol.6 : P.279-80
9. Ibid P. 277
10. Ibid P. 249
11. Swami Vivekananda : Inspired talks (Vol. 7: Complete Works), Marie Louise Burke: Swami Vivekananda in the West, Advaita Ashrama, Calcutta : Vol.3: P.43.
12. Marie Louise Burke: Swami Vivekananda in the West, Advaita Ashrama, Calcutta : Vol.6: P.260.
13. Ibid P. 64
14. Reminiscences of Swami Vivekananda, Advaita Ashrama, Calcutta: P.I 50.
15. Marie Louise Burke: Swami Vivekananda in the West, Advaita Ashrama, Calcutta : Vol.6: P.256.
16. IbidP.292
17. Romain Rolland : Life of Vivekananda: P.312
18. World Thinkers on Ramakrishna Vivekananda P.ll
19. Complete Works of Sister Nivedita:, 1973, Vol.1 P.284
20. World Thinkers on Ramakrishna Vivekananda P.36
21. Vedanta Kesari: 1983: P.163 : Reminiscences of Swami Vivekananda: (1999) P.243
22. Complete Work of Swami Vivekananda Vol.3: Lecture at Colombo

# भारतीय स्त्रिया

– स्वामी विवेकानंद

अनुवादक : स्वामी पीतांबरानंद,
रामकृष्ण मिशन आश्रम, चंडीगढ

पुज्यपाद स्वामी विवेकानंदांनी १७ डिसेंबर १८९४ रोजी अमेरिकेतील केंब्रिज शहरी दिलेले हे व्याख्यान मेरी लुई बर्क यांच्या स्वामी विवेकानंद इन द वेस्ट : न्यू डिस्कव्हरीज : हिज प्रॉफेटिक मिशन : खंड २ : परिशिष्ट ८० यात प्रथम प्रसिद्ध झाले व मराठीत याचा अनुवाद यापूर्वी प्रसिद्ध झालेला नाही.

सभ्य स्त्री-पुरुष हो ! भारतीय स्त्रियांविषयी बोलतांना मला असे वाटत आहे की, भारतातील माझ्या आयांविषयी व बहिणीविषयी मी भिन्न मानवसमाजातील असलो तरी ज्यांच्यातील कित्येक मला आया-बहिणींप्रमाणेच आहेत अशा स्त्रियांसमोर बोलणार आहे. आणि, दुर्दैवाने अगदी अलीकडच्या काळात आमच्या देशातील स्त्रियांना शिव्या शाप देणारी तोंडेच आढळतात हे खरे असले तरी, मला शोधान्ती असे आढळून आले आहे की त्यांच्याविषयी सद्भाव बाळगून शुभेच्छा व्यक्त करणाऱ्या व्यक्तीही अस्तित्वात आहेत. या देशात श्रीमती बुल, कुमारी फार्मर व कुमारी विलार्ड यांच्यासारख्या उदार व मोठ्या मनाच्या व्यक्ती मला आढळल्या, तसेच या जगात अभिजात म्हणविल्या जाणाऱ्या सर्वोच्च कुळाच्या त्या अद्भुत थोर प्रतिनिधीही आढळल्या की ज्यांना पाहून, येशू ख्रिस्तांच्या ६०० वर्षे पूर्वी भारतात जन्मलेल्या, लोकांशी मिसळण्यासाठी राजसिंहासन सोडून देणाऱ्या त्या महापुरुषाची आठवण होते. श्रीमती हेन्री समरसेट ह्या माझ्या दृष्टीस पडलेल्या एक अत्यद्भुत थोर महिला होत. मला, माझ्या देशाला व आमच्या स्त्री-पुरुषांना शाप न देता नेहमी शुभेच्छा व्यक्त करणाऱ्या व ज्यांचे हात नि हृदय ही नेहमी मानवजातीची सेवा करण्यास तयार असतात अशा थोर व्यक्ती भेटल्या की माझ्या अंगी साहस भरून येते.

प्रथम भारताच्या इतिहासाच्या प्राचीन काळावर ओझरती नजर टाकण्याचा माझा मानस आहे. तुम्हा सर्वांना बहुधा हे माहित असेल की, तुम्ही अमेरिकन लोक, आम्ही हिंदू लोक व आईसलॅण्डहून आलेल्या ह्या बाईसाहेब हे आर्य नामक एकाच वंशातील पूर्वजांचे वंशज आहोत. आर्य लोक जिथे जिथे गेले तेथे तेथे सर्वोपरी तीन गोष्टी आढळून येतात : एकेका खेड्यातील समाजव्यवस्था, स्त्रियांचे स्वातंत्र्य व आनंदपूर्ण धर्म. प्रथम म्हणजे खेड्यातील समाजव्यवस्था - श्रीमती बुल यांच्याकडून उत्तरेकडील भागाविषयी आताच आपण जसे ऐकले तसे - प्रत्येक माणसाचे त्या समाजात स्वतःचे एक स्थान असे व स्वतःच्या मालकीची जमीन असे. आज आपण जगात ज्या सर्व राजकीय पद्धती पाहतो त्यांची सुरुवात ह्या खेड्यांतील समाजपद्धतीपासूनच झालेली आहे, आर्य लोक जसजसे निरनिराळ्या देशांत जाऊन वसती करून राहिले तसतशा तेथील वेगवेगळ्या परिस्थितींप्रमाणे वेगवेगळ्या विशिष्ट पद्धती विकसित होत गेल्या. आर्यांची दुसरी कल्पना म्हणजे स्त्रियांचे स्वातंत्र्य ही होय. प्राचीन काळी स्त्रियांचा वाटा पुरुषांसारखाच असल्याचे आपल्याला फक्त आर्यांच्याच वाङमयात आढळते, जगातील इतर कोणत्याही वाङमयात तसे आढळून येत नाही. आमच्या सर्वात जुन्या वाङमयाला वेद म्हणतात - हे सर्व जगातील सर्वात प्राचीन वाङमय असून माझे व तुमचे एकच असे जे पूर्वज लोक त्यांनी रचलेले आहे (हे बहुधा भारतात लिहिले गेले नसून बाल्टिक समुद्राच्या किनाऱ्यावर वा कदाचित मध्य आशियात - माहित नाही कुठे लिहिले गेले आहे), या वेदांच्या सर्वात प्राचीन भागात सूक्ते वा प्रार्थनामंत्र आढळतात व आर्य ज्या देवतांची पूजा करीत त्यांना उद्देशून हे म्हटलेले असतात. 'देव', 'देवता' या संस्कृत शब्दांचा अर्थ 'द्युतिमान' वा 'प्रकाशमान' असा होतो.

हे मंत्र अग्नी, सूर्य, वरुण इत्यादी देवताप्रीत्यर्थ असतात. सुरुवातीलाच सांगितलेले असते की, "अमुक

अमुक ऋषीने हे सूक्त रचले असून ते अमुक देवतेप्रीत्यर्थ आहे.'' चवथ्या - पाचव्या सूक्तानंतर एक आगळेच सूक्त येते, कारण ते एका स्त्री - ऋषीने केलेले आहे व जो एक परमेश्वर या सर्व देवतांना आधारभूत आहे त्याला उद्देशून ते आहे. शिवाय, इतर सगळी सूक्ते ही तृतीय पुरषी संबोधनाची आहेत म्हणजे जणू कुणीतरी या देवतांना उद्देशून काही बालेत आहे, परंतु या सूक्ताचा प्रकार वेगळा आहे - स्वत: परमेश्वरच स्वत:विषयी बोलत आहे - त्यात वापरलेले सर्वनाम 'मी' हे आहे. ''मी या जगाची सम्राज्ञी आहे - सर्व प्रार्थना पूर्ण करणारी आहे'' इ.

वेदांमधील स्त्रियांच्या कामगिरीची ही पहिली ओळख होय. पुढे आपल्याला दिसेल की त्यांच्या वाट्याला अधिकाधिक कामगिरी येत आहे व त्या पौरोहित्यही करीत आहेत. 'स्त्रिया ह्या कधीही पौरोहित्य करू शकत नाहीत असा अर्थ ज्यातून अप्रत्यक्षपणेही काढता येईल असा एकही उतारा संपूर्ण वेदवाङ्मयामधे नाही. याउलट, स्त्रिया पौरोहित्य करीत असल्याची कितीतरी उदाहरणे त्यात आहेत. त्यानंतर आपण या वेदांच्या अंतिम भागाकडे वळू, कारण खरोखर हा 'वेदान्त' च भारताचा धर्म होय- व यात घनीभूत झालेल्या ज्ञानाहून अधिक श्रेष्ठ ज्ञान हे सध्याच्या शतकातही प्राप्त झालेले नाही. येथेही स्त्रियांचे खूप महत्त्वाचे स्थान दिसून येते, या ग्रंथांमधील बराचसा अंश म्हणजे स्त्रियांच्या तोंडून निघालेले शब्द होत. त्यांत त्यांच्या नावासकट व शिकवणीसह तशी नोंद केलेली आहे.

त्यांत महर्षी याज्ञवल्क्यांची सुंदर कथा आहे. त्यांनी जनक नावाच्या थोर राजाच्या राज्याला भेट दिली आणि तेथील विद्वानांच्या सभेत त्यांना प्रश्न विचारण्यात आले. एका पुरुषाने ''अमुक यज्ञ मी कसा करावा'' असे विचारले. दुसऱ्या एकाने मी ''अमुक यज्ञ कसा करू'' म्हणून विचारले. त्यांनी त्यांना उत्तरे दिल्यानंतर एक स्त्री उठून उभी राहिली व म्हणाली - ''हे सर्व बालिश प्रश्न आहेत. आता सांभाळा, माझे दोन प्रश्न हे दोन बाणांप्रमाणे येतील. देता येतील तर त्यांना जवाब द्या, अन् मग आम्ही तुम्हाला महर्षी मानू. पहिला प्रश्न म्हणजे 'आत्मा काय आहे ?' व दुसरा प्रश्न म्हणजे 'परमेश्वर काय आहे ?' याप्रमाणे भारतात आत्मा व परमेश्वर यांच्यासंबंधीचे अति महत्त्वाचे प्रश्न चर्चिले गेले व ते एका स्त्रीच्या तोंडून निघाले होते, त्या महर्षींना तिच्या परीक्षेला तोंड द्यावे लागले व ते त्यात उत्तम रीतीने उत्तीर्ण झाले.

यापुढच्या काळातील वाङमयात म्हणजेच 'रामायण' व 'महाभारत' या महाकाव्यांमधे आपल्याला आढळून येते की, तेव्हाही शिक्षणाचा दर्जा खालावलेला नवहता. विशेषतः राजे लोकांच्या जातीत म्हणजे क्षत्रियांमधे सुशिक्षितपणाचा आदर्श उत्तम रीतीने जतन करून ठेवण्यात आला होता. वेदांमधे विवाहाविषयीची अशी पद्धत आढळते की, मुली स्वतःच वर निवडून घेत व तसेच मुलेही करीत. पुढील काळात त्यांचे आई-वडील त्यांचे लग्न लावून देऊ लागले, परंतु याला क्षत्रियांचा अपवाद होता. या बाबतीत दुसऱ्या बाजूचाही विचार तुम्ही करावा असे मला तुम्हाला सांगावेसे वाटते. हिंदूबद्दल इतर काहीही म्हटले तरी हे खरे की जगात आजवर झालेल्या मानववंशात तेच सर्वात अधिक विद्याव्यासंगी लोक होत. ते स्वभावतःच तत्त्वचिंतक अतात, ते सर्व गोष्टींचा बुद्धीने विचार करून पाहतात. सर्वकाही ज्योतिषशास्त्राच्या सिद्धांन्तानुसार ठरविण्यात येते. सर्व स्त्री-पुरुषांचे भवितव्य ग्रहांनी नियंत्रित होत असते असा त्यांचा सिद्धान्त होता. आजदेखील मूल जन्मताच त्याची जन्मपत्रिका तयार करण्यात येते. त्यानुसार मुलाच्या जन्मगत स्वभावाचा निर्णय होत असतो, कुणी दैवी स्वभाव घेऊन जन्माला आलेला असतो, कुणी मानवी तर कुणी हीन प्रकृती घेऊन जन्माला येतात. प्रश्न असा असे की, जर राक्षसप्रवृत्तीच्या मुलाचे वा मुलीचे लग्न दैवी स्वभावाच्या मुलीशी वा मुलाशी लागले तर ते एकमेकांच्या अधःपतनास कारणीभूत होणार नाहीत काय ?

दुसरी अडचण अशी होती की, आमच्याकडील नियमांनुसार एकाच गोत्राच्या मुलामुलींचे आपसात लग्न लावू दिले जात नसे. स्वतःच्याच कुटुंबात किंवा अगदी जवळच्या नातेवाईकात लग्न करू नये एवढेच नव्हे, तर पित्याच्या किंवा मातेच्या गोत्रात जन्मलेल्यांशीही लग्न

करता कामा नये. तिसरा एक प्रश्न असा की, वराच्या किंवा वधूच्या सहा पिढ्यांमध्ये कुष्ठरोग किंवा क्षयादि बरे न होणारे आजार असल्यास लग्नच करू नये. या तिन्ही अडचणी लक्षात घेऊन ब्राह्मणांना वाटते की, 'आपण जर मुलाला वा मुलीला स्वतःच वधू वा वर निवडण्याचे स्वातंत्र्य दिले तर ते केवळे सुंदर चेहरा पाहून भाळतील व वरील सर्व प्रकारांमधे कुटूंबाला विनाशाप्रत नेतील.' तुम्हाला आमच्या समाजात विवाहाचे जे सारे नियम आढळून येतात त्यामागील मूळ कल्पना ही अशी आहे, अन् ते बरोबर असो की चूक असो पण त्याचा आधार म्हणजे वरील तत्त्वज्ञान होय. रोगावर उपचार करण्यापेक्षा रोग होऊ न देणे चांगले. जगात जे दुःख आहे त्याचे कारण म्हणजे आपणच दुःखाला जन्म देता, व सगळा विचार यासाठीच करायचा की, दुःखी मुले जन्मास येणे कसे टाळायचे. समाजाने व्यक्तीवर केवढा हक्क गाजवावा हा एक न सुटलेला प्रश्न आहे. परंतु, हिंदू म्हणतात की, लग्नासाठी वधुवरांची निवड मुलामुलींवर सोपवू नये. हीच सर्वोत्तम गोष्ट होय असे मला म्हणावयाचे नाही, अन् ते त्यांच्या हाती सोपविणे हेच या समस्येचे सर्वोत्तम समाधान होय असेही मला दिसत नाही ! या समस्येचे संपूर्ण समाधान अजून माझ्या मनाला गवसलेले नाही व कोणत्याही देशाने ते उत्तर शोधून काढल्याचेही मला दिसत नाही !

आता आपण दुसरे एक चित्र पाहू. मी तुम्हाला पूर्वीच सांगितले की, एक आगळा वेगळाच विवाहाचा प्रकार होता (बहुधा राजे लोकांतच तो प्रचारात होता) - त्यामधे मुलीचे वडील विभिन्न राजपुत्र व सरदारांचे पुत्र बोलावून आणून त्यांची एक सभा भरवीत असत अन् त्या सभेत ही सौभाग्यकांक्षणी राजकन्या एका सिंहासनावर बसवून प्रत्येक राजपुत्रापुढून मिरविली जात असे. भाट घोषणा करीत - ''अमुक अमुक राजपुत्र असून यांचे ठायी अमुक अमुक थोर सद्गुण वसत आहेत.'' ती कुमारी एक तर तिथे थबकत असे किंवा ''पुढे चला.'' म्हणत असे. पुढील राजपुत्रासमोर भाट पुनः तसेच वर्णन करीत व राजकन्या म्हणे - ''पुढे चला.'' (हे सगळे आधीच योजलेले असे, तिला कुणीतरी पूर्वीच आवडलेला असे.) मग शेवटी ती सेवकांपैकी कुणाला सांगे की अमक्याला ती माळ अर्पण करायची आहे व तशी ती अर्पण केल्यानेच तिची निवड जाहीर होत असे. (अशा प्रकारचा शेवटचा विवाह हा मुसलमानांच्या भारतावरील आक्रमणाला कारणीभूत ठरला.) हे असले विवाह फक्त क्षत्रियांमधेच होत असत.

रामायण हे संस्कृत भाषेतील सर्वात प्राचीन महाकाव्य होय. त्यात सीतेच्या चारित्र्याच्या रूपाने हिंदूंचा स्त्रियांसंबंधीचा सर्वोच्च आदर्श प्रस्तुत केलेला आहे. असीम धैर्याने व चांगुलपणाने भरलेले तिचे संपूर्ण चरित्र वर्णन करण्यस आपल्याला वेळ पुरणार नाही. आम्ही तिची ईश्वरावतार म्हणून पूजा करतो व तिचे नाव तिच्या पतीच्या आधी घेण्यात येते. आम्ही सर्व देवदेवतांच्या बाबतीत श्रीयुत व श्रीमती असे न म्हणता श्रीमती व श्रीयुत असे म्हणून देवीचे नाव आधी घेत असतो. हिंदूंची आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण कल्पना आहे. ज्यांनी माझ्याबरोबर अध्ययन केले आहे त्यांना माहित आहे की, हिंदू दर्शनांची मध्यवर्ती कल्पना अनंत निर्विकल्प ब्रह्माची असते, तेच विश्वाचा आधार होय. वर्णनातीत अशा ह्या निर्विकल्प ब्रह्माच्या शक्तींना मात्र स्त्रीरूपानेच संबोधिले जाते, अर्थात भारतात देवीलाच सगुण ईश्वराचे स्थान देण्यात येते. ब्रह्मशक्ती ही नेहमी स्त्रीरूपिणीच असते. श्रीरामचंद्र हे निर्गुण ब्रह्माचे व श्रीसीता ही त्याच्या शक्तीचे रूप समजली जाते.

सीतादेवीचे संपूर्ण जीवनचरित्र वर्णून सांगायला आपल्यापाशी पुरेसा वेळ नाही, पण मी तिच्या चरित्रातील असा एक उतारा वाचून दाखवीन की जो या देशातील स्त्रियांना खूप उपयोगी पडेल. तिच्या पतीला वनात जाण्याची आज्ञा मिळाल्यानंतर ते वनात गेलेले आहेत अशी ह्या प्रसंगाची सुरुवात होते. एक स्त्री जी ऋषी म्हणून गणली जात होती तिच्या दर्शनाला हे दोघे जातात. तिच्या व्रतवैकल्यांमुळे व साधनेमुळे ती कृश झालेली होती. सीतेने ह्या थोर स्त्रीच्याजवळ जाऊन तिला प्रणाम केला. तिने

सीतेच्या मस्तकावर हात ठेवला व म्हटले - ''सुंदर शरीर असणे ही मोठी चांगली गोष्ट आहे व ते तुला लाभले आहे. थोर पती लाभणे ही त्याहून आनंदाची बाब होय व तोही तुला मिळाला आहे. सर्वात धन्यतेची गोष्ट म्हणजे अशा पतीच्या आज्ञेत वागणे, तेही तू करतेच आहेस. तुझे जीवन निश्चितच आनंदाने भरलेले असेल.'' त्यावर सीतादेवी उत्तरते - ''आई, देवाने मला सुंदर शरीर दिले व इतका निष्ठावान प्रेमळ पती दिला हे माझे सौभाग्य होय, पंरतु तुम्ही जी तिसरी भाग्याची बाब सांगता त्याबाबतीत मला कळत नाही की मी त्यांच्या आज्ञेत वागते की ते माझ्या आज्ञेत वागतात. मला आठवते ते एवढेच की ज्यावेळी यज्ञीय अग्नीच्या साक्षीने त्यांनी माझा हात आपल्या हातात घेतला त्यावेळी मला दिसून आले की - धगधगत्या अग्नीत तसे प्रतिबिंब दिसले किंवा खुद्द परमेश्वरानेच मला तसे भासविले की - मी त्यांची आहे व ते माझे आहेत, अन् तेव्हापासून मला असेच आढळते की, माझ्यामुळे त्यांच्या जीवनाला पूर्णता येत असून त्यांच्यामुळे माझ्या जीवनाला पूर्णत्व प्राप्त होते.'' या महाकाव्याचे काही अंश इंग्रजीत अनुवादित झाले आहेत. सीता ही भारतात स्त्रियांचा आदर्श होय व सर्व तिची ईश्वरी अवतार म्हणून पूजा करतात.

आता यानंतर आपण थोर स्मृतिकार मनू यांच्याकडे वळू. यांच्या स्मृतिग्रंथात आपल्याला कसे शिक्षित करावे याचे खूप सविस्तर वर्णन केले आहे. कुठल्याही जातीचे असेना का मुलाला सुशिक्षित केलेच पाहिजे असा आर्यांचा दंडक होता हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. मुलाला कसे शिक्षित करावे याचे वर्णन केल्यानंतर मनू लगेच म्हणतात - ''त्याचप्रमाणे मुलींनाही अगदी मुलांप्रमाणेच सुशिक्षित करावे.'' मला पुष्कळदा सांगण्यात आले की, मनुस्मृतीत इतर उतारे मुलींची निंदा करणारे आहेत. आमच्या धर्मग्रंथांमधे स्त्रिया मोह पाडणाऱ्या असतात म्हणून त्यांची निंदा करणारे पुष्कळ उतारे आहेत हे मला मान्य आहे, तुम्हालाही ते आढळून येईल, परंतु स्त्रियांना परमेश्वराची शक्ती म्हणून गौरविणारे उतारे ही त्या आहेत, इतर उतारे असेही सांगतात की, ज्या घरात स्त्रियांच्या डोळ्यांतून एकही अश्रू गळतो तेथे देवता कधीही प्रसन्न होत नाहीत व घराला अवकळा प्राप्त होते. हिंदू धर्मात सुरापान, स्त्रीहत्त्या व ब्रह्महत्त्या हीच सर्वात मोठी पातके मानण्यात आली आहेत. निंदाव्यंजक वाक्ये आहेत हे मी स्वीकारतो, अन् तरीही त्याबाबतीत हिंदूंचे धर्मग्रंथ अधिक श्रेष्ठ असल्याचा माझा दावा आहे, कारण इतर जातीच्या धर्मग्रंथांत स्त्रियांविषयी एकही चांगला शब्द आढळत नसून केवळ निंदाच आढळते.

ह्यानंतर मी आता आमच्या प्राचीन नाटकांकडे वळतो. शास्त्रांमधे काहीही लिहिलेले असो, नाटकांमधे त्या त्या काळातील समाजाचे तंतोतंत प्रतिबिंब पडलेले असते. ख्रिस्तपूर्व ४०० वर्षांपासून तो पुढील काळापर्यत लिहिलेल्या ह्या नाटाकांमध्ये विश्वविद्यालयाचे वा विद्यापीठे देखील मुले व मुली या दोहोंनी भरलेली आढळतील. नंतरच्या काळात स्त्रियांची जशी उच्च शिक्षणापासून फारकत झालेली दिसते तशी त्या जुन्या काळी दिसत नाही, उलटपक्षी त्या सर्वत्र सध्या तुमच्या देशात आहेत त्याप्रमाणेच आढळतात - डाळिंबे घेण्यासाठी बगिच्यातून व उद्यानातून त्या हिंडतांना दिसतात. एक आणखी मुद्दा जो मी आपल्या नजरेसमोर उपस्थित करू इच्छितो तो हा की हक्कांच्या बाबतीत अजूनही हिंदुस्त्रिया या जगातील इतर कोणत्याही स्त्रियांपेक्षा वरचढ आहेत. स्वतःची मालमत्ता असणे याविषयीचे स्त्रियांचे हक्क भारतात पुरुषांप्रमाणेच पक्के असतात व स्वामित्वाचे हे कायदे हजारो वर्षापासून तसेच चालत आलेले आहेत. जर तुमच्या मित्रांपैकी कुणी वकील असेल व हिंदूंच्या कायदेविषयक ग्रंथांचे अध्ययन करील तर तुम्हाला स्वतःलाच ते स्पष्टपणे आढळन येईल. मुलीने कोटी रुपये जरी नवऱ्याच्या घरी आणले तरी त्यांतील पैन् पै ही तिचीच राहील. कुणालाही त्यातील एक पैसाही घेण्याचा हक्क नाही. संतती न होता जर नवरा मरण पावला तर - त्याचे आईवडील जिवंत असले तरी त्यांचीही सारी मालमत्ता पत्नीकडेच जाणार, व हा नियम प्राचीन

काळापासून आजतागायत चालत आलेला आहे. इतर देशांतील स्त्रियांपाशी नाही असा हा एक हक्क हिंदू स्त्रियांना मिळालेला आहे.

जुने धर्मग्रंथ किंवा नवे धर्मग्रंथही हिंदू विधवांना पुनः लग्न करण्याची मनाई करीत नाहीत, त्यांत या गोष्टीवर प्रतिबंध आहे ही कल्पनाच चुकीची आहे. त्यात पुनर्विवाहाची मुभा आहे - जशी पुरुषांना तशी स्त्रियांनाही. आमच्या धर्माचा विचार असा आहे की लग्न हे दुबळ्या मानवांसाठी आहे, व आजही हा विचार सोडून द्यायला मला काही कारण दिसत नाही. ज्यांना स्वतःच्या ठायी पूर्णत्व आढळते त्यांनी लग्न करण्याची गरजच काय. अन् जे लग्न करतात, त्यांना ती एक संधी दिलेली असते, तो डाव संपल्यावर पुरुष व स्त्री दोहोंपैकी कुणीही पुनः लग्न केले तर त्यांना हीन लेखले जाते, पण तंना लग्न करण्याची मनाई असते अशातला भाग नाही. विधवेने लग्न करू नये असे कुठेही लिहिलेले नाही. जी विधवा व जो विधुर पुनः लग्न करीत नाही, त्यांना अधिक आध्यात्मिक गणले जाते. अर्थातच पुरुष हे त्या नियमाचे उल्लंघन करून पुनः लग्न करतात, अन् स्त्रियांमधे उच्च आध्यात्मिक प्रकृती अधिक असल्यामुळे त्या ह्या नियमांचे पालन करतात. एक उदाहरण पहा. आमच्या धर्मग्रंथांत सांगितले आहे की मांस खाणे हे पापाचरण होय, तथापि अमुक एक मांस - उदा. शेळीचे खाता येते. मी शेळीचे मांस खाणारे हजारो पुरुष पाहिले आहेत पण माझ्या उभ्या आयुष्यात उच्च वर्णीयांमधे कुठलेही मांस खाणारी एकही स्त्री माझ्या नजरे पडली नाही. यावरून कळून येई की, स्त्रियांची वृत्ती नियमांचे पालन करण्याकडे - धार्मिकतेकडे झुकलेली असेत. म्हणून हिंदू माणसांविषयी फार कठोर दृष्टी बाळगू नका, त्याबाबतीत माझ्या दृष्टिकोनातून पाहण्याचाही प्रयत्न करा, मीही एक हिंदू माणूस आहे.

अशा प्रकारे विधवांनी लग्न न करणे एक रूढी बनून गेली, अन् भारतात एखादी प्रथा रूढ झाली की तिच्यातून बाहेर पडणे हे प्रायः अशक्य होऊन जाते - तुमच्या देशात तर पाच दिवसांपूर्वीच अस्तित्वात आलेल्या वेशभूषेविषयीच्या फॅशनविरुद्ध तुम्हाला वागणे जड जाते ! दोन जाती सोडून इतर खालच्या जातीत विधवाविवाह चालतो. नंतरच्या काळातील आमच्या विधिशास्त्रांमधे असा उतारा आहे की स्त्रियांनी वेदाध्ययन करू नये. अन् तसाच निषेध असमर्थ ब्राह्मणालाही लावलेला आहे, जर ब्राह्मणपुत्र मनाने सबळ नसेल तर त्यालाही तोच नियम लागून केला जातो. परंतु त्यांना शिक्षण नाकारण्यात येत आहे असा त्याचा अर्थ होत नाही, कारण हिंदूंपाशी वेद हेच काही एकमेव वाङ्मय नाही. इतर कोणतेही पुस्तक स्त्रिया वाचू शकतात - संस्कृत वाङ्मयाचे संपूर्ण भांडार, विज्ञान, नाटके, काव्य या सर्व साहित्याचा महासागर त्यांच्यासाठी खुला आहे, त्या वेदांखेरीज हे सर्व स्वच्छंदाने वाचू शकतात. नंतरच्या काळातील विचार असा की स्त्रियांनी पुरोहित बनणे अभीप्सित नाही, मग त्यांनी वेदपठन करून काय उपयोग ? या बाबतीत हिंदू काही इतर देशांहून फार मागे नाहीत. स्त्रिया ज्यावेळी संसाराचा त्याग करून आमच्या (संन्यासी) संप्रदायात सामील होतात, त्या वेळी मग त्यांना पुरुष वा स्त्री म्हणून जोखले जात नाही, त्यांच्यात मग लिंगभेद नसतो, उच्च वा निम्न जात, पुरुष वा स्त्री हा सगळा विचारच टाकून दिला जातो. धर्माविषयी मला जे काही ज्ञान आहे ते मी माझ्या सद्गुरूंपासून मिळविले व त्यांना तर एका स्त्रीने शिकविले होते.

पुनः राजपूत स्त्रियांकडे वळून मी मुसलमानी आक्रमणाच्या काळातील आमच्या ग्रंथांमधून एका घटनेची गोष्ट तुमच्यापुढे सांगू इच्छितो - एक राजपूत स्त्री ही भारतावरील मुसलमानांच्या स्वारीला कशी कारणीभूत ठरली याची ही गोष्ट आहे. दिल्ली हे एक फार जुने शहर असून तेथील राजपूत राजाला एक कन्या होती. राजपुतान्यातील चितोड येथील राजा पृथ्वीराज यांच्या पराक्रमाची कीर्ती तिने ऐकलेली होती व त्यांच्यावर तिचे प्रेम बसले होते. इकडे दिल्लीच्या राजाने राजसूय यज्ञ करण्याचे ठरविले, त्यासाठी त्याने देशातील सर्व राजांना बोलाविले व त्या यज्ञात त्याचे श्रेष्ठत्व मान्य करून त्यांनी

त्याच्या सेवेची कामे करावीत अशी योजना होती, अन् ह्या यज्ञाबरोबरच त्याच्या कन्येचे स्वयंवर होणार असे त्याने जाहीर केले होते. पण ही कन्या तर पूर्वीपासूनच पृथ्वीराजावर प्रेम करीत होती व तो शक्तिशाली होता दिल्ली राजाचे श्रेष्ठत्व कबूल करणारा नव्हता व म्हणून त्याने ते तसले निमंत्रण स्वीकारले नाही.

मग राजाने पृथ्वीराजाचा सोन्याचा पुतळा करविला व तो दारापाशी ठेवून म्हटले की दारवानाचे वा हमालाचे काम त्याने पृथ्वीराजाला दिले आहे. झाले काय की, प्रेमाखातर शौर्य दाखविण्यास तयार असलेल्या पृथ्वीराजाने तिथे येऊन राजकन्येला आपल्या घोड्यावर स्वतःपाशी बसवून घेऊन ते तेथून धूम निघाले. तिच्या पित्याला ती बातमी कळताच त्याने मोठ्या सैन्यानिशी त्याचा पाठलाग केला व परिणामी झालेल्या प्रचंड युद्धामध्ये दोन्ही सैन्यांचा खूपच संहार झाला. आणि (अशा प्रकारे राजपुतांच्या शक्तीची खची झाल्यामुळे) भारतातील मुसलमानांच्या साम्राज्याला सुरुवात झाली.

उत्तर भारतात जेव्हा मुसलमानी साम्राज्य प्रस्थापित होत होते तेव्हा चितोडची राणी सौदर्यांसाठी प्रसिद्धी पावली होती, अन् तिच्या सौंदर्याची बातमी सुलतानापर्यंत पोहोचली व त्याने एक पत्र लिहून तिला त्याच्या स्वतःच्या राणीवशात पाठवून देण्याची मागणी केली. परिणामी चितोडचा राणा व सुलतान यांच्यात भयंकर युद्ध झाले. मुसलमानांनी चितोडवर आक्रमण केले, अन् राजपुतांना जेव्हा आढळले की स्वतःला वाचविणे शक्य नाही तेव्हा ते तलवारी हाती घेऊन शत्रूवर तुटून पडले व मारता मारता धराशायी झाले, अन् स्त्रियांनी अग्नीत प्रवेश करून स्वतःला भस्मसात् करून घेतले. पुरुष सगळे युद्धात कामी आल्यानंतर जेत्यांनी शहरात प्रवेश केला, तेथे रस्त्यात भयंकर ज्वाला दिसत होत्या. खुद्द राणीच्या मागोमाग इतर स्त्रिया त्या देदीप्यमान अग्नीला प्रदक्षिणा घालीत होत्या. जवळ येऊन त्याने जेव्हा राणीला 'तू अग्नीत उडी घालू नकोस' असे सांगितले तेव्हा तिने 'राजपूत स्त्री तुमच्याशी कसे वागते ते पाहा' असे म्हणून अग्नीत उडी घातली. असे म्हणतात की मुसलमानांपासून आपले शील संरक्षण करण्यासाठी त्या दिवशी प्रायः ७५ हजार स्त्रियांनी अग्नीत स्वतःला जाळून घेतले. आजही जेव्हा आम्ही पत्र लिहितो तेव्हा लखोटा बंद केल्यानंतर त्यावर आम्ही ७४ १/२ असा आकडा लिहितो अन् त्याचा अर्थ असा की, जर कुणी ते पत्र उघडण्याचे चुकीचे धाडस केले तर ७४५०० स्त्रियांना मारण्याचे पाप त्याच्या माथी लागले.

मी आता तुम्हाला आणखी दुसऱ्या एका सुंदर राजपूत मुलीची गोष्ट सांगतो. आमच्या देशांत 'राखी' वा 'रक्षा' नावाची एक वैशिष्ट्यपूर्ण रूढी आहे. स्त्रिया पुरुषंना मनगटाभोवती बांधण्यासाठी रेशमी राख्या पाठवू शकतात व एखाद्या मुलीने जर एखाद्या पुरुषाला अशी राखी पाठविली तर तो तिचा भाऊ होऊन जातो. भारताचे सर्वाधिक देदीप्यमान साम्राज्य ज्याने नष्ट केले त्या शेवटच्या मोगल बादशहाच्या कारकीर्दीत, त्या बादशहाने देखील अशीच एका राजपूत प्रमुखाच्या कन्येच्या सौंदर्यांची कीर्ती ऐकली. तिला मोगलांच्या जनानखान्यात आणून ठेवण्याचे हुकूम सोडण्यात आले. मग बादशहाला एका दूताने तिच्यापाशी येऊन तिला त्याचे चित्र दाखविले. तिने तुच्छतेने ते पायाखाली तुडवून म्हटले - ''एक राजपूत मुलगी तुमच्या मोगल बादशहाला असे धुडकावून देते.'' परिणामी मोगल सैन्याने राजपुतान्यावर चढाई केली. निरुपाय होऊन त्या राजपूत कन्येने एक युक्ती केली, अन् सर्व राजपूत एकत्र आल्यावर सम्राटाच्या सैन्याला माघार घ्यावी लागली.

राजपुतान्यातील एका विचित्र म्हणीविषयी मी तुम्हाला सांगतो. भारतात व्यापाऱ्यांची एक जात असते. त्यांपैकी काही खूपच हुषार असतात, पण हिंदूंना वाटते की ते फार चलाख असतात. पण एक विचित्र गोष्ट अशी की त्या जातीतील स्त्रिया पुरुषाइतक्या हुषार नसतात. उलटपक्षी राजपुतान्यातील क्षत्रिय पुरुषांपाशी राजपुतान्यांच्या मानाने ५० टक्के हुषारीही नसते. म्हणून राजपुत कन्यांच्या बाबतीत अशी म्हण प्रचलित झाली

आहे की, ''हुषार आईचा बावळट पोरगा, बुद्धिमंद आईचा चलाख पोरगा'' ! वस्तुस्थिती अशी की राजपुतान्यातील एखादे राज्य जेव्हा केव्हा एखाद्या स्त्रीने चालविले तेव्हा तेव्हा ते खूप उत्तम तऱ्हेने चालले.

दुसऱ्या एका वर्गातील स्त्रियांकडे आता आपण वळू, सौम्य हिंदूंमधे वेळोवेळी लढवय्या स्त्रियाही जन्म घेतात. तुम्ही ऐकले असेल की १८५७ सालच्या बंडात एक स्त्री फौजेच्या विरुद्ध लढली व दोन वर्षे तिने त्यांना भक्कम तोंड दिले. आधुनिक फौजांचे तिने नेतृत्व केले, तोफांचा ताफा सांभाळला व नेहमी स्वतःच्या सैन्याच्या पुढे राहून युद्ध केले. ही राणी ब्राह्मण वंशातली होती. मला ठाऊक असलेल्या एका जणाचे तीन मुलगे त्या युद्धात कामी आले, त्यांच्याविषयी बोलताना तो आपला तोल सांभाळून बोलतो, परंतु तो ज्या वेळी ह्या स्त्रीविषयी बोलू लागतो तेव्हा तो उत्तेजित होऊन जातो. तो म्हणे की ती देवी होती, ती काही माणसातली नव्हती. ह्या वृद्ध अनुभवी गृहस्थाला वाटते की तिच्याहून चांगले सैन्याचे संचालन करताना त्याने कधी कुणाला पाहिले नाही. त्यापूर्वीच्या काळातील चांद सुल्तानाची गोष्ट भारतात प्रसिद्ध आहे. हिऱ्यांच्या खाणीचा प्रदेश अशा गोळकोंड्याची ती राणी होती. तिने कित्येक महिने स्वतःचे संरक्षण केले. सरतेशेवटी भिंतीला खिंडार पाडण्यात आले. सम्राटाची सेना ज्यावेळी त्या खिंडारातून आत शिरण्याचा प्रयत्न करू लागली त्या वेळी ती चिलखत घालून शस्त्रास्त्रांनी सज्ज होऊन तिथे उभी होती व तिने त्या फौजांना माघार घ्यायला लावली. आणखी नंतरच्या काळाविषयी ऐकून तुम्हा लोकांना कदाचित आश्चर्य वाटेल की, एका बलाढ्य इंग्रज सेनापतीला एका सोळा वर्षाच्या हिंदू मुलीला तोंड द्यावे लागले होते.

राजनीतिनिपुणता, प्रदेशांचा कारभार पाहणे, देशाचे राज्य चालविणे इतकेच नव्हे तर युद्ध करणे या सर्व बाबतीत स्त्रियांनी स्वतःला पुरुषांहून अधिक नाही तरी त्यांच्या बरोबरीचे सिद्ध केले आहे. भारताच्या बाबतीत तर मला यात मुळीच संशय नाही. जेव्हा कधी त्यांना संधी मिळाली तेव्हा तेव्हा त्यांनी सिद्ध करून दाखविले की त्यांच्याठायी पुरुषांएवढीच योग्यता वसत आहे व एका बाबतीत त्या वरचढही ठरतात - ती बाब अशी की त्यांचा पाय क्वचितच घसरतो, त्यांच्यात स्वभावतःच असलेल्या नैतिकतेला त्या चिकटून राहतात व म्हणूनच निदान भारतात तरी राज्यपाल व राज्यकर्त्या म्हणून त्या पुरुषांपेक्षा खूपच वरचढ ठरतात. श्रीयुत जॉन स्टुअर्ट मिल यांनी या वस्तुस्थितीचा उल्लेख केला आहे, अन् आजच्या काळातही भारतातील स्त्रिया मोठमोठ्या जहागिरींचे संचालन अत्यंत कुशलनेते करताना आढळतात. माझा जिथे जन्म झाला तिथे दोन स्त्रियांच्या मोठ्या जहागिरी असून त्या विद्या व कला यांना आश्रय देणाऱ्या होत्या व त्यांनी स्वतःच्याच बुद्धिमत्तेने या जहागिरी सांभाळल्या व कारभाराच्या प्रत्येक तपशीलाकडे जातीने लक्ष दिले.

मानव-चारित्र्याच्या सर्वसामान्य गुणांव्यतिरिक्त प्रत्येक राष्ट्रात चारित्र्याचा एकेका विशिष्ट प्रकारे विकास केला जात असतो, - धार्मिक बाबतीत, राजनीतीच्या क्षेत्रात, शारीरिक दृष्टीने, मानसिक सवयींमधे, पुरुषांमध्ये, स्त्रियांमधे - सर्वच बाबतीत हे असे घडत असते. एक देश चारित्र्याचे एक वैशिष्ट्य विकसित करतो, तर दुसरा देश दुसरे वैशिष्ट्यच विशेषतः जोपासतो. गेल्या थोड्या वर्षातच जगाने ही वस्तुस्थिती मानायला सुरुवात केली आहे. हिंदू स्त्रियांचे जे खास वैशिष्ट्य त्यांनी जोपासले आहे व जी त्यांच्या जीवनाची मध्यवर्ती कल्पना व आदर्श आहे ती म्हणजे 'मातृत्वा' ची होय. जेव्हा तुम्ही एखाद्या हिंदू घरात प्रवेश करता तेव्हा तुम्हाला इथल्याप्रमाणे पत्नी ही पतीशी समता असणारी अर्धांगी दिसून येणार नाही. पण जेव्हा तुम्हाला 'आई' दिसेल तेव्हा आढळेल की तीच त्या घराचा आधारस्तंभ आहे. पत्नीला आई होण्यासाठी वाट पाहावी लागेल व मग तीच सर्वकाही होऊन जाईल. जर कुणी संन्यासी झाला तर खुद्द त्याचा पिताही त्याला प्रथम वंदन करील कारण संन्यासी झाल्यामुळे पुत्र हा त्याच्याहून श्रेष्ठ झालेला असेल, परंतु

आईच्या बाबतीत मात्र संन्याशी असो की कुणीही असो तो तिला गुडघे टेकून वाकून प्रणाम करेल व पाण्याचे पात्र तिच्यापुढे ठेवून तिला पायाचा अंगठा त्यात बुडवायला विनंती करील व ते पाणी तीर्थ म्हणून प्राशन करील, हिंदू आईचा मुलगा हजारो वेळा आनंदाने तसे करतो ! वेदांनी नैतिक शिक्षण देताना सर्वप्रथम ''मातृदेवो भव'' सांगितले आहे - म्हणजे 'आईला देव मानणारा हो' व तसेच हिंदू मानतो. आम्ही जेव्हा भारतातील स्त्रियांविषयी बोलतो तेव्हा स्त्रीविषयक आमची कल्पना 'आई' अशीच असते. स्त्रीची सार्थकता ही की ती मानवजातीची 'आई' असते. हिंदूंची कल्पना ही अशी आहे. मी पाहिले आहे की, माझे सद्गुरू लहान मुलींना हाताने धरून खुर्चीवर बसवीत व त्यांची प्रत्यक्ष पूजा करीत - त्यांच्या चरणी फुले वाहत व साष्टांग दंडवत करीत - कारण की, त्या जगन्मातेची प्रतीके होत. आमच्या कुटूंबांमधे आई हीच परमेश्वर असते. कल्पना अशी की, या जगात जे एकमेव खरेखुरे प्रेम आपण पाहतो व जे निःस्वार्थ असे असते ते आईचेच असते - ती नेहमी कष्ट सोसते व नेहमी प्रेमच करते, - अन् देवाच्या प्रेमाचे ह्या मातृप्रेमाहून अधिक चांगले प्रतीक कोणते बरे असू शकते ! म्हणून हिंदूंच्या पक्षी देव हा आई असतो अन् आई ही देवाचे या पृथ्वीवरील रूप असते. 'ज्या मुलाला सर्वप्रथम त्याच्या आईने शिकविले असेल त्यालाच ईश्वराचे स्वरूप समजून घेता येते' असे म्हणतात. आमच्याकडील स्त्रियांच्या अशिक्षितपणाविषयीच्या अतिरंजित भाकडकथा मी ऐकल्या आहेत. पण वस्तुस्थिती अशी की माझ्या दहा वर्षे वयापर्यंत मला माझ्या आईनेच शिकविले. माझी आजी व पणजी ह्यादेखील जिवंत असलेल्या मी पाहिल्या आहेत, अन् मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो आमच्या वंशावळीत अशी एकही स्त्री नव्हती की जिला लिहिता वा वाचता येत नव्हते व जिला कागदपत्रावर अंगठ्याने सही करावी लागली असती. जर लिहिणे-वाचणे न शिकलेल्या स्त्रिया त्या घराण्यात असत्या तर माझा जन्मच होऊ शकला नसता. जातीच्या नियमांप्रमाणे लिहिणे-वाचणे शिकणे भागच होते.

म्हणून मध्ययुगात हिंदू स्त्रियांचे लिहिणे-वाचणे बंद करून टाकण्यात आले होते ही व असल्या गोष्टी म्हणजे भाकडकथा होत. सर विल्यम हंटर यांनी आपल्या 'इंग्रज लोकांच्या इतिहासा'त नमूद केले आहे की त्यांना सूर्यग्रहणाचा हिशेब करणाऱ्या भारतीय स्त्रिया आढळल्या होत्या ते तुम्ही वाचावे. आईवर फार प्रेम केल्याने ती स्वार्थी बनते व उलटपक्षी आईने मुलामुलींवर फार प्रेम केल्याने ती मुले-मुली स्वार्थी निपजतात असे मला सांगण्यात आले, पण माझा ह्यावर विश्वास नाही. माझ्या आईने माझ्यावर जे प्रेम केले त्यामुळेच मी आज जो काही आहे तो झालो व माझ्यावर तिचे जे ऋण आहे ते मी कधीच फेडू शकणार नाही.

हिंदू मातेची पूजा का करावी ? आमच्याकडील दार्शनिकांनी याचे कारण शोधण्याचा प्रयत्न केला व ते पुढील व्याख्येप्रत येऊन पोहोचले. आम्ही स्वतःला आर्य वंशाचे म्हणवितो. आर्य कोण ? ज्याचा जन्म धर्माद्वारे झाला तो. या देशातील लोकांना ही बाब कदाचित विचित्रच वाटेल, पण ही कल्पना अशी की माणसाचा जन्म धर्मामधून, प्रार्थनेमधून झालेला असावा. आमची धर्मशास्त्रे जर तुम्ही पाहिलीत तर तुम्हाला कित्येक अध्याय यासाठी खर्ची घातलेले दिसतील - बाळाच्या जन्मापूर्वीच्या आईच्या वागण्याचा व विचारांचा होणाऱ्या बाळावरील प्रभाव. मला ठाऊक आहे की माझ्या जन्मापूर्वी माझ्या आईने उपासतापास, प्रार्थना व शेकडो व्रते आचरिली होती. तसे मला पाच मिनिटेही सातत्याने करता येणार नाही, पण तिने दोन वर्षे तसले आचरण केले. माझ्या ठिकाणी जे काही धार्मिक संस्कार दिसून येतात ते सर्व त्याचमुळे होय असा माझा विश्वास आहे. मी कसा निपजावा याची जाणीव ठेवून माझ्या आईने मला जन्माला घातले. माझ्यात जे काही थोडे चांगले संस्कार आहेत ते मला माझ्या आईने दिले आहेत व तेही ठरवून व जाणीवपूर्वक तसे आचरून दिले आहेत.

''जे मूल भौतिकतेतून जन्माला येते ते अनार्य

होय व जे आध्यात्मिकतेतून जन्माला येते ते आर्य होय'' - अशी व्याख्याच करण्यात आली आहे. या सर्व खटाटोपासाठी आणि पवित्रस्वभावाची मुले जन्माला यावीत म्हणून तिला स्वतःला इतके शुद्ध पवित्र बनविले असते यासाठी हिंदू मातेविषयीची एवढी जाणीव हिंदू मुलांच्या ठायी वसावयाला हवी असते. इतर गोष्टी तर सर्व देशांमधे सारख्याच आहेत. आई ही किती निःस्वार्थ असते, पण म्हणून आमच्याइकडील कुटुंबांमधे आईलाच सर्वात जास्त त्रास सोसावा लागत असतो. तिने सर्वात शेवटी जेवायचे असते. मला तुमच्या देशात अनेक वेळा विचारण्यात आले आहे की, आमचेकडे पती हा पत्नीला बरोबर घेऊन का जेवायला बसत नाही - विचारणाऱ्यांची कल्पना अशी की आमचेकडे पती हे बहुतेक पत्नीला इतकी निम्न श्रेणीचे मानतात की तिला जेवताना बरोबर घेत नाहीत ! भलताच अर्थ काढला हो तुम्ही-असले काहीच नाही. डुकराचा केस आमच्याकडे अगदी अशुद्ध मानतात म्हणून हिंदू लोक तसल्या केसांच्या ब्रशने कधीच दात घासणार नाहीत - म्हणून ते वनस्पतींचे तंतू वापरतात. एखाद्या प्रवाशाने तशा प्रकारे कुणाला दात घासताना पाहिले तो त्याने आपल्या लिखाणात नमूद केले की, हिंदू माणूस सकाळी लवकर उठून एखादे रोपटे चावून गिळून टाकतो !

तसेच त्यांनी पाहिले की पति-पत्नी एकत्र बसून जेवत नाहीत व लगेच स्वतःचे भलतेच स्पष्टीकरण देऊन टाकले. या जगात नीट पडताळून पाहणारे फारच कमी अन् न जाणता स्पष्टीकरण देणारेच फार आढळतात. - जणू या असल्या स्पष्टीकरणांवाचून जगाची गतीच खुंटून जाणार आहे ! हे सगळे पाहूनच तर मला असे वाटू लागते की छापण्याची कला सुरू झाल्याने काही सगळ्या चांगल्याच गोष्टी पुढे आल्यात असे दिसत नाही ! खरी गोष्ट अशी की ज्याप्रमाणे तुमच्याही स्त्रियांनी बऱ्याचशा गोष्टी पुरुषांच्या समोर करायच्या नसतात, त्याचप्रमाणे आमच्या देशात वस्तुस्थिती अशी आहे की, पुरुषांसमोर तोंडात काही कोंबून चावणे अगदीच असभ्यपणाचे मानले जाते. एखादी गृहिणी जर खात असेल तर ती आपल्या भावंडांसमोर खाऊ शकते, परंतु जर का तिचा पती तेथे प्रवेश करील तर ती ताबडतोब खायचे थांबवील व [illegible] पतीदेखील ते पाहून चटकन बाहेर निघून जाईल. आमच्याकडे जेवणाचे टेबल म्हणून काही प्रकार नाही. जेव्हा कुणाला भूक लागते तेव्हा तो जेवणघरात येऊन जेवून जातो. हिंदू पती हा पत्नीला जेवणासाठी टेबलाव[illegible] स्वतःपाशी बसू देत नाही असल्या भाकडकथांवर विश्वास ठेवू नका - तिथे जेवणाची टेबलेच नसतात मुळी ! अ[illegible] शिजून तयार झाले की त्याचा पहिला वाटा पाहुणे [illegible] भिक्षेकरी यांच्यासाठी असतो, दुसरा गायी-गुरांसाठी, तिसरा लहान मुलांचा, चवथा यजमानांचा व शेवटचा तो 'आई' चा असतो.

कितीतरी वेळा मी माझ्या आईला सकाळचे जेवण दुपारी दोन वाजता घेतांना पाहिले आहे - आम्ही जेवलो दहा वाजता तर ती जेवली दोन वाजता, कारण तिला कितीतरी काम उरकायची होती, कुणी एखादा येऊन दार ठोठावतो व म्हणतो की मी 'अतिथी' आहे. माझ्या आईसाठी जे उरले होते ते सोडता अशा वेळी कदाचित आणखी उरले नसेल, मग ती आपलाच वाटा त्याला आनंदाने देऊन टाकी व स्वतः कसेही भागवून घेई. असे होते तिचे जीवन अन् त्यातच तिला आनंद वाटे ! आणि म्हणूनच तर आम्ही मातेला देवासमान पूजतो. या देशातील स्त्रियांनो, इतरांनी तुमचे निवळ लाड करोत वा तुमची काळजी घ्यावी ह्यात आनंद मानण्यापेक्षा अशा प्रकारे पूजले जाणे तुम्हाला जास्त आवडो अशी माझी इच्छा आहे ! 'आम्हीही मानवजातीचे असल्यामुळे आमची काळजी घ्या' - हे काही बिचाऱ्या हिंदूला कळत नाही. पण स्त्रिया जर म्हणतील की ''आम्ही माता आहोत, म्हणून आम्ही तुम्हाला आज्ञा करीत आहोत'' तर तो लगेच मान तुकवील. तर मग हिंदूंनी स्त्रीत्वाची ही बाजू जोपासून वाढविली आहे.

आता पुनः सिद्धांताकडे वळून पाहू या. सुमारे शंभर वर्षांपूर्वी पाश्चात्य देशांतील लोकांच्या हे लक्षात

आले की इतर धर्मांशी जुळवून घेतले पाहिजे. पण आता आपल्याला ठाऊक झाले आहे की इतर धर्मांशी निवळ जुळवून घेणे पुरेसे नाही तर आपण त्यांना सत्य म्हणून स्वीकारले पाहिजे. म्हणजे काय तर प्रश्न वगळण्याचा वा बाद देण्याचा नसून जोडण्याचा वा स्वीकारण्याचा आहे. हे सर्व पैलू एकत्र जोडल्याने परिणामी आपल्याला सत्य हाती येईल. या सर्व धर्मांपैकी प्रत्येकच सत्याची एकेक बाजू दाखवितो व सर्वांची बेरीज केल्यानेच संपूर्णता प्राप्त होईल. त्याचप्रमाणे सर्वच शास्त्रांमधे सर्व पैलूंना एकत्र केल्यानेच संपूर्णता लाभेल. तर मग हिंदूंनी ही बाजू विकसित केली, ती पुरेशी ठरेल काय ? आज जी हिंदू स्त्री माता झालेली आहे तिने सुयोग्य पत्नी सुद्धा व्हावे, परंतु मातृत्वाचा आदर्श नष्ट होता कामा नये. असे केल्यानेच सर्वोत्कृष्ट फळ लाभेल.

अशाप्रकारे या विश्वासंबंधी अधिक चांगली दृष्टी तुम्हाला लाभेल - नाहीतर जगभर हिंडायचे, घाईघाईने एखाद्या देशात शिरायेच व त्यांची निंदा करुन म्हणायचे '' सगळे दुष्ट हीन दर्जाचे लोक आहेत हे - कल्पान्तापर्यंत नरकात शिजण्याचीच यांची लायकी आहे '' इ. ! यापेक्षा अशी दृष्टी बाळगली पाहिजे की परमेश्वरी इच्छेनुसार प्रत्येक राष्ट्र मानवी स्वभावाच्या एकेका पैलूचा विकास घडवून आणीत आहे. अशी दृष्टी बाळगल्यास दिसेल की, कोणतेच राष्ट्र अयशस्वी नाही. आतापर्यंत त्यांनी चांगलीच उन्नती केली आहे - आता त्यांनी आणखी अधिक प्रगती करावी. हिंदूंना 'पाखंडी, नालायक, गुलाम' वगैरे म्हणण्याऐवजी भारतात जाऊन म्हणा की, ''आतापर्यंतचे तुमचे काम खरोखरच वाखाणण्याजोगे झाले आहे, परंतु तेवढे पुरेसे नाही, तुम्हाला आणखी खूपच उन्नती करुन घ्यावी लागणार आहे. स्त्रीचे मातृत्व तुम्ही विकसित केले म्हणून परमेश्वर तुमचे भले करो, आता तुम्ही स्त्री ही पुरुषाची पत्नी होय ही बाजूही विकसित करावी.'' अन् त्याचप्रमाणे मला असेही वाटते (व मी ते अगदी सद्हेतूने सांगतो) की, तुम्ही तुमच्या राष्ट्रातील स्त्रीस्वभावामधे हिंदू स्वीवातील मातृत्वाचीही थोडी अधिक भर घालावी ! मी जेव्हा शाळेत गेलो तेव्हा पहिल्याच दिवशी मला जी पहिलीच कविता शिकविण्यात आली ती अशी की, ''मातृवत् परदारेषु परद्रव्येषु लोष्टवत् । आत्मवत् सर्वभूतेषु य: पश्यति स पण्डित: ॥'' अर्थात '' जो सर्व स्त्रियांकडे मातृदृष्टीने पाहतो, जो कुण्याच्याही धनसंपत्तीला मातीच्या ढेकळाप्रमाणे लेखतो, जो प्राणिमात्राला स्वत:च्या आत्म्याशी अभिन्न जाणतो तोच खरा पंडित होय''

दुसरा आदर्श म्हणजे पुरुषाच्या बरोबरीने कार्य करणारी स्त्री होय. हिंदूमधे हे आदर्श नव्हते अशातली गोष्ट नाही, परंतु त्यांनी ते विकसित केले नाहीत. संस्कृत ही एकमेव अशी भाषा आहे की जीत पति - पत्नींचा एकत्र उल्लेख करण्यासाठी चार शब्द आहेत. केवळ आमच्याइकडील लग्नातच अशी प्रतिज्ञा घेण्यात येते की, ''आतापर्यंत जे माझे हृदय होते ते आता तुझे असो.'' अन् पतीही तसलीच प्रतिज्ञा घेतो. आमच्याच देशात अशी प्रथा आढळते की, पतीने पत्नीच्या हाताला स्पर्श करीत ध्रुव ताऱ्याकडे पाहून म्हणावे लागते की, 'ज्याप्रमाणे आकाशात ध्रुव तारा हा अचल आहे त्याचप्रमाणे माझी तुझ्यावरील प्रीती अढळ असो.'' अन् मग पत्नीनेही तसेच म्हणायचे असते. पत्नीचे चारित्र्य भ्रष्ट झाले तरी नवऱ्यला तिची तजवीज करावीच लागते. आमच्या देशात सर्वत्र आमच्या शास्त्रग्रंथामधे या कल्पनांची बीजे आढळतात, परंतु आम्ही चारित्र्याचा हा पैलू विकसीत करु शकलो नाही.

आपल्याला जर एखादी गोष्ट तोलून पाहायची असेल तर आपण भावुकतेच्या पलीकडे गेले पाहिजे. तसेच निवळ भावुकतेने जग चालत नूसन भावुकतेच्या पाठीशी आणखीही कित्येक गोष्टी असतात हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आर्थिक कारणे, सभोवतालची परिस्थिती व इतर बाबी या राष्ट्राच्या विकासास कारणीभूत ठरत असतात. (स्त्रीचा पत्नी म्हणून विकास कोणकोणत्या कारणांनी होतो याची चर्चा प्रस्तुत प्रसंगी मला अभिप्रेत नाही.) म्हणून या जगात प्रत्ये देश हा निरनिराळ्या परिस्थितीत असून एकेक प्रकारचा आदर्श विकसित करताना दिसतो व आता ती वेळ आली आहे की हे सर्व आदर्श एकत्रित केले जातील व जी क्रूर देशभक्ती इतर सर्वांना लुबाडून स्वत:ची तुंबडी

**Principles of Right Living**

# Making Life out of a Life

SWAMI RANGANATHANANDA

When you begin to live and live for a great cause or a great purpose, everything will not be smooth. So many Challenges will come. Modern India is passing from an age of easy living, living in the narrowest circle possible to a life of expansion, a life of adventure, a life of heroic endeavour. That is the meaning of freedom with which we are today facing a tremendous future. And that future will be written by lives lived in a spirit of heroism in every department of life. It is this spirit that we lacked for centuries together.

The first of such heroism we saw in the last century and the first part of this century. Our great national struggle for freedom found many of our young people sacrificing their lives, their comfort, their everything, with a view to getting freedom for their country.

The way to greatness is not easy, it is not cosy, you cannot saunter into the great life; it needs alterness, for it is difficult to tread and hard to cross, like walking on the edge of a razor, as referred to in the Katha Upanishad. Under the inspiration of this heroic message, our nation worked hard, created a great culture, and-contributed much to world civilization. Then came a decadent period. Weakness of mind and body set in creative fires all but died out. People, big and small, referred the line of least resistace in every department of life. From that darkness and despair, the nation was awakened and rescued by our great modern leaders, and the nation achieved political freedom, the necessary prelude to every other type of freedom. And for making this political freedom. flower into every type of freedom we need to continue the nurturing of the same heroic spirit. We need men and women endowed with clear thinking, courage, dedication, and intense practical efficiency.

The beautiful sentence that Vivekananda had utterd towards the end of the last century applies to our India of today: All expansion is life, all contraction is death. What we call life in a contracted state is really death: the expanding state is really life. This truth has to be understood in a big way by our people. It is easy to live just a cozy life, life put in a glass case, as it were, to protect it from all harm, with all daring and risk taken away from life. That was the music of life, meant to lull us to sleep, that we were taught by our parents and teachers for centuries together. But today, we are blessed to listen to another music-the music with the power to awaken and energize.

We heard this powerful music first from Vivekananda-the spirit of heroic endeavour, the spirit conveyed by him through a famous verse of the 'Katha Upanisad' "Arise, Awake, and stop not till the goal is reached !" Don't contract yourself into sleep; we have slept for ages, we have wept for ages: no more weeping or sleeping now, but wake up and then march on, march on life is a battle between life and death, between expansion and contraction. You have to face the terrible, face the brute, even embrace death.

Today we are experiencing the stirrings of a new way of life, expansion, struggle in all departments of life. Wherever you find initiative wherever you find people striking out

into new lines of development in the fields of industries, economics, politics, society, religion, and science, you are witnessing the dynamics of life, the spirit of expansion replacing that old process of contraction. It was this spirit that Swami Vivekananda injected into our stagnant society, immediately after which came tremendous political awakening and the onset of the modern revolution.

When we speak of the greatness of any nation. we alway find that it arose out of this daring to face death - sometimes physical but always death to the self-centred ego. How did England become great ? By young English people daring to go round the world, to sail on the high seas, to scale the mountains, to wade through the forests and swamps, prepared to face the privations and even death, just for self-actualization and for the glory of England. That is the spirit you find depicted in our own Mahabharata, as well as in Bhagwan Sri Krishna's teachings. We had a blaze of that heroic spirit and endeavour, that facing death constanctly without fear, in a leader like Guru Gobind Singh. His life is a saga of great heroism, constantly facing death for the great cause of human freedom and dignity and unity, of defending man against oppression, and sacrificing wife, children and himself in the struggle. In such examples, we can see life being made out of a life. This new understanding of making life out of a life must come to us today. Life has to face death to become richer because, from the ancient Vedic times up to our time this truth has been given us by our great teachers that the Supreme Reality has two aspects, one is life, the others death. That is what the Rig-veda said: Yasya chaya amritam yasya mrtyuh.

When we understand this truth that life and death are two aspects of the same real we learn to welcome death, but not in a path logical mood but heroically. That is a gre lesson taught by Vivekananda to our nation

In Guru Gobind Singh we see this fu expressed. Today, we find in hundreds of ou young pepole fear of privation and death and shallow attachment to life. What is in such humdrum day-to-day life? What is talked of a adjustment to life is but a combination of shal low life and a shallow adjustment. Is worhwhile. is it fit for a human being? Moder psychiatry also refers to the emptiness and u reality of such a life. Parents constantly exhor their-children to adjust to life. What does mean? it means: Adjust a false self to a fals world!- Real understanding of life is not ther The so-called normal adjusted life is truly th abnormal and false life.

No heroic achieviments can come to nation if it hugs this perishable body all the time It is born, it grows, it decays, it dies. But man identity is something deeper and greater, an more profound, wherefrom come all fearless ness, all courage, all daring, if our soldie posted in the high Himalayan ranges to defen our country are to face their challenge effetively, they need this philosophy.

I wish to mention that the concep of life as a battle-field, where you are constantl face to face with death, where you struggle an overcome the challenges, or are overpowere by the challenges and court death—that is th philosophy that makes a nation great. If I wan to protect myself all the time, how can I be come great? I must be able to dare to face th world of challenges.

The whole of our Bhagavad Gita is a

great saga of such a robust philosophy. Life is truly life, not when measured in terms of years, but in terms of quality and richness. This lesson we need to learn today.

In the Mahabharata, we get a powerful verse. Whenever and wherever I have quoted that verse, it always had a tremendous impact on the mind of listeners. It is a short Sanskrit line containing a profound message of the beauty of an intense life. There was a king by name Sanjaya in the Northern Sindh region: his mother bore the name Vidula. She was a heroic queen mother. How she inspired her son to be brave is what the story conveys. This young king went out for battle. got defeated became weak minded and depressed. The mother tried to rouse his royal spirit in several ways: it did not happen. Then finally she uttered a sentence conveying a tremendous power that helped to rouse the courage-of the prince. That line conveys so much inspiration in so few words. That is the uniqueness of great literature the capacity to convey great meaning to humanity in a few words. And what that great queen mother conveyed to her princely son ages ago, our Mother India conveys to every child in this country today :

Muhurtam jvalitam shreyo,
na tu dhumayitam chiram.

It is better to flame for one instant, than to smoke away for ages !.

A short intense life, burnt out in a great struggle and achivement of the humanstic impulse, is preferable to a humdrum life of long duration. that is the message to us from our own past. In this modern period. we had a Vivekanad. During his brief 39 years. he made a tremendous impact on both East and West: even in that short span of life, his actual public work was only during the last nine years.

Live such a life that when you die, you will leave a permanent wholesome impact small or big on the world.

There is too much concentration on the very limited circle of life constituted of profit and pleasure, the wider horizons of life have receded: this makes life humdrum.

It is ecstasy and zest that enable one to say: Yes, I am fine. This is the answer expected of all of us in this most revolutionary and creative period of our long history. That can come only when we relate ourselves to the onward current of our history and participate in the shaping of it, instead of cutting ourselves away from it. to become stagnant pools of frustrations and complaints.

Every youth, imprinted with the heroic touch of soul, must say to himself or herself that this chaotic state of India is the best period for me to live. I can put my ideas into it. I can create something more beautiful and perfect out of it : I do not want to live a life of stagnant isolation in the resurgent context of contemporary India. The nation is marching and I, as a citizen in it, shall give it a gentle push and direction. That should be the positive attitude of all young minds towards the problems of their country.

• • • • • •

*The truths of the Upanishads are before you. Take them up, live up to them, and the salvation of India will be at hand.*

*- Swami Vivekananda*
Thoughts of Power

# आध्यात्मिक साधनेत आड येणारे धोके

स्वामी यतीधरानंद

अनु. स्वामी योगात्मानंद

(१)

" जीवनाचा खेळ सर्वत्रच चाललेला आपल्याला दिसून येतो. मनुष्यांप्रमाणेच वनस्पती अन् पशुपक्षीही जगतात; पण जो उच्चतर जीवन जगतो, जो एखाद्या उच्च ध्येयाच्या प्राप्तीसाठी जगतो तोच केवळ खरोखर जगत असतो. "

श्री शंकराचार्य म्हणतात - "खाणे-पिणे, झोपणे, प्रजोत्पादन करणे या बाबतीन मनुष्य व पशू समानच होत, या बाबतीन दोघेही इन्द्रियवृतींचे अनुसरण मात्र करतात. एकमात्र धर्मच - उच्च जीवनाचा हा मार्गच मनुष्यांचा इतर प्राण्यांहुन वेगळे काढतो. धर्म वगळल्यास मनुष्य पशूंच्या पातळीवर येतो किंवा त्याहुनी निपटारा बनतो."

(२)

आपले लक्ष बाह्य एकान्तवासाकडे असणे तितक निकडीचे नाही; त्याहुन निकडीचे आहे - आन्तरिक एकान्ताकडे, म्हणजेच आपण कुठेही असलो तरी मनात एकान्त निर्माण करु शकण्याकडे. लक्ष असणे. आन्तरिक एकान्त आध्यात्मिक जीवनासाठी अत्यंत महत्वाचा आहे. मनाला अधिकाधिक अंतर्मुख करा, त्याला खऱ्या विविक्तते चा आस्वाद घेऊ द्या आणि सर्वदा तिचा अभ्यास करा.

विचार, वाणी व वृत्ती यांना खूप शुद्ध ठेवून त्याद्वारे मनाला नीट वळण लावा आणि मग यथार्थ आध्यिात्मिक जीवन जगण्यास प्रारंभ करा. एकान्तवास ही काही एखादी नकारात्मक चीज नाही, आणि त्याग, वैराग्य या गोष्टीही नकारात्मक नव्हत. यात आपण आणखी कुणाबरोबर नव्हे तर परमेश्वराबरोबर वास करण्याची इच्छा धरतो. आपल्याला इतर वस्तुंचा संग नको असतो तर सदासर्वदा परमेश्वराचा संग हवा असतो. स्वत:ला परमेश्वरात विलीन करुन टाका, म्हणजे मग तुम्ही कुठेही असला तरी तेथे केवळ एकाचेच अस्तित्व असेल.

नारद म्हणतात - यल्लब्ध्वा पुमान सिध्दो भवति, अमृतो भवति, तृप्तो भवति - परमेश्वराचा लाभ झाल्याने मनुष्य पुर्ण होतो, अमृतस्वरुप होतो, तृप्त होतो. (नारद भक्तिसूत्र - ४)

- स:तरति स:तरति, स लोकांस्तारयति - तो हा संसार सागर तरुन जातो व इतरांनाही तारुन नेतो. (नारद भक्तिसूत्र - ५०)

पुष्कळदा या-त्या प्रकारे आपण मन एकाग्र करतो खरे पण त्या एकाग्र मनाला कसे हाताळवयाचे, कसे वायूवरायचे हे आपल्याला ठाऊक नसते. हे असे मन एकाग्र झाल्यामुळे आता इंद्रिय भोगांमागे नि सर्वप्रकारच्या सांसारिक प्रलोभनांमागे अधिकच बेफामपणे धावू लागेल. म्हणून जर ते योग्य प्रकारे कसे हाताळावे याचे ज्ञान नसेल तर हे एकाग्र मन फारच मोठा धोका ठरते. म्हणून, जर उदात्तता व पवित्रता यांची सोबत नसेल तर एकाग्रताही नसणे अधिक लाभदायी. याचसाठी हा पवित्र्याचा, अनासक्तीचा व संपूर्ण ब्रम्हचर्याचा पैलु इतक्या अधिक जोराने बिंबविणे आवश्यक आहे. मी ही गोष्ट वारंवार सांगत आहे याचे कारण हेच की या बाबतीत कोणताही गैरसमज राहू नये. काहीही किंतू उरु नये. आपल्या साऱ्या इच्छांचे नि भावभावनांच उदात्तीकरण केल्याचेरीज आपण अध्यात्ममार्गवर पुढे जाणे शक्य नाही आणि म्हणून जर आपण या नैतिक आचार संहितेचे कठोरपणे पालन करत नसाल तर एकाग्रतेचा व ध्यानाचा नुसता प्रयत्नही करण्यास धजु नये. एकाग्र झालेले पण शुद्ध नसेलेल मन वास्तविक एक सैतान बनते. या साऱ्या नितिनियमांचे पालन करणे अत्यावश्यक आहे, आणि त्याखेरीज कोणत्याही प्रकारची आध्यात्मिक साधना अतिशय धोकादायक व अपायकारक ठरते; तिचा परिणाम डोके बिघडण्यात नि मज्जासंस्था मोडकळीस येण्यात येतो. हे नियम कठोरपणे

पालन न करता जर तुम्ही आध्यात्मिक साधनेसाठी पूढे सरसावाल तर तुम्हाला वेड लागेल, एवढेच. या धोक्याला कधीही कमी लेखू नका. इच्छाशक्तीच्या सहाय्याने काही विशिष्ट आसक्ती, काही विशिष्ट संबंध जर कायमचे तोडून टाकले नाहीत तर मग कोणत्याही आध्यात्मिक साधनेपासून काही लाभ होणे नाही.

(३)

या बाबतीत एक सामान्य नियम असा : जर तुम्हाला कोठलीही एखादी लौकिक वासना असेल तर एकदा आध्यिात्मिक जीवनास प्रारंभ केल्यानंतर, ध्यानधरणेस सुरुवात केल्यावर ती वासना पूर्ण होण्यासाठी कधीही प्रार्थना करु नका. प्रथम ती वासना टाकून द्यायला हवी अथवा पूर्ण करायला हवी. त्यानंतर साधनेस प्रारंभ करणे चालेल. शक्तिशाली, एकाग्र असे मन असणे पण त्याचा उचित उपयोग करता न येणे हे फारच त्रासदायक होवून बसत असते. राक्षसाप्रमाणे बल व इच्छाशक्ती असणे ठीक आहे, पण त्यांचा राक्षस करताता तसा उपयोग करणे वाईट आहे. एकाग्र मनाला कसे उपयोगात आणावे हे आपण जाणून घेणे आवश्यक आहे. एक किमान शारीरिक नि मानसिक शुद्धता कमावल्याखेरीज ध्यान धारणेचा प्रयत्नही करायला जाणे मला मान्य नाही. ते म्हणजे विस्तवाशी खेळणे आहे. लोक कित्यकदा या सांगण्याकडे दुर्लक्ष करतात व मग दुःखाला प्राप्त होतात.

(४)

लैंगिकदृष्ष्या संपूर्णपणे संयत जीवन जगल्याने आपण प्रचंड शक्तिसंचय करीत असतो आणि जर आपण या शक्तीला शारीरिक पातळीवर प्रकट होण्यापासून रोखले तर ती इतर मार्गांनी प्रकट होते. व त्यामुळे आपल्याला मानसिक शक्ती, सिद्धी वगैरे प्राप्त होतात. तुमचे भांडवल कधीच खर्च करु नका. ते सावकाश वाढवा, मात्र त्यावर मिळणाऱ्या व्याजाहून अधिक खर्च करु नका. तुम्ही आपल्या शक्तीचा निधी वाढवायलाच हवा व शक्तीचा अपव्यय शक्य तितका कमी व्हावा या साठी अनावश्यक घर्षण टाळायला हवे. दुसऱ्या बाजूला, संबंधित दुसऱ्या व्यक्तीत कदाचित घर्षण होतही असेल; पण त्याच्याशी तुमचा संबंध नाही. कठोर ब्रम्हचर्य पालनाखेरीज तुम्ही काहीच करु शकणार नाही.

(५)

कविश्रेष्ठ रवीन्द्रानाथांचे पुढील आशयाचे सुरेख गीत आहे :

'हे प्रभू, तुम्हीच कृपा करुन दिलेल्या तुमच्या उपासनादिकांचा भार वाहण्याचे सामर्थ्य मला द्या. तुमच्या सेवेत राहिल्याने आपरिहार्यपणेच प्राप्त होणाऱ्या दुःख निवेदना सहन करण्यासाठी मला भक्ती द्या, मग वाटल्यास माझे हृदय या महान दुःखाने व्यापून टाका.

'तुम्हीच स्वतःच्या हाताने दिलेला हा दुःखरूपी उपहार टाकून देण्याची मला इच्छा देखील नाही. हे दुःख माझा मुकुटमणीही ठरेल - पण जर तुम्ही त्याच बरोबर मला तुमच्या ठायी भक्ती दिली तरच. जर तुम्ही मला तुमचे विस्मरण घडू देणार नसाल तर मग माझ्यावर हवा तेवढा कामाचा भार टाका.

'जर तुमची तशीच इच्छा असेल तर मला हव्या तितक्या बंधनांनी जखडून टाका, पण माझे हृदय तुमच्याप्रती उन्मुख ठेवा. उन् काहीही झाले तरी एवढे मात्र कराच करा - मला तुमचे विस्मरण घडू देऊ नका.'

(६)

हा सारा त्रास नि दुःख हे आपले शिक्षण आहे. स्वतःच्या इच्छेला लगाम घातला पाहिजे, तिला संयमित केले पाहिजे, तिची चिता पेटवून दिली पाहिजे. जर तुम्हाला हे करायचे असेल तरच या आध्यात्मिक जीवनाच्या वाटेला जा. पण जर तसे नसेल, जर तुमच्यात किंचितही सौदेबाजीची भावना असेल, जर तुम्हाला सर्वस्वाचा त्याग करण्याची इच्छा नसेल, तर मग त्याच्या जवळपासही फिरकू नका; स्वताःला हवे त्याप्रमाणे वागा निस्वच्छंदपणे जगा. आध्यात्मिक जीवनात अर्ध्यावर थांबण्याची सोय नाही. काही काळ तुम्हाला ऐरण व घण यांच्यामध्ये व्यतीत करावा लागेल. आणि जेव्हा लोखंड वाकडेतिकडे झालेले असते तेव्हा तर त्याला अधिकच

ठोकपीट करावी लागते, तेव्हा कुठे मग ते योग्य आकार घेऊ लागते. या बाबतीत सामान्य नियम असा की कधीही भ्याड बनू नका. आपल्याला त्रास सहन करावा लागल्यास लागो, आत्यंतिक दुःख भोगावे लागो, अवर्णनीय वेदना प्राप्त होवो, पण आपण या साऱ्याला सामोरे होऊन अविचल राहु या, आपण सर्व बाबतीत फक्त साक्षी बनण्यास शिकू या.

(७)

रवीन्द्रनाथांची आणखी एक भावपूर्ण प्रार्थना आहे -

'जरी कधी माझ्या हृदयाचे कवाड बंद असले तरी तू ते फोडून आत शीर, कधी परत जाऊ नकोस !

'जर कोण्या दिवशी या वीणेवर तुझे प्रिय नाम झंकृत झाले नाही, तरीही दया करुन थांबून रहा, पण हे प्रभू, परत फिरु नकोस.

'जरी कोण्या दिवशी तुझ्या हाकेने मला जाग आली नाही तरी वज्रप्रहाराच्या तीव्र वेदना देऊन मला उठव, पण हे प्रभू, परत फिरु नकोस. जरी कोण्या दिवशी मी अट्टाहासाने तुझ्या आसनावर आणखी कुणाला तरी बसविले, तरी पण, हे माझ्या चिरकालीन सम्राटा, हे प्रभू, परत फिरु नकोस.'

(८)

भक्तांनी नेहमीच एकमेकांशी सत्-चर्चा करावी आदानप्रदान करावे. हे खूप खूप आवश्यक आहे. पण त्यासाठी आपण खरोखरच एकमेकांना मदत करण्यास उत्सुक असणे आवश्यक आहे. आपण खरोखर, यथार्थपणे सहानुभूतीसंपन्न असले पाहिजे. कोणतीही दयामया न ठेवता पण त्याचबरोबर अपायकारक आत्मनिंदा न करता आत्मपरीक्षण करा. नुसते साक्षीरुपाने बाजूस उभे राहून साक्षीदाराप्रमाणे घटनांकडे पहा, कर्त्याप्रमाणे नव्हे, कर्तेपणाची भावना मुळीसुद्धा उरु देऊ नका.

(९)

बहुधा असे आढळते की ज्यांना आपल्या सद्वृत्ती व शुभप्रेरणा यांच्यावर ताबा ठेवता येत नाही त्यांना आपल्या दुर्वृत्तींवर व अशुभप्रेरणांवरही ताबा ठेवता येत नाही. या दोन्हीवर संपूर्ण ताबा मिळविण्याचा प्रयत्न करायला हवा. अगदी उदात्त भावना व शुभ मनोवृत्तींवरही संपूर्ण ताबा हवा, त्यांचेही कार्य सुनिश्चितपणे, जाणीवपूर्वकच व्हवयास हवे.

जर आपल्या व्यक्तित्वास खोलवर आपण एखादी शुभ मनोवृत्ती शिरवू शकलो तर तिचा रंग त्याच्यावर चढेल. पण जर या मनोवृत्तीला वाजवीपेक्षा लवकर प्रकट करण्याची घाई केली तर सारे क्षणार्धात उडून जाईल. इंजिनाला धावण्याची शक्ती वाफेच्या प्रचंड दाबामुळे प्राप्त होत असते. पण जर वाफ आधिच बाहेर सोडून दिली तर मग इंजिनाला ढकलण्यासाठी कोणतीच शक्ती न उरल्यामुळे ते पुढे जाण्यास नकार देईल. वाफेला दाबून ठेवायला हवे, एरवी तिच्यात कोणतीच शक्ती शिल्लक उरणार नाही.

आणि, जर जीवनात परिवर्तन घडून येणार नसेल तर या साऱ्या शिकवणूकींना आणि सूचनांना काही म्हणता काही किंमत नाही, आपण त्याऐवजी दुसऱ्या उद्योगालाच लागणे त्याहून फार फार बरे. पण पुष्कळदा लोक नुसते या गोष्टी ऐकत राहतात आणि त्याद्वारे काही सुंदर भावना तात्पुरत्या उत्पन्न करतात. हा सुद्धा एका प्रकारचा विषयोपभोगच आहे. ही काही आध्यात्मिकता नव्हे.

जर मनात अवचितपणे उठणाऱ्या उदात्त भावनांना काबूत ठेवणे तुम्हाला शक्य होत नसेल तर वाईट, अवाछनीय भाव- भावनांनाही, त्या मनात उठण्याचाच उशीर, तुम्ही बळी पडाल. खूप मेहनतीने चिकाटीने प्रथम काही भांडवल जमा करा. मग त्यावरील व्याज खर्च करा. पण प्रथमतः म्हणजे तुमच्याजवळ मोठ्या रकमेचा साठा जमला पाहिजे; त्यापुर्वीच जर तुम्ही भांडवल खर्च करु जाल तर तुमचे शेवटी दिवाळे निघणार, दुसरे काय?

तीव्र, उत्कट भावभावना बाळगा पण त्यांचे स्वामी रहा. आणि जर कुठल्या एखाद्या भावनेमुळे तुम्हाला मानसिक दौर्बल्य जाणवू लागले तर पक्की खूणगाठ बांधून असा की त्या भावनेत वा त्या भावनेच्या विषयात काहीतरी

गंभीर दोष आहे. स्वामी ब्रह्मानंदांच्या भावना अतोनात उत्कट असत पण जितकी त्यांची उत्कटता अधिक, तितकेच ते त्याना अधिक काबूत ठेवीत, त्यांचे मन अधिकच शांत होई.

(१०)

चिकाटीची आवश्यकता आहे, समतोल मनाची आवश्यकता आहे - अगदी नेहमीसाठीच प्रचंड उत्कटतेच्या जोडीला खूप शांतपणा व स्थैर्य आवश्यक आहे. प्रचंड इच्छाशक्ती व निर्धार यांना जोड असली पाहिजे, प्रगाढ शांततेची व आत्मसंयमाची. उतावळ्या नि निष्काळजी लोकांना आध्यात्मिक साधनेसाठी प्रयत्न करणे शक्य नाही. त्यासाठी प्रचंड चिकाटीने उद्यम करणे आवश्यक आहे. 'त्या परमेश्वराला, फक्त त्याला एकालाच मी चिकटून राहीन, मग त्याने माझे तुकडे तुकडे करुन टाकले तरी हरकत नाही. काय होईल याची मला पर्वा नाही, पण मी त्याला सोडणार नाही, - हाच मनोभाव असणे योग्य होय. " हे प्रभो, मला धनदौलत नको, जनसंगती नको, सुंदर रमणीही नकोत नि काव्यापहारही नकोत; पण जगदीशा, जन्मोजन्मी तुझ्या ठिकाणी माझी अहेतुक भक्ती राहो."

'त्याने मला आलिंगन देऊन स्वत:चा दास बनविले काय किंवा चिरडून टाकले काय किंवा माझी उपेक्षा करुन इतरांच्या संगतीत राहणे पसंत केले काय - तो, फक्त तोच माझ्या हृदयाचा स्वामी आहे, दुसरा कोणीही नाही.'*(चैतन्यदेव)

(११)

कुंडलिनीचे आंशिक जागरण फार घातक ठरु शकते, कारण त्याने भयानक लैंगिक प्रतिक्रिया निर्माण होतात. याचसाठी अगोदर चारित्र्यसंवर्धन करा.

स्वामी ब्रम्हानंद सांगत, 'स्वामीजी म्हणत असत की कुंडलिनीचे अगदी थोडेसे जागरण फार धोक्याचे असते. ती आणखी वर उठेपर्यंत काम, क्रोध आदी निम्नस्तरावरील वासना अत्यंत त्रासदायक ठरतात. वैष्णव संप्रदायातील मधुरभाव व सखीभावाच्या साधना अतिशय धोक्याच्या असतात. सतत श्रीकृष्णाच्या राधेबरोबरच्या दैवी क्रीडेचे स्मरण करु जाऊन ते स्वत:चा काम विकार आवरु शकत नाहीत, आणि मग ते नाना प्रकारच्या कामोपभोगाच्या क्रियांत रममाण होतात. म्हणूनच प्रारंभिक साधकांनी रासलीलाविषयक व इतर तत्सम ग्रंथ वाचण्यासंबंधी बंधने घालण्यात आली आहेत. ध्यान करणे ही काही साधी गोष्ट नव्हे. जेव्हा काम, क्रोध, लोभ व इतर सारे वाईट विकार ताब्यात ठेवले जातात तेव्हाच,फक्त तेव्हाच, ध्यान शक्य होते. जर यांपैकी एकानेही डोके वर काढले तर ध्यान अशक्य होऊन बसते'. ध्येयाविरुद्ध वाहणाऱ्या साऱ्या प्रेरणा ध्यानात अडथळे आणतात. म्हणूनच त्यांच्यावर ताबा मिळवून, त्या हळूहळू कमी करुन त्यांना अखेरीस नेस्तानाबूत करावे लागेल. बाह्य खडतर तपस्या व कठोरपणा हे मनावर ताबा मिळवून त्याला शुद्ध करण्यापरीस कितीतरी सोपे आहे.

(१२)

असे कितीतरी हरीचे लाल आहेत, ज्यांना वाटते की आधी जीवनातील सारे भोगून मग देवधर्म वगैरे वृद्धापकाळी करण्यासाठी ठेवता येईल. पण त्यांच्यासाठी तशी वेळ कधी येतच नाही, कारण स्वत:च्या शक्तीचा बव्हंश शारीरिक सुखभोगात वाया दवडल्यानंतर मग आध्यात्मिक जीवनात काही मिळविण्यासाठी आता फार उशीर होऊन गेलेला असतो. त्यांचे सारे आयुष्यच असे वृथा निघून जाते व त्यांना त्याची कटू फळे चाखावी लागतात. !

असें कधी म्हणू नका की 'माझे मन फार चंचल आहे, मी ध्यान कसे काय करु ?' तुमचे मन इतके चंचल असल्यामुळे तर ध्यान करणे तुमच्यापक्षी अधिकच आवश्यक आहे. संपूर्णपणे प्रशान्त मनाला ध्यानाची काही तितकीशी गरज उरत नाही.

ज्याला खरोखर तहान लागलेली आहे त्याला पाण्याची नितांत गरज आहे, पण ज्यांना तहान लागलेली

*न धनं न जनं न सुन्दरी, कविता वा जगदीश कामये। मम जन्मनि जन्मनीश्वरे भवताद् भक्तिरहैतुकी त्वयि। आश्लिष्य वा पादरतां पिनष्टु माम्, अदर्शनान्मर्महतां करोतु वा। यथा तथा वा विद्धातु लम्पटो, मत्प्राणनाथस्तु स एव नापर: ॥ श्रीचैतन्यकृत शिक्षाष्टकम् (४ व ८)

नाही ते बराच काळ पाण्याशिवाय काढू शकतात. जो खरा प्रामाणिक मुमुक्षू असेल तो त्याला दिलेला उपदेश कसोशीने पाळेल; पण आपण इतके काही संशयग्रस्त असतो, आपल्यात सरलपणा इतका कमी असतो की आपल्याला दिलेला उपदेश पालन करण्यासाठी आपण काही फारशी त्वरा करीत नाही.

आणि यानंतर म्हणजे आपण शुद्ध, निर्मळ पाण्यासाठी धडपडले पाहिजे, गढूळलेल्या घाणेरड्या पाण्यासाठी नव्हे. जे खरोखर चांगले नि शुद्ध नाही त्याच्यासाठी धडपडण्याऐवजी आपली तृष्णा आणखी तीव्र झाली तरी उत्तम.

कुंतीची ती सुरेख प्रार्थना आहे - 'हे श्रीहरी मला दु:ख द्या, अधिकाधिक दु:ख द्या कारण जेव्हा दु:खात असतो तेव्हाच आम्हाला तुमचे स्मरण घडते.'

(१३)

दैवी प्रेमाला आपल्या लौकिक उत्कर्षाचा मापदंड लावून मोजता येणे कधीच शक्य नाही. जिथे भगवान स्वत:च सारथी बनले आहेत तिथे यश हमखास ठेवलेलेच आहे. जेव्हा भक्त स्वत:ला परमेश्वराच्या दिग्दर्शनाखाली चालविण्यास कबूल होतो तेव्हा यशाची निश्चिती होते. हेच श्रीमद्भगवद्गीतेचे मन्तव्य आणि सार आहे. त्याहून निम्न उद्दिष्ट असून चालणार नाही. पण खरोखरचा त्याग व शरणागती जीवनात येण्यास बराच काळ लागतो.

जोपावेतो अंतिम ध्येय - आत्मानुभूती प्राप्त होत नाही तोवर जीवनात सुरक्षितता येणे शक्य नाही. हे ध्येय गाठण्यापूर्वी कोणताही साधक कोणत्याही क्षणी कोलमडून पडू शकतो. म्हणून आपण सर्वांनी अत्यंत काळजीपूर्वक राहून आपल्याला दिलेल्या साऱ्या उपदेशांचे कसोशीने पालन करायला हवे. आपापसात लौकिक गोष्टींबद्दल वा निरुपयोगी बाबींबद्दल वायफळ चर्चा करीत बसू नका. 'केवळ आपल्याला सत्य जाणण्यास उपयोगी ठरेल त्याच तर्काचा वा चर्चेचा आश्रय घ्यावा, इतर नव्हे'. श्रीरामकृष्णांना सर्वच पोकळ गप्पांचा अत्यंत तिटकारा असे व ते आपल्या शिष्यांना त्याच्या दुष्परिणामाबद्दल सावध करीत असत.

(सदर लेख 'जीवन विकास' नोव्हेंबर १९९४ मधून पुनमुद्रित.)

****

**ज्ञान्याला स्वत:च्या ठायी आत्मानुभव येत असतो. त्याची स्थिती असते गंगेच्या प्रवाहा सारखी. गंगा प्रारंभी एकसारखी एकाच दिशेने वाहत जाते. ज्ञान्याच्या दृष्टीने अवघेच मिथ्था-स्वप्नवत. ती नेहमी स्वस्वरुपी स्थीत असतो. पण भक्तांची गोष्ट तशी नाही. त्याचा भाव प्रवाह सरळ एकाच दिशेने वाहत नसतो. त्यात भरती ओहती चालु असते. भावाच्या धुंदीत ती कधी हसतो, कधी नाचतो, तर कधी गातो. भक्ताला देवाबरोबर विलास करणे आवडते. सच्चिदानंद सागरात ती कधी पोहतो, कधी डुबी मारतो, तर कधी वर तरंगतो. जसा बर्फाचा तुकडा पाण्यात 'डुबुक डाबूक, डुबुक डाबूक' करतो तसा**

श्रीराकृष्ण

(वचनामृत अ. ४९ पृ. ४६७)

# माताजी : गुरूभक्ती

**स्वामी पूर्णात्मानन्द**
अनु. : सविता ओगीराल, वेस्ट पार्क रोड,
धंतोली, नागपुर

आपल्या आचार्यांनी म्हटले होते, 'नास्ति मातृसमगुरू:' आईसारखा गुरू नाही. तर जगदगुरू श्रीरामकृष्णांनी जगद्‌वासियांच्या काना-मनांत आणि प्राणांत ह्यावेळी 'आई' हा मंत्र सांगितला. केवळ मंत्र सांगूनच ते थांबले नाहीत तर मंत्रप्रतिमा देखील दिली. त्याच मूर्तीचे नाव सारदादेवी. आणि सांप्रतकाळी माताजी श्रीसारदादेवींच्या रूपात आई आणि गुरू दोन्ही लाभल्याने सारे जग कृतकृत्य झाले.

गुरूंचे श्रेष्ठत्व त्यातच असते, जे शिष्याच्या स्वभावाप्रमाणे त्याला त्याच्या अभीष्ट लक्ष्याप्रती अग्रेसर करून देऊ शकतात. सर्वसाधाण असे दिसून येते की फक्त आईलाच तिच्या लेकराची आवड व मानसिकता यांचा यथार्थपणे परिचय असतो. म्हणूनच ज्याच्या पोटाला जे सोसते तेच पदार्थ रांधून ती त्याला वाढते, जेणेकरून तिच्या मुलांचे व्यवस्थित स्वास्थ्यरक्षण होईल. माताजी श्रीसारदादेवी लौकिकार्थाने 'आई' झालेल्या नव्हत्या तरी त्या अगणित मुलांची 'जननी' होत्या. त्या साऱ्यांसाठी त्या 'खऱ्याखुऱ्या आई' च होत्या, नव्हे त्याहीपेक्षा अधिक काही होत्या. एवढेच नव्हे तर या अगणित संतानांपैकी काहींच्या त्या गुरूसुध्दा होत्या. पारमार्थिक पथप्रदर्शक होत्या. पण फक्त काहींच्या म्हटले तर सत्य दडवले जाईल, कारण त्या अखिल जगताच्याच गुरू व जननी होत्या. म्हणूनच त्या त्यांच्या समस्त आश्रित, समस्त संतानांचे देह, मन व आत्म्याचा संवाद सम्यकपणे जाणीत असत.

गुरू असतो ज्ञानदाता वा ज्ञानदात्री. 'गुरू' या शब्दातच त्याचा अर्थ निहित आहे. 'गु' शब्दाचा अर्थ आहे अज्ञान आणि 'रू' शब्दाचा अर्थ आहे अज्ञाननाशक ज्योती. म्हणून गुरू त्यांनाच संबोधायचे, जे अज्ञानरूप अंध:कार नाहीसा करून टाकतात. वेदांच्या मताप्रमाणे ज्ञानाची अधिष्ठात्री देवी म्हणजे सरस्वती. तंत्रमताप्रमाणे माणसाच्या मध्ये असलेली मूलाधारशक्ती 'कुंडलिनी शक्ती' म्हणून संबोधिली जाते; त्याच शक्तीच्या उन्नयन व जागरणाने मानवामध्ये ज्ञानाचा उदय होतो. हृदयात ज्ञानाचा प्रकाश उजळतो. सांगण्याचा मुद्दा हाच की गुरू, सरस्वती आणि मूलाधारशक्ती कुंडलिनीचा बीजमंत्र एकच आहे तो म्हणजे 'ऐं'.

श्रीरामकृष्ण सारदादेवीविषयी म्हणाले होते, 'ती सारदा-सरस्वती ज्ञान द्यायला आली आहे'. आणखी म्हणाले "ती ज्ञानदायिनी". स्वामीजी देखील एका भक्ताला म्हणाले होते, "वर्तमानकाळी त्या सरस्वतीच्या रूपात अवतीर्ण झाल्या आहेत". याशिवाय माताजी स्वत: मूलशक्ती कुंडलिनी स्वरूपिणी होत्या याचे प्रमाण स्वामी विज्ञानानंदांना माताजींच्या प्रथम दर्शनाच्या वेळी आलेल्या अनुभवाच्या वर्णनातून प्राप्त होते. ते म्हणतात, "आजवर मी माताजींना पाहिले नव्हते म्हणून पाहायला गेलो. माताजी वरच्या मजल्यावर तर मी तळमजल्यावर होतो. माझे हृदयपद्म विकसित झाले." नंतर माताजींकडून दीक्षा ग्रहण केली तेव्हा पुन्हा एकदा विद्युततरंगासारखे काही पयापासून डोक्यापर्यंत संक्रमित झाले. असा अनुभव अनेकांना आलेला आहे.

अर्थात यावरून हेच सिध्द होते की, माताजी एकाचवेळी गुरू, सरस्वती व मूलशक्ती होत्या. तिन्ही एकात, एकात तिन्ही. सरस्वती व मूलशक्ती रूप हे त्यांचे दैवीसत्तेचे क्षेत्र; गुरू त्यांची लौकिक जगातील पारमार्थिक भूमिका. शिवाय त्या होत्या जननी. त्यांची ही चारही रूपे सत्य आहेत आणि त्या चार रूपांचे विभाजन करता येत नाही. कारण एकामध्ये दुसरे किंवा इतर दोन्ही अविच्छिन्नपणे जोडलेले आहे. त्यांचे सरस्वती व मूलाशक्ती स्वरूप आपण देवी-रूपात नक्कीच अंतर्भूत

करू शकतो. मग शिल्लक राहतात तीन रूपे - देवी, गुरू व जननी. माताजींच्या चरित्राचे श्रेष्ठ लेखक स्वामी गंभीरानंद यांनी बरोबरच लिहिले आहे, हे सर्व त्यांच्या देहमनाला धरून प्रकटित झालेले अखंड महाशक्तीचे एक वैशिष्ट्यपूर्ण रूप होय. या अखंड शक्तीचे लौकिक दृष्टीने विश्लेषण करून चालणार नाही (कारण) आमची सीमित बृध्दी असीमाला धरू शकत नाही. आपल्या धारणाशक्तीच्या अक्षमतेमुळे आपण माताजींना जननी, गुरू, देवी आदी विविध रूपांत जाणण्याचा प्रयत्न करतो; परंतु थोडा विचार केल्यावर लक्षात येते की, त्यांच्या अलौकिक जीवनात गुरू, देवी व माता ही त्रिविध रूपे एकमेकांशी संलग्न आहेत. जेव्हा केव्हा त्यांना जननीरूपात पाहतो, तेव्हा तेव्हा त्यांचे अमोघ ज्ञानदायिनी शक्तिरूप आपल्यासमोर प्रस्फुटित होते; जेव्हा केव्हा आपण त्यांना गुरुरूपात पाहू इच्छितो तेव्हा त्या मातृरूप धारण करून आपल्याला मांडीवर ओढून घेतात; गुरू व जननीरूपात पकडायला गेलो तर असे दिसते की सर्वात श्रेष्ठ अशा देवीरूपात त्या प्रतिष्ठित झालेल्या आहेत." खरे तर, माताजींच्या गुरूशक्तीचे अनुध्यान करताना या परस्पर-संपर्कित त्रिविध रूपांचे स्मरण ठेवायला हवे.

गुरूला पथप्रदर्शक म्हणतात. गुरू आपल्या शिष्याला योग्य मार्गावरून घेऊन जातो. सिध्दगुरू, त्याच्या इच्छेनुसार एखाद्या शिष्यासमोर एखाद्या वेळी मुक्तीचे व्दार सुध्दा उन्मुक्त करून देऊ शकतो. माताजी सुध्दा असे करू शकत होत्या. निशिकान्त मजुमदारांना दीक्षा दिल्यावर माताजी म्हणाल्या, "१०८ वेळा मंत्रजप करशील. आणखी तुला काही करावे लागणार नाही, बाकी सारे मी करेन... बाबा रे, किती जन्म फिरतो आहेस. खूप फिरल्यावर एवढा काळानंतर घरचा मुलगा घरी येऊन पोहोचला आहे. आता काळजी कसली?" सुरेन्द्रनाथ सरकार माताजींना म्हणाले होते, "आई, साधन-भजन काहीही करू शकत नाही, यानंतरही काही करू शकेन असे वाटत नाही." माताजी म्हणाल्या, "आणखी काय करणार, जे करतो आहेस तेच करीत राहा. पण पक्के लक्षात ठेव की, आपल्या पाठीशी ठाकुर आहेत - मी आहे." आणखी एकदा त्यांना आश्वस्त करू माताजी म्हणाल्या, "तुम्ही जे करीत आहात तेच करीत राहा. भय कसले? मी आहे ना!" स्वामी प्रेमेशानन्द एकदा शारीरिक अस्वास्थ्यामुळे जास्त साधन-भजन करू शकत नव्हते. माताजींना त्याबद्दल सांगितल्यावर त्या म्हणाल्या, "आई म्हणून एकदा विश्वास ठेवल्यावर त्या साऱ्याचे काय प्रयोजन ?" शचीबाला सरकार माताजींना म्हणाल्या होत्या, "सांसारिक कामे खूप असतात; जपतप करायला वेळच मिळत नाही - काहीच धड होत नाही." यावर माताजी त्यांना म्हणाल्या, "माझे जे काही आहे, त्याच्या तुम्हीच मालक आहात. तुम्हाला काहीही करायचे कारण नाही." एक दिवस नीलकान्त चौधरी असेच अतिशय हताशपणे उद्बोधनमधे माताजींकडे आले. त्यांच्या नैराश्याचे कारण म्हणजे, माताजींच्या चरणी आश्रय मिळूनही साधन-भजन व्हावे तसे होत नव्हते. अश्रुपूर्ण नयनांनी रूध्द कंठाने माताजींच्या चरणांवर लोटांगण घालीत त्यांनी माताजींजवळ स्वत:ची व्यथा निवेदन केली. करूणामयी म्हणाल्या, "भय कसल रे बाळा, तू इतकी काळजी कशाला करतोस? भीतीचे कारणच काय ? तुम्ही आणखीन साधन-भजन काय करणार ? मीच तुमच्यासाठी ते करीत असते. तुम्ही काय वाटेल ते करा, अखेरच्या क्षणी ठाकुंना तुम्हाला न्यायला यावेच लागेल. ... नेहमी एवढे लक्षात ठेवा की तुमच्या पाठीशी एकजण आहेत, तेच तुमचे सर्वदा रक्षण करतील."

पण असे टोकाचे आश्वासन माताजी स्वत:हून त्यांच्या सर्वच शरणागत संतानांना देत नसत. ज्या दृष्टान्तांचा इथे उल्लेख करण्यात आलेला आहे ते विशेष व अपवादात्मक होत. परंतु त्यावरून आपल्याला समजू शकेल की माताजी इच्छेनुसार मानवाला मुक्ती देऊ शकत होत्या. सिध्द गुरूच असे करू शकतात. म्हणून बहुधा ते असे करीत नाहीत. कारण असे केल्यास शिष्याची उन्नती होणार नाही. म्हणूनच कठोर साधना व तपस्येच्या माध्यमातून, स्वत:च्या पुरूषार्थाच्या बळावर आपल्या शिष्यांना मुक्तिमार्गावर अग्रेसर होण्यास प्रेरित करतात. माताजींच्या ठिकाणी बहुतेक वेळा असेच आढळून येते.

केवळ इच्छामात्रेच नाही तर केवळ एका दृष्टीक्षेपाने शिष्याच्या जन्मोजन्मीच्या अज्ञानग्रंथी तोडून टाकण्याची त्यांच्यात क्षमता होती. परंतु या क्षमतेचा प्रयोग त्यांनी फारसा केलाच नाही. त्यांचा भाव असा होता - आधी आत्मकृपा, त्यानंतर गुरूकृपा. आधी प्रयत्न त्यानंतर देव. नि:संदिग्ध भाषेत त्या म्हणत - "साधनेशिवाय साध्य वस्तू प्राप्त होत नसते. बाबारे, चंदन घासल्याशिवाय त्याचा सुगंध पसरेल काय ?" या साधनालाच भगवद्गीतेत श्रीभगवंतांनी 'अभ्यास' किंवा 'अभ्यासयोग' ( ६-३५,१२,-९) म्हणून घोषित केले आहे आणि ईश्वरप्राप्तीचा एक मार्ग म्हणून त्याचा उल्लेख केला आहे. महर्षी पतंजलींनी सुध्दा त्यांच्या योगसूत्रात अभ्यासाचे महत्व स्वीकृत केले आहे. (योगसूत्र, समाधिपाद, १३-१४) या विषयी माताजी त्यांच्या शिष्य संतानांना सांगत असत. त्या म्हणत, अभ्यासात केवढी शक्ती असते ! "इतकी की जपाचा अभ्यास करता करता माणूस सिध्द होतो - "जपात् सिध्दि:, जपात् सिध्दि:, जपात् सिध्दि:"

असे असले तरी अध्यात्मजीवनातील अखेरचा टप्पा म्हणजे कृपा - ईश्वरकृपा. खरी व्याकुळता पाहिल्यास त्या ही गोष्ट समजावून द्यायला विसरत नसत. एका संन्यासीपुत्राने एकदा त्यांना विचारले, "परमेश्वरप्राप्ती कशाने होते ? पूजा, जप, ध्यान - या साऱ्याने ?" माताजी उत्तरल्या, "या कशानेही ती होत नाही." मुलाने पुन्हा विचारले, "कशानेही नाही?" माताजींनी पुन्हा उत्तर दिले, "कशानेही नाही." त्याचे पुन्हा विचारले "कशानेच नाही"? पुन्हा माताजी दृढ आवाजात म्हणाल्या "कशानेही नव्हे." मग शिष्य म्हणाला, "मग कशाने होते ?" यावर माताजी ठामपणे उत्तरल्या, "फक्त त्याच्या कृपेमुळे होते". पण तरी जप-ध्यान हे सारे करावे लागते. त्यामुळे मनावरील मळ निघून जातो. पूजा, जप, ध्यान करावे लागते. (कारण साधना केली नाही तर त्याची कृपा होत नाही. साधनेच्याच फलाने कृपेचे दालन समोर येते). ज्याप्रमाणे फूल हाताळले तर त्यातून सुगंध पसरतो, चंदन घासले तर गंध दरवळतो, त्याचप्रमाणे जगत्तत्वांचा विचार करता करता तत्वज्ञानाचा उदय होतो. पण वासनारहित जर होता आले तर त्याच क्षणी होईल."

माताजींनी ही एक असाधारण गोष्ट सांगितली - "वासनारहित जर होता आले तर त्याच क्षणी होईल". संसारचक्राचे मूळ म्हणजे वासना, बौध्द परिभाषेत "तण्हा" (तृष्णा). आपल्या सर्व साधना, सर्व तपस्यांचे लक्ष्य असते वासनांचा क्षय, वासना निवृत्ती आणि त्यापासूनच ज्ञान व मोक्षाचा लाभ होतो. 'विवेकचूडामणी' मध्ये आचार्य शंकर म्हणतात, 'वासनाप्रक्षयो मोक्षः' प्रकृष्टरूपे अर्थात पूर्णपणे वासनांचा क्षय झाल्यावर मोक्ष मिळतो. मोक्षलाभानंतर संसारचक्र थांबते. माताजी म्हणतात, "वासना असतील तर जीवाचे येणे-जाणे संपत नाही. वासनांमुळेच या देहातून दुसरा देह मिळत जातो.... जसे छोट्याशा वटवृक्षाच्या बीजातून कालांतराने विशाल वटवृक्ष तयार होतो, तसेच. वासना असतील तर पुनर्जन्म प्राप्त होणारच, जणू एका खोळीतून काढून दुसऱ्या एका खोळीत भरून घ्यावे तसे." माताजी म्हणतात, "वासनाच सर्व दुःखांचे मूळ, वारंवारच्या जन्ममृत्यूचे कारण व मुक्तिमार्गातील अडथळा असतात". म्हणूनच त्या उपदेश करतात, "थोडक्यात सांगायचे तर, वासनारहित होण्यासाठी प्रार्थना करावी."

इथे त्या आणखी एक मौलीक गोष्ट सांगून गेल्या, "प्रार्थना करावी." प्रार्थनेशी जो भाव संयुक्त असतो, तो म्हणजे विनय आणि व्याकुळता. साधना, अध्यवसाय हेही आवश्यक असले तरी तेवढ्याने सारे होत नाही. त्यानंतरही एक गोष्ट शिल्लक उरते, ती म्हणजे व्याकुळता. माताजी म्हणतात, "खरी गोष्ट काय ती माहीताहे ? हृदयातून व्याकुळ होऊन जो प्रार्थना करतो त्याला जे पाहिजे ते मिळते. अनुराग, व्याकुळता हीच खरी गोष्ट होय. व्याकुळतेतूनच शरणागती येते. "नाहं नाहं तुहुँ तुहुँ". असे श्रीरामकृष्ण म्हणत असत. योगसूत्रकार महर्षी पतंजलींनी यालाच 'ईश्वरप्रणिधान' असे नाव दिले आहे - ईश्वराच्या ठायी आत्मसमर्पण. अगदी साध्या भाषेत माताजी म्हणत, इतका जप केला असे म्हटले काय आणि एवढे काम केले असे म्हटले काय, कशालाच अर्थ नाही. महामायेने मार्ग मोकळा केला नाही तर कोणाची बिशाद!

हे जीवा, शरणागत हो, केवळ शरणागत हो, तेव्हाच ती मार्ग मोकळी करुन देईल. उपनिषदातील त्या प्रसिध्द मंत्राची इथे आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

**यमेवैष वृणुते तेनलभ्यस्तस्यैष आत्मा विवृणुते तनूं स्वाम् ॥**

आत्मा ज्याचे वरण करतो अथवा जो आत्म्याचे वरण करतो तोच त्याचा लाभ करुन घेतो. त्याच्याजवळच आत्मा स्वस्वरुप प्रकटित करतो.

अद्वैतवादी या मंत्राची व्याख्या करताना म्हणतात, साधना व अभ्यासाद्वारे जी व्यक्ती आत्मशक्तीचा विकास करुन आत्म्याशी अभेदस्वरुप होण्याचा प्रयत्न करते तिच्याठायी आत्मस्वरुप प्रकटित होते. अर्थात त्याच व्यक्तीला आत्मसाक्षात्कार होतो. या व्याख्येप्रमाणे आत्मसाक्षात्काराच्या क्षेत्रात प्रयत्नवादी भूमिका हीच एका [illegible] भूमिका म्हणून स्वीकारण्यात आलेली आहे. परंतू उप[illegible]त मंत्राची विशिष्टाद्वैत किंवा द्वैतवादानुसार व्य[illegible] जाते तेव्हा ईश्वर ज्याच्यावर अनुग्रह वा कृपा कर[illegible]समोर त्याचे स्वरुप उद्घाटित होते, असे म्हटले जाते. या व्याख्येत केवळ कृपेच्या भूमिकेचाच विचार करण्यात आलेला आहे. माताजींचे जीवन व त्यांच्या वाणीचा विचार केल्यास आपणास असे दिसून येते की, त्या दोन्ही अर्थांमध्ये कुठलेच असामंजस्य नाही. किंबहुना दोन्ही[illegible]र्थांच्या समन्वयातून त्याचा खरा अर्थच प्रतीत होतो. दो[illegible] सत्यच आहेत. लौकिक असो वा पारमार्थिक, उभय जीवनात पुरुषकार किंवा दैव दोन्ही अपरिहार्य होत, आणि एक दुसऱ्याला पूरक होत. याप्रसंगी ही गोष्ट उल्लेखनीय आहे. श्रीरामकृष्णांनी देखील हीच गोष्ट सांगितली आहे. माताजी अशांतशा गुरु नव्हत्या. त्या प्रज्ञा व बोध यांच्या भूमीवर प्रतिष्ठित होत्या. म्हणूनच सत्यावर आपले बोट ठेवून त्यांनी त्याकडे आपले लक्ष आकर्षित करुन घेतले.

'गुरु शब्दाचा आणखी एक अर्थ आहे 'आचार्य'. माताजी प्राकृत अर्थानेच आचार्य होत्या. आचार्य मानवाला नवीन दृष्टी प्रदान करतात. शिवाय विषयवस्तूकडे ज्ञानाच्या प्रकाशात बघायला शिकवितात. संकीर्णता, परमताविषयी असहिष्णुता, दुसऱ्याविषयी दोषदृष्टी ह्या साऱ्या केवळ आपल्याच नव्हे तर आपल्या आजुबाजूच्या साऱ्यांच्याच जीवनात आणि इतकेच नव्हे तर संपूर्ण जगातील मानवांच्या जीवनात फार मोठे अकल्याण व अनर्थाला आमंत्रित करीत असतात. आचार्य माताजी म्हणून म्हणतात. "ब्रह्म सर्वच वस्तूंमध्ये विद्यमान आहे. परंतु हे लक्षात ठेवा की साधुपुरूष मानवाला मार्ग दाखविण्यासाठी येत असतात, ते सारे एकच गोष्ट आपापल्या भाषेत सांगतात. मार्ग अनेक असल्याने त्या साऱ्यांचेच कथन सत्य असते. ज्याप्रमाणे एकाच झाडावर पांढरे, काळे, लाल नानातऱ्हेचे पक्षी येऊन बसतात व वेगवेगळे बोल बोलतात. ते सारे ऐकताना निरनिराळे वाटले तरी आपण त्या साऱ्याला पक्ष्यांचे बोल असेच म्हणतो - एखाद्या पक्ष्याचे बोल आणि दुसऱ्याचे बोल नव्हेत असे तर आपण म्हणत नाही". जगताला उद्देशून त्यांचे अखेरचे शब्द होते, "जर शांती हवी असेल तर कोणाचे दोष बघू नका. दोष बघा स्वत:चे. जगाला आपलेसे करायला शिका. कोणी परके नाही, सारे जग तुमचेच आहे."

हे त्या केवळ बोलल्या नाहीत. तो त्यांच्या स्वत:च्या जीवनातील मंत्र होता, त्यांच्या साधनेची ती उपलब्धी होती. असे होते त्यांचे जीवन. आणि त्यांचे जिवनच त्यांची वाणी होय. हे जीवनच त्यांना जगद्गुरुंच्या एकत्वदर्शन वा ब्रह्मविज्ञानात प्रतिष्ठित करते झाले. त्या उपलब्धीतूनच त्या म्हणाल्या होत्या, ज्ञानप्राप्तीनंतर ईश्वर बिश्वर सारे उडून जाते. 'आई, आई' - अखेर दिसते. माझी आई सारे जग व्यापून आहे. सारे एकाकार होऊन समोर उभे राहते. हीच तर खरी गोष्ट आहे. त्या आणखी म्हणाल्या, साधन करता करता लक्षात येते की माझ्यामध्ये जे आहेत, तेच तुमच्यामध्ये पण आहेत, अगदी चोर, डाकू, डोम इ. साऱ्यांमध्येही तेच आहेत. या त्यांच्या उपलब्धीची व्याप्ती केवढी होती हे त्यांच्याच मुखातून ऐकू, "एक काळा मुंगळा जात आहे, राधी त्याला मारणार होती. काय पाहिले ते माहीताहे ? पाहिले तो मुंगळा नाहीच - ठाकुर, अगदी ठाकुरांचे तेच हात, तेच पाय, मुख, नेत्र तेच सारे - मग राधीला टोकले." ब्रह्मज्ञानी श्रीरामकृष्णांनी

नरेंद्रनाथांजवळ, या उपलब्धीलाच सर्वोच्च अनुभूती म्हणून घोषित केले होते. म्हणाले होते, " तूच तर गाणे म्हणत असतोस, 'जो कुछ है सो तूही है' नंतरच्या काळात स्वामीजींनी त्याच उपलब्धीला शब्दरुप दिले, "ब्रह्मापासून नी कीट - परमाणू, सर्वांभूती तेच प्रेममय".

माताजी होत्या सद्गुरु. कोटी कोटींमधे एखाद्दुसराच असा सद्गुरु प्राप्त होतो. जो किंवा जे स्वत: सर्व आश्रितांचा उध्दार करण्याचे सामर्थ्य धारण करुन असतात. माताजींच्या कंठातून हीच गोष्ट ऐकण्यात येते. त्या म्हणाल्या होत्या, ज्यांना कोणाला त्यांनी आश्रय दिलेला आहे त्यापैकी एखादा जरी मुक्तीपासून वंचित राहिला तरी त्यांची सुटका नाही - "तुम्हाला काय वाटते,... ज्यांचा भार मी घेतला आहे त्यांच्यापैकी एकजण जरी बाकी राहील तर काय माझी सुटका आहे ?... ज्यांचा स्वत:चे म्हणून स्वीकार केला, त्यांना आता मी दूर ढकलू शकत नाही. ज्याप्रमाणे गीते मध्ये जगद्गुरु श्रीभगवान म्हणाले आहेत कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्त: प्रणश्यति (९.३१) - हे कुंतीपुत्र अर्जुना, तू निश्चितपणे समजून अस की माझ्या भक्ताचा , माझ्या आश्रिताचा विनाश नाही. त्याच प्रमाणे माताजींनी दृढपणे घोषित केले की, माझा पुत्र असून तू काय अधोगती पावशील? इथे जे जे आलेत, जी जी माझी मुलं आहेत, त्यांची मुक्ती झाली आहे. विधीला सुद्धा माझ्या मुलांना रसातळी फेकता येणार नाही. ..माझ्यावर सारा भार टाकून निश्चिंत राहा. आणि एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा की तुमच्या पाठीशी असे एकजण आहे जे योग्यवेळी तुम्हाला त्या परमधामी घेऊन जातील". त्यानी सुस्पष्टपणे आश्वासन दिले की, ज्यांनी त्याचा आश्रय घेतला आहे त्याचा हा अखेरचा जन्म होय. एकदा माताजींकडून दीक्षा घेतलेल्या त्यांच्या एका प्रकाराने विचारले, "माँ, ज्यांनी तुमच्याकडून दिक्षा घेतली आहे, त्यांना पृथ्वीवर पुन्हा यावे लागणार नाही ना? यावर श्रीमाताजी उत्तरल्या, नाही, त्याना पुन्हा यावे लागणार नाही.

एकदा दुरवरच्या कोण्या प्रदेशातून कोणी एकजण दीक्षा घ्यायला आला होता. त्यावेळी माताजींची प्रकृती फारच बिघडलेली होती. स्वामी सारदानंदांच्या आदेशानूसार दर्शन बंद ठेवले होते. म्हणून सेवकाने त्या व्यक्तिला आत जाऊ दिले नाही. मण तो माणूस फार दुराग्रही . त्यामुळे दोघांमध्ये वाद सुरु झाला. हा गोंधळ माताजींच्या कानावर आला. अस्वस्थ असूनही माताजी स्वत: कशाबशा तिथवर आल्या. जरा त्रासिकपणे सेवकाला म्हणाल्या, तुम्ही यायला बंदी का बरे केली आहे? सेवक म्हणाला, "शरत् महाराजांची आज्ञा आहे. अस्वस्थ शरीराने दीक्षा दिली तर तुमचे स्वास्थ्य आणखी बिघडेल". यावर माताजी म्हणाल्या. "शरतूला काय माहित, यासाठीच तर मी आले आहे. मी त्याला दीक्षा देणार". अशा काही प्रसंगी त्यांचा गुरुभाव व देवीभाव विशेषत्वाने प्रकट होताना दिसतो.

खऱ्याखऱ्या आश्रितांप्रती दया, करुणेने त्या अशाच आत्मविस्मृत होऊन जात. खरेतर अशावेळी गुरु, देवी इ. सर्व भावांना झाकून ठेवून सारे काही विसरुन जो भाव त्यांच्यावर अधिकार गाजवीत असे, तो त्यांच्यातील मातृभाव. त्या म्हणत, "मी गुरु नाही. मी तर आई, साऱ्यांची आई". गुरु, देवी इ. सर्व परिघांना उल्लंघून, ओलांडून अशावेळी त्या समोर येत, त्या फक्त आई म्हणूनच. तरीही गुरुशक्तीचा संपूर्ण विकास त्यांच्या ठायी झालेला होता, अगदी श्रीरामकृष्णांमध्ये होता तितकाच. श्रीरामकृष्णांचे एक अंतरंग त्यागी शिष्य स्वामी विज्ञानानंद म्हणत असत", ठाकुरांकडून मंत्र घेतला काय किंवा माताजींकडून घेतला काय, दोन्हीत कसलाच भेद नाही. दोन्ही एकच.

टिप : सदर लेख "जीवन विकास" फे. २००० मधुन पुनर्मुद्रित.

****

# पूजा - एक आध्यात्मिक साधना

**स्वामी भजनानंद**

अनु. ब्र. प्रशांत चैतन्य*

वैदिक कालोत्तर विकसित झालेल्या पूजेचा तत्वे आपण मागच्या लेखात पाहिलीच आहेत. या तत्वांचा समावेष एका नव्या प्रकारच्या शास्त्रग्रंथात झाला. त्यांना 'आगम शास्त्र' म्हणतात. शैव, शाक्त, वैष्णव वगैरे प्रमुख संप्रदायांची स्वतंत्र आगमशास्त्रे आहेत. विभिन्न संप्रदाय व प्रांतामध्ये प्रचलित असलेल्या पूजेमध्ये किरकोळ भेद असले, तरी सर्वांची मूळ पध्दत मात्र सारखीच असते. हिंदूधर्मातील 'पूजा' तंत्रांनी परिपूर्ण अवस्थेत नेली आणि त्यातील सर्वात श्रेष्ठ पूजापध्दती बंगालमध्ये दिसून येते. इतर प्रांतात सुध्दा पूजेवर तंत्रांचा प्रभाव दिसून येतो, पण त्यांच्यात वैदिक मंत्र व स्तुतीचा अधिक वापर होतो. असो. आपल्या नित्यपूजेमध्ये सहा टप्पे असतात. ते म्हणजे प्रारंभिक तयारी, शुध्दी, पूजकाने स्वतःचे दिव्यीकरण करणे, देवतेचे आवाहन, तिची अर्चना आणि पूजेचा उपसंहार करणे.

### प्रारंभिक तयारी

पूजेला सुरूवात करायच्या अगोदर काही तयारी केली जाते. प्रथम पूजेची जागा धुऊन किंवा ओल्या कापडाने पुसून तिथे पूजेची उपकरणे, प्रज्वलित दीप वगैरे व्यवस्थित मांडून ठेवण्यात येतात. नंतर पुजारी उत्तर वा पूर्वाभिमुख होऊन आसनावर बसल्यावर त्याच्या हाताशीच चंदन, फुले, पाणी इ. पूजासाहित्य ठेवण्यात येते.

त्यानंतर आचमन करून म्हणजे तीन वेळा विशिष्ट पध्दतीने विष्णुनाम घेत पाणी प्राशन करून पूजेलला सुरवात होते. आचमनाशिवाय पवित्र मंत्राचे उच्चारण करू नये. त्यानंतर 'पूजेचा' संकल्प सोडण्यात येतो. 'संकल्प' म्हणजे पूजेचा हेतू जाहीर करून ती निर्धाराने करण्याचा मनोदय व्यक्त करणे. मग तो हेतू इहलौकिक सुखप्राप्ती किंवा मुक्ती वा भक्ती काहीही असो. संकल्पामुळे पूजकाची इच्छाशक्ती पूजाकर्माच्या मागे उभी राहते. त्यामुळे पूजा एक जाणीवपूर्वक केलेली उद्दिष्टाकडे नेणारी कृती होते.

त्यांनतर जलशुध्दी म्हणजे पूजेत वापरल्या जाणाऱ्या पाण्यात सूर्यमंडळातील सात पवित्र नद्यांना आवाहन करणे. (गंगा, यमुना, गोदावरी, सरस्वती, नर्मदा, सिंधू व कावेरी या त्या सात पवित्र नद्या आहेत.). या पाण्याला सामान्य 'अर्घ्य - जल' म्हणतात. नंतर विविध देवतांना व गुरूपरंपरेला मंत्रपूर्वक प्रणाम करण्यात येतो.

### शुध्दीकरण

देवतेशी संबंध असलेली प्रत्येक वस्तू पवित्र असते. त्यामुळे तिला पूजेत अर्पण करावयाच्या वस्तूसुध्दा आधी शुध्द करणे आवश्यक आहे. पूजकाने स्वतःचे मन दोषमुक्त करणे, तसेच पूजागृह व आजूबाजूला असलेल्या वाईट शक्ती बाहेर घालवणे, हे सर्व शुध्दीकरणामध्ये येतात.

### पूजकाचे स्वतःचे दैवीकरण

यानंतर पूजकाने स्वतःतील पापपुरूष प्रतीकात्मक पध्दतीने नष्ट करणे व तद्द्वारा स्वतःचे शुध्द, स्वप्रकाशित, दिव्य स्वरूप प्रकट करणे आवश्यक असते. यासाठी प्राणायाम करून सूक्ष्मशरीर शुध्द केले जाते व नंतर 'भूतशुध्दी' ही अत्यंत महत्वाची क्रिया करण्यात येते. (भूत = पंचमहाभूते) यामधे मणक्याच्या तळाशी असलेल्या मूलाधार चक्रात कुंडलिनी शक्तीचे ध्यान करून ती हळूहळू वरच्या एक-एक चक्रातून जात आहे अशी भावना करून अंती मस्तकात असणाऱ्या सहस्त्रार चक्रातील परमशिवाशी मिलित झाली आहे अशी भावना करण्यात येते. आता अशी कल्पना करण्यात येते की स्वतःचे अशुध्द सूक्ष्म व स्थूल शरीर त्या तेजाने भस्मीभूत झाले आहे व त्या जागी दिव्य पापमुक्त शरीर धारण करण्यात आले आहे. यानंतर पूजक स्वतःच्या नव्या दिव्य देहातील

*(प्रबुध्द भारत, संपादकीय, जू-१९८०)

हृदयात 'देवतेला' आवाहन करतो आणि तिची व्यवस्थित मानसपूजा करतो.

**मूर्तीमधे देवतेला आवाहन**

पूजकाला दिव्य शरीर मिळाले; तसेच तो स्वत:च्या हृदयात देवतेचे अस्तित्वसुध्दा अनुभवत आहे. आता शरीराच्या विविध भागांमधे त्याच देवतेची शक्ती स्थापित करणे कर्तव्य आहे. हे 'न्यास' क्रियेने होते. 'न्यास' म्हणजे निश्चयाने स्थापित करणे, ठेवणे. पूजक विविध बीजमंत्राचा जप करून शरीराच्या अवयवांना स्पर्श करतो. न्यासामुळे पुढील क्रिया 'आवाहना' करण्यास त्याला आवश्यक पात्रता व शक्ती मिळते. 'आवाहन' मधे पूजक स्वत:च्या श्वासाव्दारे एका पुष्पामधे हृदयस्थ देवता अवतीर्ण झाली आहे अशी कल्पना करतो. नंतर ते फुल मूर्तीच्या मस्तकावर ठेवण्यात येते. पुढे विविध 'मुद्रा व मंत्राव्दारे' प्राणप्रतिष्ठा करण्यात येते.

अशाप्रकारे पूजेमधे दोन प्रकारचे आवाहन असते. एक स्वत:च्या हृदयात आणि नंतर मूर्तीमधे.

**उपचार**

उपचार किंवा सेवा म्हणजे देवतेचे एखाद्या सन्मान्य पाहुण्याप्रमाणे आदरातिथ्य करणे. हे पाच, दहा किंवा त्याहूनही अधिक प्रकारे केले जाऊ शकते. यात पाणी, चंदन, पुष्पे, धूप, दीप, नैवद्य, वस्त्र यांचा वापर होतो यालाच दशोपचारादी नावे आहेत.

**उपसंहार**

पूजेतील हा शेवटचा भाग. हातामधे ओजळभर फुले घेऊन मंत्र म्हणत देवतेच्या चरणी वाहण्यात येतात. याला 'पुष्पांजली' (मंत्रपुष्पांजली) म्हणतात. यानंतर पूजेचे फल व स्वत:लासुध्दा देवतेच्या चरणी समर्पित करण्यात येते. मंदिरामध्ये भक्तांच्या विनंतीवरून पुजारी ही पुष्पांजली नंतरही अनेत वेळा देऊ शकतो.

देवतेला यानंतर तिच्या स्वस्थानी (स्वत:च्या हृदयात) परत नेण्यासाठी विनंतीवजा प्रार्थना होते. याला 'विसर्जन' किंवा 'उद्वासन' असे नाव आहे.

आता भक्त आनंदाने प्रसाद ग्रहण करतात. कारण याशिवाय पूजा पूर्ण होणारच नाही. प्रसादवितरणाशिवाय पूजा सफल होत नाही असा समज आहे. प्रसादाला इतके मानाचे स्थान आहे की तो हातामधे असताना दुसऱ्याला प्रणाम सुध्दा करू नये. प्रसाद ग्रहण केला म्हणजे आपण पूजेत मानसिकपणे सहभागी आहोत एवढेच दाखवणे नव्हे तर त्यामुळे आपले शरीर व मन शुध्द होतात अशी भावना ठेवणे. प्रसादाचा अर्थ 'कृपा' व प्रसाद ग्रहण केला म्हणजे देवतेचा आशीर्वादच घेतला. देवतेला जेव्हा नैवेद्य दाखविण्यात येतो तेव्हा त्यात काही सूक्ष्म बदल घडून येतो असा सर्वांचा विश्वास आहे. हे कसे होते हे एक गूढ आहे. शास्त्र सांगते, "देव काही खात नाहीत वा पीत नाहीत, हे अमृत पाहूनच ते तृप्त होतात"*.

श्रीसारदादेवी सांगत असत की जेव्हा त्या देवाला नैवद्य दाखवायच्या तेव्हा देवाच्या नेत्रांमधून एक ज्योती येऊन ती सर्व पदार्थांना स्पर्श करीत असे. श्रीमाताजींनी जे पाहिले ते आपल्या परंपरागत विश्वासाशी ठीक जुळते. हिंदूधर्मात आता सांगितलेल्या पूजेशिवाय होम, संध्या, आरती वगैरे आराधनेचे प्रकार आहेत.

**होम**

सध्याच्या काळात वैदिक 'अग्निहोत्र' किंवा तत्सम यज्ञ करणारे फारच थोडे सनातनी लोक शिल्लक आहेत. हिंदूधर्माच्या मुख्य प्रवाहात वैदिक यज्ञ जवळ जवळ नाहीतच. त्यांच्या जागी होम करण्यात येतात. शबर स्वामी होमाची व्याख्या करतात : ज्यात भरपूर आहुती देण्यात येते असे अग्निकर्म म्हणजे होम**.

सध्या जे होम होतात त्यांच्यावर तंत्रमताची खूप छाप आहे व ते गणेश, चंडी, रूद्र वगैरे देवतांशी संबंधित असतात. होमाग्नी व पूजनीय देवतेचे ऐक्य करून मग आहुत्या देण्यात येतात.

*न वै देवा अश्नन्ति न पिबन्त्येतदेवामृतं दृष्ट्वा तृप्यन्ति ॥(छां.उ. ३-६-१, ३-९-१)

** इष्टियागः । स एवासेचनाधिको होमः । मीमांसासूत्रावरील शाबर भाष्य, ६-८-७

## संध्या

'संध्यावंदन' ही वैदिक काळातील आणखी एक प्रथा नंतरच्या काळातील अनेक ईश्वरविषयक कल्पनांचा तिच्यावर परिणाम झाला तरी आजतागायत टिकून आहे. एकेकाळी सर्व व्दिजातींसाठी हे नित्य कर्तव्य असले तरी हल्ली फारच कमी लोक ती करू शकतात. चालू युगात माणसे खूप कामांमधे गुंतलेली असतात हे कारण देण्यात येते पण ते काही सर्वस्वी खरे वाटत नाही. मुख्य कारण आहे आजकाल तिच्यामागचा अर्थ व आशय पुष्कळांना कळत नाही. असे सुचवता येईल की नवहिंदूधर्मातील प्रत्येक व्यक्ती करू शकेल अशा प्रकारच्या सुटसुटीत व सरळ संध्येची आवश्यकता आहे.

परंपरागत संध्येमध्ये चार विभाग आहेत. शुध्दी, अर्घ्य-प्रदान, गायत्री व प्रणाम. शुध्दीमधे प्रथम 'आचमन' घेऊन मुखशुध्दी होते व नंतर 'प्राणायमा' ने शरीरातील प्राण शुध्द होतात व 'मार्जना' मुळे देहशुध्दी होते. यानंतर 'अघमर्षण' किंवा 'प्राशन' (म्हणजे पाप नष्ट करणे). यामधे साधक स्वत:स उद्देशूनच प्रार्थना करतो की, आतापर्यंत त्याने जी काही पापकर्मे केलीत ती त्याला सोडून निघून गेली आहेत व जी काही अशुध्दता अजून उरली असेल तिचे तो आत्मप्रभेत विसर्जन करत आहे. अशा प्रकारच्या प्रार्थनेमुळे साधकाला जणू नवचैतन्यच मिळते व दैनंदिन कार्यकलाप उत्तम प्रकारे करण्यास नवा हुरूप व जोम मिळतो - त्याचे मन ताजेतवाने व उत्साही राहते. संध्येतील यानंतरची दुसरी पायरी म्हणजे अर्घ्यप्रदान. यामधे सूर्य - जे दृष्टीस पडणारे परमात्म्याचे सर्वोच्च प्रतीक आहे, जो प्राणीजात निर्माण करून तिला पुष्टी देणारा आहे, त्याला शुध्द जलाचे अर्घ्य अर्पण करण्यात येते. तिसऱ्या पायरीत गायत्री मंत्राचा कमीत कमी बरावेळा जप करण्यात येतो. गायत्रीचा अर्थ श्रीशंकराचार्य, सायनाचार्य, भट्टभास्कर आणि इतरांनी वेगवेगळा सांगीतला असला तरीही गायत्री म्हणजे मनुष्यातील सुप्त 'धी' (दिव्यबुध्दी) जागवणारी प्रार्थना आहे या विषयी सर्वांचे एकमत आहे तसेच श्रध्दा, एकाग्रता व संपूर्ण ब्रह्मचर्याचे पालन करून गायत्रीचा जप केला असता साधकाचे हृदय दिव्य प्रभेने उजळून निघते व याप्रकारे या मंत्रातील सामर्थ्य प्रकट होते. संध्येतील चवथी पायरी आहे सर्व देवदेवतांना प्रणाम व परमात्म्याला शरणागत होणे.

संध्येतील अनावश्यक भाग वगळता ती करायला फार तर पंधरा मिनिटे लागतात. मात्र तिचा शुध्दिकारक व मनाला सतेज बनवणारा परिणाम अनेक तास टिकून राहतो.

## आरत्रिकम

ज्याला सर्वसाधारणपणे 'आरती' म्हणतात तो हा पूजेतील सर्वात प्रचलित भाग आहे. यामधे देवतेसमोर दीप, शंखातील जल, वस्त्र, पुष्प व चामर ह्या पाच वस्तू ओवाळतात. या अतिशय साध्या क्रियेतून आपण ईश्वराला शरणागत होत आहोत असे प्रतीकात्मकपणे दाखवण्यात येते. आधी सांगितलेल्या पाच वस्तूंचा क्रमशः अर्थ पंचमहाभूते - अग्नी, जल, आकाश, पृथ्वी व वायू. यातील निरंजन ओवाळण्याची क्रिया सर्वात गांभीर्यपूर्ण असते. त्यावेळी मूर्तीमधे अथवा विग्रहात देवतेचा विशेष अविष्कार होतो अशी भक्तांची श्रध्दा असते. तसेच तेव्हा त्यांना ईश्वराशी सरळ संबंध होत असल्याचा अनुभव येतो. नित्य पूजेमधे दिवे ओवाळण्याची क्रिया असली तरी 'आरती' स्वतंत्रपणे पहाटे किंवा संध्याकाळी करण्यात येते व मोठ्या मंदिरांमधे इतर वेळी सुध्दा करतात. आरती हीच एक पूजेतील क्रिया आहे ज्यामधे सर्वचजण सहभागी होऊ शकतात. कारण 'पूजा' भक्तीचे वैयक्तिक साधन आहे तर आरती सार्वजनिक सहभागाचे आहे.

## वाचिक पूजा

देवाची पूजा फक्त विधियुक्त कर्मांनीच होत असते असे नाही तर स्तेत्रपाठ व भजनादींनी सुध्दा होते. वैदिक काळातसुध्दा ज्यामधे स्तुतिगान वगैरे आहेत तो सामवेद लोकप्रिय होता. त्यानंतरच्या काळात श्रीशंकराचार्यांनी व इतर आचार्यांनी अनेक स्तोत्रस्तवनांची रचना केली ज्यांचा आजसुध्दा हजारो लोक पूजेचेएक रूप म्हणूनच पाठ करतात. तसेच दुर्गासप्तशती, भागवत व इतरही भाषांमधील अनेक ग्रथांचे वाचन करण्यालाही पूजाच

मानले जाते. 'सहस्त्रनाम' हे सुध्दा याच वर्गात येते. एखाद्या मंत्राचा जप करणे हे ध्यानाला जास्त जवळचे असले तरी मूळ दृष्टिकोन पूजेचाच असतो.

वाचिक पूजेतील भजन व संकीर्तन हे सर्वात प्रसिध्द आहेत. संकीर्तनात काहीजण एकत्र बसून देवतेची नामे वा मंत्र मोठ्याने संगीताच्या साथीने म्हणतात तर भजन हे एकट्याने किंवा काहीलोक एकत्र बसून गातात. ही भजने संताची असून ती निरनिराळे भाव दर्शवितात. त्यांचे गायन देवासमोर बसून करण्यात येते.

**कर्म हीच पूजा**

'कर्म हीच पूजा' या संकल्पनेचा विचार न करता हिंदुधर्मातील पूजा हा विषय पूर्ण होणार नाही. उपनिषादांच्या मते संपूर्ण विश्व ब्रह्मातूनच जन्म पावते व त्यातच स्थित असते. तसेच गीता पण सांगते, ईश्वर तो स्वत: अचल आहे तोच सर्व हालचालींचा कर्ता आहे आणि व्यक्तिगत कर्म हे या वैश्विक कर्मातील एक लहानसा भाग आहे. तेव्हा या भावनेने कार्य करून कर्मफल ईश्वराला अर्पण केले तर ते कर्म पूजाच होय. आणि गीता सांगते की अशा पूजेने मानवाला पूर्णत्वास पोहोचता येते (१८-४६) गेल्या अनेक शतकांपासून या अत्यंत अर्थगर्भित उपदेशाचे स्वरूप मर्यादित करण्यात आले होते. ते सद्य: कालात स्वामी विवेकानंदांनी पुनरूज्जीवित करून त्याच्या मर्यादा तोडून टाकल्या व त्याचा व्यापक सामाजिक बदलांसाठी वापर केला.

ईश्वर सर्वगत आहे हे कर्त्याला जेव्हा मनोमन जाणवेल तेव्हाच कर्म पूजा होऊ शकते. अव्दैत वेदांतानुसार जग व त्यातील वस्तू मिथ्या आहेत या विधानाचा अर्थ असा की हे भासमान जग दिसते तसे नाही तर त्या वस्तूंचे अस्तित्व हे ब्रह्माच्या प्रकाशामुळे आहे. 'तस्य भासा सर्वम् इदम विभाति' (त्याच्या प्रकाशानेच हे सर्व प्रकाशित होत आहे) [मुंडक उ., २.२.१०] हिंदूंचा कर्माकडे पाहण्याचा मूळ दृष्टीकोन म्हणूनच पूजेचा आहे. ईश्वर सर्वत्र विभुरूपाने व्यक्त असला तरी, श्रीरामकृष्ण म्हणतात तसे त्याचा अविष्कार मात्र निरनिराळ्या वस्तूंत कमी-अधिक प्रमणात होत असतो. ती वस्तू जेवढी शुध्द तिच्यात तेवढा जास्त अविष्कार होतो. सनातन हिंदू धर्मामधे ही गोष्ट ओळखून विशिष्ट पर्वत, नद्या, प्राणी, वृत्त आणि अर्थातच साधू-संतांची पूजा करण्याची परंपरा आहे.

स्वामी विवेकानंदांनी एक नवाच दृष्टिकोन दिला. जुना हिंदू धर्म 'विषयांमधे' वा 'वस्तूंमधे' जो भेद दिसतो, त्यावर जोर देतो तर स्वामीजींनी आत्म्याचा वा 'विषयी' च्या ऐक्यावर जोर दिला. भासमान जगात काहीही भेद असोत साक्षात्कारी पुरूषाला त्या सर्वांच्यामागे असलेले चैतन्यच दिसते. आणि अनेक शतके मुठभर ज्ञान्यानाच माहीत असणारे हे सत्य ते स्वामीजींनी सर्वांसाठी उपलब्ध करून दिले.

तसेच स्वामीजींनी दरिद्री नारायणाच्या सेवेवर विशेष भर दिला. त्यामागचे कारण काय असावे ? ईश्वराचे प्रकटीकरण गरीब, दीन, दुबळ्यात जास्त असते म्हणून नव्हे तर त्यांच्या गरजा जास्त असतात आणि त्यांची सेवा अधिक नि:स्वार्थ होऊ शकते. स्वामी विवेकानंद म्हणतात, "जी व्यक्ती जितकी जास्त नि:स्वार्थ असेल.ती अधिक आध्यत्मिक आणि शिवाच्या अधिक निकट असते ... आणि जर एखादा स्वार्थी असेल तर त्याने सर्व मंदिरांमधे देवदर्शन करून, सर्व तीर्थक्षेत्री जाऊन आणि स्वत:ला टिळेमाळे लावून चित्त्याप्रमाणे सजवले तरी तो शिवापासून दूरच आहे." आध्यात्मिक जीवनातील मुख्य अडथळा स्वार्थ हा असतो. जेव्हा हजारो-लाखो लोकांना आपण दारिद्रयात पाहूनसुध्दा त्यांची उपेक्षा करू तर तोच स्वार्थ होय.

आध्यत्मिक जीवन हे एक व्यापक जीवन असते, त्याचा अर्थ दिव्य आनंदात, इंद्रियांपलीकडील प्रदेशात रममाण होणे हा आहे. 'कर्म' हे पूजनाच्या भावनेने केल्यास मन विशाल होते आणि संपूर्ण जीवनच एक 'योग' होतो. नवहिंदुसमाजात ही कल्पना, एक आध्यत्मिक साधना ह्या अर्थाने चांगलेच मूळ धरत आहे. अर्थात पूजेचे अन्य प्रकार म्हणजे निव्वळ भ्रम असे मुळीच नाही. सर्व कर्मे पूजेसारखी करणे म्हणजे पोरखेळ नाही. स्वामी विवेकानंद प्रश्न विचारतात, 'फसव्या वासनांमुळे इतस्तत: वाहवणाऱ्या साधारण मनुष्यजातीला कर्माचा अर्थ काही

# 'शिक्षा के क्षेत्र में रामकृष्ण मिशन की भूमिका'

स्वामी वीरेश्वरानंद

(रामकृष्ण मिशन विद्यापीठ, पुरुलिया, पश्चिम बंगाल की रजत जयन्ती के अवसर पर ८ फरवरी १९८२ को उसका शुभारम्भ करते हुए रामकृष्ण मठ-मिशन के अध्यक्ष श्रीमत् स्वामी वीरेश्वरानन्द महाराज ने बँगला में जो भाषण दिया था प्रस्तुत लेख उसी का अनुवाद है ।)

आज एक प्रकार से हम लोगों के लिए 'thrice blessed day' (त्रिबारपुण्य दिवस) है, क्योंकी आज से इस प्रतिष्ठा की रजत-जयन्ती की शुभारम्भ हो रहा है, फिर आज ही ठाकुर (श्रीरामकृष्ण) की संगमर्मर मूर्ति की मन्दिर में प्रतिष्ठा हुई और फिर आज स्वामी तुरीयानन्दजी का जन्म -दिवस भी है ।

इस प्रतिष्ठान की गतिविधियों के बारे में आपने सुना है । उसमें कहा गया है की यहाँ पर स्वामीजी (विवेकानन्दजी) के आदर्श के अनुसार छात्रों को शिक्षा देने की चेष्टा की जा रही है । हम लोग आजकल चारों ओर केवल अन्धकार ही देख रहे हैं । समाज के सभी स्तरों पर सत्यता का अभाव दिखायी दे रहा है, सर्वत्र चोरबाजारी और कालाधन से मानो समाज भर भर गया है । ऐसा क्यों ? उत्तर में एक बात कहूँगा । जब स्वामीजी अमेरिका से भारत लौटे, तब दक्षिण में एक स्थान पर कुछ लोगों ने स्वामीजी से कहा - स्वामीजी, आप राजनिती में आइए देश को स्वाधीन कीजीए, फिर धर्म-वर्म की बात चले । स्वामीजी ने इसका उत्तर देते हुए कहा था - मैं तुम लोगों को कल ही स्वाधीनता दिला सकता हूँ, पर क्या तुम लोग उसे बचाकर रख सकोगे ? तुम लोगों में 'मनुष्य' कहाँ है ? पहले मनुष्य तैयार करो, फिर उसके बाद स्वाधीनता की बात सोचो । आज हम लोग समझ पा रहे हैं कि उन्होंने कितनी सही बात कही थी । हमारे देश की यह दुरवस्था क्यों है ? इसलिए कि 'मनुष्य' नहीं हैं । मनुष्य क्यों नहीं है ? पहले तो भारतवर्ष में कितने मनीषी लोग थे, बडे बडे त्यागी महापुरुष थे, बडे बडे सम्राट थे, पर आज ऐसी अवस्था क्यों हो गयी है ? उत्तर में कहूँगा कि मूल में ही गडबडी है । हम लोग जो शिक्षा पाते हैं, उससे किसी प्रकार 'मनुष्य' तैयार नहीं हो सकता-चरीत्रवान् मनुष्य तैयार नहीं हो सकता । जैसा की बाईबिल में काहा है - Do men gather grapes of thorns, or figs of thistles ? - क्या काँटो में अंगूर फलते हैं या कटीली झाडियों में डूमर मिलते हैं ?

हम लोग लडके-लडकियों को जैसी शिक्षा देंगे, वे लोग ठीक वैसे ही गठित होंगे और बडे होने पर उनकी बुध्दि का विकास उसी प्रकार होगा । अतएव, यदि हम लोग वर्तमान शिक्षाप्रणाली को अपने अनुरुप न ढाल सकें और जैसा अँगरेज बना गये थे वैसा ही रहने दें, तब तो अवस्था उसी प्रकार बनी रहेंगी ।

स्वामीजी ने एक बार कहा था - शिक्षा कैसी होनी चाहिए ? चरित्र-गठन ही शिक्षा का महत्वपूर्ण अंग है । छात्रों के चरित्र-गठन की ओर ध्यान देना होगा; फिर उन्होंने कहा था - पहले हम लोगों के पास ज्ञान की जो सब शाखाएँ थीं, आज उन सबकी शिक्षा हमें देनी होगी । उसके साथ अँगरेजी भी सीखनी होगी, क्योंकि अँगरेजी भाषा के व्दारा हम लोग विश्व के साथ वार्तालाप कर सकते हैं । आधुनिक विज्ञान और प्रौद्योगिक (तक-नीकी) विद्या भी आवश्यक है । क्यों ? इसलिए कि प्रौद्योगिकी के व्दारा हमें अपने उद्योग खडे करने होंगे । ऐसी व्यवस्था करनी होगी, जिससे उद्योग-धन्धों का सहारा लेकर हमारी गरीब जनता अपने पेट की आग बुझा सके ।

पर मुल बात है चरित्र-गठन । वह क्या यों ही हो जाता है ? क्या व्याख्यान देने या संसद व्दारा कोई नियम कानुन बना देने से चरित्र-गठन हो जाता है ? चरित्र-गठन के लिए धर्म की आवश्यकता होती है । हमारी प्राचीन शिक्षाप्रणाली में दो विभाग थे । एक थी अपरा विद्या और दूसरी परा विद्या । परा विद्या के व्दारा भारतवर्ष के श्रेष्ठ आदर्श की शिक्षा दी जाती, जो सहस्त्रों वर्ष से चली आ रही है, और वह है मोक्ष या धर्म । मोक्ष

ही मानवजीवन का उद्देश्य है । शिक्षाक्षेत्र में भी उसकी ओर हमारी दृष्टी होनी चाहिए । पूर्वकाल में लडके-लडकियों को विविध प्रकार की शिक्षा दी जाती थी । उसमें धर्म या नीति की शिक्षा को स्थान मिलता था । इसे हम नैतिक गुणों का अनुशीलन कह सकते हैं । उन लोगों को इस सबका पालन करना पडता था । उसी से उनका चरित्र गढ़ता । पर आज बस यही तत्व हमारी शिक्षा में सम्मिलित नहीं है । फलस्वरुप जिस प्रकार की शिक्षा दे रहे हैं, तदनुरुप परिणाम मिल रहा है । राष्ट्र के उद्देश्य, राष्ट्र के आदर्श के साथ जिस शिक्षा का कोई सम्बन्ध न हो, वह शिक्षा वस्तुतः शिक्षा ही नहीं है । शिक्षा का मतलब क्या थोडा लिखना-पढ़ना सीख लेना मात्र है ? या और कुछ ? शिक्षा का तात्पर्य है, जो लडके-लडकियाँ पढने विद्यालय जाते हैं, उन्हें देश के आदर्श के अनुरुप गढ ले कर यथार्थ भारतीय नागरिक बना देना । यदि यह न हो, तो शिक्षा से भला क्या लाभ ? आदर्श शिक्षा के अभाव में ही आज हमारी ऐसी दुरवस्था है ।

हमारे स्कूल-कालेजों के पाठ्यक्रम में यह सब कुछ नहीं है । हमारे स्कूल-कालेज अभी विविध प्रकार की असुविधाओं में से गुजर रहे हैं । अभी रामकृष्ण मिशन स्वामीजी के भावादर्श को पूरी तरह से प्रयोग में नहीं ला पा रहा है । किन्तु उसके प्रयोग की जो कुछ भी थोड़ी सी सुविधा उपलब्ध है, उसके लिए हम लोगों ने ये छात्रावास और आवासिक विद्यालय खोले हैं । इससे छात्र सब एक साथ रहते हैं । शिक्षक भी छात्रों के साथ रहते हैं । इससे विद्यालय का जो पाठ्यक्रम है, उसके अतिरिक्त भी कुछ अधिक शिक्षा हम लोग छात्रों को दे सकते हैं । इसीलिए अनेक स्थानों पर हम लोगों ने आवासिक विद्यालय खोले हैं । यहाँ पर आवासिक विद्यालय होने के कारण आज ठाकुर की संगमर्मर-मूर्ति की प्रतिष्ठा हुई । इस विद्यालय के साथ, पढाई-लिखाई के साथ मन्दिर का क्या सम्बन्ध है - यह प्रशन उठ सकता है । मन्दिर के साथ सम्बन्ध यह है कि इस मन्दिर के रहने से समस्त छात्रों के जीवन पर उसका प्रभाव पडेगा - वे लोग प्रतिदिन श्री ठाकुर, श्री माँ और स्वामीजी को देखेंगे और यह स्मरण करेंगे कि किस प्रकार अपना जीवन बिता गये तथा उपदेश दे गये । उनका भाव इन छात्रों के मन पर अपनी छाप अंकित कर सके इस हेतु मन्दिर की आवश्यकता है । वह दूसरे किसी विद्यालय में सम्भव नहीं । भले ही यहाँ पर पाठ्यक्रम में धर्म का भाव प्रत्यक्ष रुप से नहीं है, तथापि छात्रगण वह पा ले रहे हैं ।

बाहर के स्कूलों में छात्रों का शिक्षक के साथ विशेष कोई सम्पर्क नहीं रहता । लडके समय पर आते हैं दो घण्टे पढ़ते हैं फिर चले जाते हैं । शिक्षक ने एक घण्टा पढ़ाया फिर चले गये । उसके बाद कुछ नहीं पर पूर्वकाल में ऐसा नही था । शिक्षक के साथ छात्रों का पिता-पुत्र के समान सम्पर्क रहता था । एक दूसरे के प्रति श्रध्दा का भाव रहता । वह श्रध्दा तो आजकल है ही नहीं । घेराव हो रहा है, और भी जाने कितना क्या हो रहा है । वह श्रध्दा रहे कैसे ? उस श्रध्दा के लिए जो गुण आवयक है, वही नहीं है । हमारे यहाँ आवासिक विद्यालय होने से शिक्षक छात्र, साधु-सब एक साथ रहते हैं । फलस्वरुप उनके भीतर एक दूसरे के लिए श्रध्दा का भाव, प्रेम का भाव पैदा होता है । इससे कुछ अच्छा फल प्राप्त होता है ।

इसीलिए जहाँ भी हमारे इस प्रकार के आवासिक विद्यालय हैं, वहाँ स्वामीजी शिक्षा के सम्बन्ध में जो कुछ कह गये हैं, उसका कुछ तो हम लोग अवश्य प्रयोग में ला सक रहे हैं, छात्रों को दे सक रहे हैं । अतएवं यहाँ पर मैं छात्रों से कहूँगा - तुम लोग इस प्रतिष्ठान में आये तो हो पर इस प्रतिष्ठान की, इस स्कूल की विशेषता क्या है यह तुम्हें जान लेना चाहिए । बिना चरित्रवान् हुए कोई भी कोई बडा काम नहीं कर सकता । चरित्रवान् होने पर ही तुम लोग बडे बडे काम कर सकोंगे । जैसे महात्मा गाँधी को देखो कितना बडा काम कर गये । इसीलिए तो कि वे चरित्रवान् थे । तुम लोगों से और एक बात कहूँ । आजकल वार्षिक समावर्तन-सभा में भाषण (Convocation Address) होता है और छात्र डिग्री लेकर चले जाते हैं । पूर्वकाल में जो समावर्तन-सभा होती थी, उसका सार अंश कुछ तुमसे कहता हूँ । वह उपनिषद् में है, शिष्य के घर लौटने से पूर्व आचार्य उसे उपदेश देते हुए कहते हैं -'सत्यं वद', 'धर्मंचर' - सत्य

बात कहो, धर्म का आचरण करो । सत्य से विच्युत न होओ, धर्म से विच्युत न होओ । निन्दनीय कर्म मत करो । जो आचरण अच्छा हो वही करो । 'मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव' । यह सब उपदेश तब आचार्य अपने शिष्यों को देते थे । स्वामीजी ने इसमें और दो बातें जोड़ दी है - 'दरिद्रदेवो भव, मूर्खदेवो भव '। उस काल की समावर्तन-सभा और आजकल की समावर्तन-सभा का अन्तर तो देखो । दृष्टीकोण में कितना अन्तर है । पूर्वकाल की शिक्षा में कहा गया है - तुम मनुष्य बनो । विद्यालय छोड़-कर जा रहे हो ऐसा समझकर शिक्षा कहीं छोड़ न देना, अध्ययन न छोड देना । तुम्हें अध्ययन करना होगा । घर वापस लौटते समय शिष्य को आचार्य यही सब उपदेश देते हैं । आजकल की समावर्तन सभा के भाषण में हम दूसरे प्रकार की बातें सुनते हैं । इनकी भी आवश्यकता है । पर मनुष्य बनने के लिए जिस शिक्षा की आवश्यकता है, उसकी ओर आजकल कोई नजर नहीं हैं ।

कलकत्ता या अन्यान्य शहरों के कोलाहल से तुम्हारी शिक्षा में, पढ़ाई-लिखाई में किसी प्रकार की बाधा न हो, इसीलिए ऐसे निर्जन स्थान में विद्यालय खोला गया है । तुम लोग बस लिखना-पढना लेकर रह सकोगे पर तुम्हें यह भी स्मरण रखना होगा कि तुम भारतवासी हो । ऐसा नहीं कि तुम लोग यहाँ पर सबसे कटकर रहोगे, या कि बाहर के लोगों के साथ तुम्हारा कोई सम्पर्क न रहेगा । यहाँ पर रहने से तुम्हें यह भी अवसर मिलेगा कि इस संस्था के चारों ओर जो सब गाँव है, वहाँ के लोगों को तुम देख सको और जान सको कि ये ग्रामवासी किस प्रकार रहते हैं और क्या करते हैं । तब देखोगे कि उसकी अवस्था कैसी खराब है । सब तुम लोगों को स्वामीजी की उस बात का स्मरण आएगा कि इस सब लोगों को 'मुनष्य' बनाये बिना यदि मुठ्ठी भर लोग लिखना-पढ़ना सीख भी जाते हैं, तो देश को कोई विशेष लाभ नहीं होने का । सबको शिक्षा देनी होगी - बस यह बात तुम्हें स्मरण रखनी होगी । इस देश को फिर से जगाकर उठाने के लिए इन लोगों को अच्छी तरह से शिक्षा देनी होगी । उन्हें काम-काज सिखाना होगा, जिससे वे अर्थोपार्जन कर सकें और ठीक ढंग से खा-पी सके । अभी तो तुम्हें पढाई की ओर अपना मन अधिक लगाना होगा । किन्तु इन ग्रामवासियों की अवस्था देख इनके दुःख की बात यदि तुम याद में बनाये रखो, तो समय पाकर उनकी सहायता कर सकोगे ।

तुम लोगों की शिक्षा जब समाप्त होगी और तुम संसार में प्रविष्ट होंगे, तब मै तुमसे कहूंगा कि संसार में घुसने से पूर्व तुम दो वर्ष देश के काम के लिए दो । जो गरीब और दुखी है, जो पढना लिखना नहीं जानते, उन्हे आदमी बनाने के लिए तुम दो वर्ष उनका साथ करो । इससे अपना जीवन प्रारम्भ करने से पूर्व तुम इन सब लोगों का आशीर्वाद प्राप्त करोगे इनका आशीर्वाद लेकर काम शुरु करने से तुम्हे जीवन में सफलता मिलेगी ।

और एक बात मन में उठ रही हैं । वह यह कि जो लोग पढाई में बहुत अच्छे हैं, वे सभी विदेश जाना चाहते हैं । विदेश जाना अच्छा है, विदेश में पढ़ाई करा अच्छा है, किन्तु विदेश में ही बस जाना - यह मेरे मन को कैसा कैसा लगता है । तुम भला विदेश में क्यों बसोंगे ? जिस देश ने तुम्हें पाल-पोसकर बड़ा किया, उसे चन्द चाँदी के टुकडों के लिए भूल जाओगे ? रुपया-पैसा पाने के लिए क्या भारत छोड़ दोंगे ? यह विचार तुम्हें करना चाहिए । सही है कि देश के विरुध्द तुम्हें कुछ शिकायतें हैं । तुम कह सकते हो - आप जो कह रहे हैं, वह है तो ठीक, पर हम तो यहाँ मारे मारे फिरते हैं, यहाँ हमारी कोई कीमत नहीं । यहाँ दो सौ रुपये की नौकरी पाने के लिए कितने झमेले में से गुजरना पडता है, पर अमेरिका जाने से ५०० डालर, १००० डालर, १५०० डालर की नौकरी मिल जाती है । इस शिकायत में कुछ सत्यता अवश्य है - हम अपने देश में वास्तविक प्रतिभासम्पन्न और कर्मदक्ष व्यक्ती को उसका उचित प्राप्य नहीं दे पाते, तथापि मैं तुम लोगों से यह निवेदन करूँगा कि भारतवर्ष को छोड़ना मत, उसे भूलना मत ।

उस दिन मैने एक पुराने समाचार पत्र में पढ़ा कि भारत के १२-१३ लोगों ने विज्ञान में कोई एक पुरस्कार प्राप्त किया । अमेरिका में उनके नाम का विशेष रुप से उल्लेख किया गया । वे सभी भारतीय हैं, पर अब वे अमरीकी नागरिक हैं । देखो, भारतवर्ष ने तुम्हें

आदमी बनाया, उसके पास से तुमने लिया, और जब देने का समय आया, तब तुमने दूसरे एक देश को दे दिया । यह कैसी बात हुई ? यह सभी विचार करने योग्य बात है । केवल रुपया-पैसा देखने से नहीं चलेगा । यहाँ कई प्रकार की असुविधाएँ हैं जरुर, पर तो भी भारतवर्ष को भूलने से नहीं बनेगा ।

आज हरि महाराज (स्वामी तुरीयानन्द) की जन्मतिथि है । ठाकुर के शिष्यों में उनका स्थान बहुत ऊँचा था । वे भी अमेरिका गये थे, पर वहाँ बस नहीं गये । फिर से भारत लौटकर उन्होंने साधना-तपस्या की । ऋषिकेश, नांगल आदि स्थानों में जाकर उन्होंने कडी तपस्या की थी । ये लोग जो त्याग का वह सब भाव रख गये हैं, वह सब भूलने से काम नहीं बनेगा । छात्रों ने, तुम लोगों ने सम्भवतः हरि महाराज की जीवनी नहीं पढी होगी । तुम लोग यदि उनकी जीवनी और 'पत्रावली' पढो तो तुम लोगों का बहुत उपकार होगा । देखोगे वे कैसे तेजस्वी पुरुष थे ।

मैं और अधिक समय नही लूँगा । ठाकुर, माँ और स्वामीजी के पास यही प्रार्थना करता हूँ कि उनका आशीर्वाद इस प्रतिष्ठान पर हरदम रहे और जो सब लडके यहाँ से निकलें वे ठीक वैसे ही बनकर निकलें, जैसा कि स्वामी जी ने चाहा था ।

*(उपरोक्त लेख - विवेक ज्योति त्रैमासिक, जुलाई-अगस्त-सितम्बर से लिया गया है )*

■ ■ ■ ■

**सच्चिदानंदच गुरु, जर कोणी मनुष्यरुपात तुमच्यात आत्मचैतन्याची जाणीव करुन देईल तर नक्की समजून चला की सच्चिदानंदानं हे मानवरुप धारण केल आहे. गुरु जणु सखा, हात धरुन घेऊन जातो. भगवद्दर्शन झाल्यानंतर मग गुरु-शिष्य असा बोध राहात नाही. 'ती मोठी कठीण दशा, गुरुशिष्य जाणीव नाही !' म्हणूनच जनक शुकदेवांना म्हणाले, 'ब्रह्मज्ञान हवं असेल तर आधी दक्षिणा द्या' कां की, ब्रह्मज्ञान झाल्यावर मग गुरु शिष्य अशी भेदबुध्दी राहात नाही, जोवर ईश्वर दर्शन होत नाही तोंवरच गुरु शिष्य संबंध.**

*श्रीरामकृष्ण*

*(वचनामृत भाग-१ पृः ३२९)*

**ॐ वाङ्मे मनसि प्रतिष्ठिता । मनो मे वाचि प्रतिष्ठितम् ।
आविरावीर्म एधि । वेदस्य म आणीस्थः । श्रुतं मे मा
प्रहासीः । अनेनाधीतेनाहोरात्रान् सन्दधामि । ऋतं वदिष्यामि । सत्यं
वदिष्यामि । तन्मामवतु । तद्वक्तारमवतु । अवतु माम् । अवतु वक्तारम् ।
अवतु वक्तारम् ।। ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।।१।।**

**हे प्रकाशरुप परमात्मन् ! तू माझ्यात प्रकट होऊन माझी वाणी मनामध्ये प्रतिष्ठित होईल व माझे मन वाणीमध्ये प्रतिष्ठित होईल असे कर. माझे मन आणि वाणी वेदराशीला मजजवळ आणतील असे कर व मी जे अध्ययन करीन ते मजजवळून जाणार नाही असे कर. मी जे अध्ययन केले आहे, त्याचे अहोरात्र चिंतन करुन माझे आचरण, विचार व उच्चार तद्रूप करीन. मी नित्य ऋत (आंतरिक सत्य) बोलेन, सत्य बोलेन. ते ब्रह्म अथवा माझे ब्रह्मार्पित सत्यव्रत, माझे आचार्यांचे व आम्हा गुरुशिष्यांचे सरंक्षण करो ! ॐ त्रिवार शान्ती असो ।।१।।**

**(स्तनाञ्जलिः मराठी भाषांतरासहित वरुन)**

## रामकृष्ण विवेकानंद सेवा मंडळ, अकोला

# देणगीदार

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. श्रीमती कुमुदिनी पंढरीनाथ शिरसाव, अकोला | २५,३०१/- |
| २. | श्री सुशिलकुमार रतनलाल खोवाल, शाकंबरी प्लाझा, अकोला | १०,०००/- |
| ३. | श्री सुभाष गोपीनाथ थोते, नागपूर | ७,५००/- |
| ४. | श्रीमती डॉ. सिमा अरुण मानकर, अकोला | ६,०००/- |
| ५. | डॉ. भूषण मापारी, अकोला | ६,०००/- |
| ६. | मे. खंडेलवाल ॲटोव्हील्स्, तिरुपती चेंबर्स, अकोला | ६,०००/- |
| ७. | श्री वसंतराव भागवत, अकोला | ५,२००/- |
| ८. | दि अकोला अर्बन को-ऑप. बँक लि., अकोला | ५,०००/- |
| ९. | मे. भाईचंद मोरारजी ॲन्ड सन्स, अकोला | ५,०००/- |
| १०. | रामकृष्ण मठ, नागपूर | ५,०००/- |
| ११. | दि. अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ली., अकोला | ५,०००/- |
| १२. | अकोला जिल्हा कृषि औद्योगिक सहकारी सर्व सेवा सोसायटी लि., अकोला | ५,०००/- |
| १३. | कृषि उत्पन्न बाजार समिती, अकोला | ५,०००/- |
| १४. | महाबीज कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या., अकोला | ५,०००/- |
| १५. | कॉलेज ऑफ इंजि. ॲन्ड टेक्नॉलॉजी, बाभुळगांव, जि. अकोला | ५,०००/- |
| १६. | डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ कर्मचारी सह. पत संस्था मर्या., अकोला | ५,०००/- |
| १७. | मे. ज्योती फूट वेअर्स, अकोला | ३,०००/- |
| १८. | श्री श्याम अनंतराव इंगळे, माँ सारदा असोसिएटस्, बुलडाणा | ३,०००/- |
| १९. | मे. ऋषी ट्रेडर्स, वखारीया कॉम्प्लेक्स्, मंगलदास मार्केट, अकोला | ३,०००/- |
| २०. | डॉ. दिपक टि. वखारीया, अकोला | ३,०००/- |
| २१. | दि. अकोला जनता कमर्शियल को ऑप. बँक, अकोला | ३,०००/- |
| २२. | श्रीमती सिंधूताई नांदे, जठारपेठ रोड, अकोला | ३,०००/- |
| २३. | मे. दिपक ट्रेडिंग कंपनी, इनामदार पूरा, अकोला | २,५००/- |
| २४. | मे. गोरखपूरवाला, अकोला | २,५००/- |
| २५. | श्री अतूल गणात्रा, सुलभ बासमती पॉईंट, ताजनापेठ, अकोला | २,५००/- |
| २६. | मे. बारदाना ट्रेडिंग कार्पोरेशन, टिळक रोड, अकोला | २,५००/- |

| | | |
|---|---|---|
| २७. | मे. दिपा अॅग्रो सर्व्हिसेस, चिखली, जि. बुलडाणा | २५००/- |
| २८. | मे. प्रमोद एजन्सीज अकोला | २५००/- |
| २९. | श्री बी. एस. नातू, खानदेश डेअरी, भागवत प्लॉट, अकोला | २५००/- |
| ३०. | श्री कन्हैयालाल दयाचंद, अनाज बेपारी, ताजनापेठ, अकोला | २५००/- |
| ३१. | केसींथ पॉलीमर्स, मुंबई | २५००/- |
| ३२. | खंडेलवाल रेझीनस् अॅन्ड पॉलीमर्स, मुंबई | २५००/- |
| ३३. | डॉ. सुनिल मापारी, अकोला | २५००/- |
| ३४. | डॉ. अनिल उजवणे, उजवणे पॅथॉलॉजी, अकोला | २५००/- |
| ३५. | श्री हरिष आलिमचंदाणी, माजी नगराध्यक्ष, अकोला | २५००/- |
| ३६. | दि वाशीम अर्बन को-ऑप. बँक लि., वाशीम | २५००/- |
| ३७. | मे. रमनीकलाल कानजी, कोठडी बाजार, अकोला | २५००/- |
| ३८. | मे. सांगलीवाला, बासम स्टॅन्ड, अकोला | २५००/- |
| ३९. | मे. कृषिधन सिडस् लि., जालना | २५००/- |
| ४०. | डॉ. सुभाष आनंदराव मानकर, अकोला | २३०२/- |
| ४१. | श्री प्रकाशचंद्र मुरलीधर अग्रवाल, अकोला | २१००/- |
| ४२. | मे. जे. के. एन्टरप्रायजेस, अकोला | २१००/- |
| ४३. | सौ. विद्याताई विनोद उमाळे, अकोला | १८००/- |
| ४४. | मे. हिम्मतलाल मनोरदार, मेटल मर्चन्ट, अकोला | १५११/- |
| ४५. | श्री सुभाष माधवराव टाले, अकोला | १५०१/- |
| ४६. | डॉ. रणजीत पाटील, अकोला | १५००/- |
| ४७. | डॉ. शैलेश देशमूख, जठारपेठ रोड, अकोला | १५००/- |
| ४८. | मे. कायंदे मेडीकल अॅन्ड जनरल स्टोअर्स, अकोला | १५००/- |
| ४९. | श्री नरेन्द्र कावरे, अकोला | १५००/- |
| ५०. | डॉ. वामनराव रामकृष्ण कोरपे, जठारपेठ, अकोला | १५००/- |
| ५१. | मे. ओंकार किराना स्टोअर्स, चिखली, जि. बुलढाणा | १५००/- |
| ५२. | मे. व्यंकटेश ट्रेडर्स, नांदूरा, जि. बुलढाणा | १५००/- |
| ५३. | श्री बबन पागरूत, अकोला | १५००/- |
| ५४. | डॉ. आर. एन. भांबूरकर, अकोला | १५००/- |
| ५५. | मे. चेतना डेअरी, उमरी रोड, अकोला | १५००/- |
| ५६. | श्री योगेश सुभाष मानकर, अकोला | १५००/- |
| ५७. | मे. हरीयाना ट्रेडींग कंपनी, कोठडी बाजार, अकोला | १५००/- |
| ५८. | मे. साकेत अर्थोपेडीक अप्लायन्सेस सेंटर, नागपूर | १५००/- |
| ५९. | श्री अजय नेमाडे, शेगांव | १५००/- |

| | | |
|---|---|---|
| ६०. | मे. शाकंबरी कार्पोरेशन, अकोला | १५००/- |
| ६१. | मे. अग्रसेन इन्डस्ट्रिज ऑईल मिल, अकोट | १५००/- |
| ६२. | श्री जे. बी. केडीया चॅरीटेबल ट्रस्ट, अकोला | १५००/- |
| ६३. | मे. हनुमान ऑईल इन्डस्ट्रीज, अकोट, जि. अकोला | १५००/- |
| ६४. | मे. एस. आर. गद्रे अॅन्ड कंपनी, शिवणी, अकोला | १५००/- |
| ६५. | मे. जे. के. बिल्डर्स, इंजिनियर्स, कॉन्ट्रक्टर्स, अकोला | १५००/- |
| ६६. | फ्रिशमन प्रभु (इं) प्रा. लि., प्रभादेवी, मुंबई | १५००/- |
| ६७. | मे. सुरेशचंद्र भिकुलाल, कोठडी बाजार, अकोला | १५००/- |
| ६८. | मे. जयंतिलाल द्वारकादास, ताजनापेठ, अकोला | १५००/- |
| ६९. | भारतीय सिंधु सहकारी पतसंस्था मर्या., सिंधी कॅम्प, अकोला | १५००/- |
| ७०. | जवाहर अर्बन पत संस्था, चिखली, जि. बुलढाणा | १५००/- |
| ७१. | मे. शारदा मोटर्स, मेन रोड, चिखली, जि. बुलढाणा | १५००/- |
| ७२. | श्री राजेश्वर ग्रामीण व नागरी सह. पत पुरवठा संस्था मर्या., अकोला | १५००/- |
| ७३. | डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती | १५००/- |
| ७४. | कावरे अॅन्ड जवादे असोसिएटस्, अकोला | १५००/- |
| ७५. | मे. राम उद्योग अॅन्ड श्रीराम एन्टरप्रायजेस, अकोला | १५००/- |
| ७६. | श्री गजानन महाराज संस्थान शेगांव, जि. बुलढाणा | १५००/- |
| ७७. | महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या., अकोला | १५००/- |
| ७८. | डॉ. शिरीष थोरात | १५००/- |
| ७९. | श्री दिगंबर रामकृष्ण दांदळे | १२००/- |
| ८०. | मे. संजिवनी फार्मा डिस्ट्रीब्युटर्स, दवा बाजार, अकोला | ११००/- |
| ८१. | मे. बाबूजी बूट हाऊस, सावतराम चाल, अकोला | १००१/- |
| ८२. | मे. पाडिया मेडिकल अेजन्सीज, अकोला | १००१/- |
| ८३. | डॉ. प्रद्योत गर्गे, गर्गे पॅथॉलॉजी, अकोला | १००१/- |
| ८४. | डॉ. अनंत भुईभार | १००१/- |
| ८५. | डॉ. नानासाहेब चौधरी, चौधरी हॉस्पीटल, अकोला | १००१/- |
| ८६. | श्री अरविंद ब्रम्हेकर, अकोला | १०००/- |
| ८७. | अकोला जिल्हा महसूल कर्म. सह. पत संस्था मर्या., अकोला | १०००/- |
| ८८. | डॉ. रणजित सपकाळ, अकोला | १०००/- |
| ८९. | डॉ. डी. एस. उफाळे, अकोला | १०००/- |
| ९०. | मे. खंडेलवाल ट्रेडर्स, मंगलदास मार्केट, अकोला | १०००/- |

| | | |
|---|---|---|
| ९१. | डॉ. संतोष भट्टड, वाशिम | ८५२/- |
| ९२. | श्री नानासाहेब एम्. टाले, नागपूर | ७०२/- |
| ९३. | अॅड. व्हि. एन. नेमाने, अकोला | ६०२/- |
| ९४. | डॉ. आर. जी. खडसे, सिव्हील लाईन, अकोला | ६०१/- |
| ९५. | श्री धनंजय फाळके, संजीवनी मेडिकल्स, अकोला | ६००/- |
| ९६. | प्रोप्रा. ड्रिमलॅन्ड रेस्टॉरंट, अकोला | ६००/- |
| ९७. | डॉ. एस्. एच. मोरे, मोरे पॅथॉलॉजी, अकोला | ६००/- |
| ९८. | सौ. सरिता गंधे, अकोला | ५५२/- |
| ९९. | मे. पाटील ऑईल मिल, रणपिसे नगर, अकोला | ५०१/- |
| १००. | श्री वसंतराव गोविंद जोशी, स्व. गोविंद जोशी यांचे स्मरणार्थ | ५०१/- |
| १०१. | श्री शशिकांत काळमेघ, अकोला | ५०१/- |
| १०२. | मे. एस. पी. सेल्स, अकोला | ५०१/- |
| १०३. | श्री जी. के. पद्मावार, अकोला | ५०१/- |
| १०४. | श्री नानासाहेब खेळकर, खेळकर नर्सरी, अकोला | ५०१/- |
| १०५. | श्रीमद् स्वामी ब्रह्मस्थानंद महाराज, रामकृष्ण मठ, नागपूर | ५०१/- |
| १०६. | श्री अण्णा एस. जवादे, अकोला | ५०१/- |
| १०७. | श्री दिलीप दौ. गोरे, वाशिम | ५००/- |
| १०८. | श्री मधुकर आगळे | ५००/- |
| १०९. | श्री मनोहर आखरे | ५००/- |
| ११०. | डॉ. एन्. एम्. कोठारी, अकोला | ५००/- |
| १११. | श्री शब्बीरभाई, कुत्बी हार्डवेअर, अकोला | ५००/- |
| ११२. | श्री मनोहर जी. गर्वे | ५००/- |
| ११३. | सौ. विमलताई टिंगरे, अकोला | ५००/- |